# वाद-विवेचन-माला




पुष्प ८ वें

# गांधीवाद

आचार्य शं. द. जावडेकर.

किंमत १। रुपया.

3
3J2

वाद-विवेचन-माला

18

THE UNIVERSITY LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda

Call No. B
133
.G 352
BM-35580

वाद-विवेचन-माला :: पुष्प ८ वें

UNIVERSITY LIBRARY
THE M. S. UNIVERSITY OF BARODA

# गांधीवाद

लेखक

आचार्य शं. द. जावडेकर

प्रथमावृत्ति
१५।५।४१

किंमत १। रुपया

प्रकाकक :
यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५, सदाशिव पेठ, पुणें २.

Gift
BK-3580
B
133
.G3J2

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

संपादक
श्री. पां. वा. गाडगीळ

मुद्रक :
लक्ष्मण सखाराम केळकर,
जनार्दन सदाशिव लि. चा प्रेस,
३९४ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

# प्रस्तावना

'गांधीवाद' हें पुस्तक मालेच्या चालकांनीं प्रथमतः आचार्य भागवत यांना लिहिण्याची विनंति केली होती व ती त्यांनीं मान्यहि केली होती, पण आचार्य भागवत यांच्या आजारीपणामुळें तें काम माझ्याकडे आलें. या विषयावर भागवत यांचा अधिकार माझ्याहून मोठा आहे असें माझें मत आहे म्हणून मी हें काम अंगावर घेण्यास नाराज होतो. पण दुसऱ्या कामासाठीं मी पुण्यास राहावयास आलों व आमच्या दोघांच्या प्रकृति स्वास्थ्यासाठीं एकाच घरांत राहण्याचा सुयोग आला. यामुळें मला हुरूप येऊन मी हें पुस्तक लिहिलें. आचार्य भागवत यांनीं हेंच पुस्तक भिन्न प्रकारें व अधिक चांगलें लिहिलें असतें पण तें आज शक्य नाहीं. माझें लेखन चालूं असतां आम्ही दोघें रोज चर्चा करीत असूं व त्यांच्या सूचना मी लेखनांत समाविष्ट करीत असे. अशा रीतीनें हें पुस्तक तयार झालें आहे.

आम्ही दोघे गेलीं दहाबारा वर्षें या विषयासंबंधी इतका विचारविनिमय व इतकीं चर्चा केली आहे कीं, या पुस्तकांतील भाषा सोडल्यास माझा विचार कोणता व त्यांचा विचार कोणता हें मला सांगतां येणार नाहीं. तथापि व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें आमचे या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोणहि भिन्न आहेत. तेव्हां त्यांचें या विषयावरील लेखन भिन्न व अधिक अधिकारी होईल असें माझें मत आहे. तथापि या विषयावर मालेंत एक पुस्तक होणें मालेच्या दृष्टीनें व महाराष्ट्रीय वाचकांच्या दृष्टीनेंहि अवश्य असल्यानें तें मी लिहिलें आहे. मी मालेचा व आचार्य भागवत यांचा या बाबतींत ऋणी आहे.

या पुस्तकांत गांधीवादाची मांडणी करीत असतां राष्ट्रसभेतील राष्ट्रवादी व समाजवादी विचारांचा गांधीवादी विचारांशीं कितपत व कोठें मतभेद होतो तेंहि थोडक्यांत दिग्दर्शित केलें आहे.

पुणें ता.

शं. द. जावडेकर

—

# गांधीवाद

## अनुक्रमणिका


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ धर्म, राजकारण आणि व्यवहार... | | ... | १ |
| २ राजकीय अहिंसा... | ... | ... | ३० |
| ३ गांधीवादी क्रांतीतंत्र आणि राष्ट्रसभा | | ... | ४९ |
| ४ अहिंसात्मक राष्ट्ररचना | ... | ... | ८८ |
| ५ व्यक्तिधर्म आणि समाजधर्म | ... | ... | १२१ |


# गांधीवाद

## धर्म, राजकारण आणि व्यवहार : : १

" सामान्यतः असें मानण्यांत येतें कीं धर्म आणि अर्थ या विरोधी वस्तु आहेत. 'व्यापार इत्यादि लौकिक व्यवहारांत धर्माचा संबंध नाहीं, धर्माला स्थानच नाहीं. धर्माचा उपयोग केवळ मोक्षासाठींच करावयाचा. धर्माच्या ठिकाणीं धर्म शोभतो व अर्थाच्या ठिकाणीं अर्थ.' माझ्या मतीप्रमाणें गीताकारांनीं हा भ्रम दूर केलेला आहे. त्यांनीं मोक्ष आणि व्यवहार या दोहोंत भेदच राखिलेला नाहीं. तर व्यवहारांत धर्माला उतरविलें आहे. जो धर्म व्यवहारांत लागूं पडत नाहीं तो धर्मच नव्हे अशी कल्पना गीतेंत आहे, असें मला वाटतें."

म. गांधी— अनासक्ति योग प्रस्तावना

" किंबहुना गीता हें मोक्षदृष्ट्या संसार कसा करावा याचें शास्त्र आहे. संसार सोडून देण्यासाठीं गीता सांगितलेली नाहीं. आधुनिक पाश्चिमात्य पंडित आपलीं संसारशास्त्रें भौतिक पायावर रचीत असतात पण हा पाया अपुरा असल्यामुळें तो सोडून देऊन संसारशास्त्राचा मोक्षशास्त्राशीं म्हणजे अध्यात्मशास्त्राशीं गीतेनें उत्तम मेळ घालून दिलेला आहे. गीतेंत जर कांहीं अपूर्वता असेल तर ती हीच होय."

लो. टिळक (केसरींतील लेख भाग ४ था पृ. ५२४)

लो. टिळक व म० गांधी यांच्यापैकीं कोणाच्याहि मतांचा जर शास्त्रीय दृष्टीनें अभ्यास करावयाचा असेल तर त्यांचीं भगवद्गीतेसंबंधीं काय मतें आहेत तीं प्रथम समजून घेतलीं पाहिजेत. भगवद्गीता हा दोघांच्याहि स्फूर्तीचा झरा आहे. आणि त्या झऱ्यांतून प्राप्त होणाऱ्या जीवनावर ह्यांनीं आपलें सर्व जीवितकार्य उभारलेलें आहे. भगवद्गीतेंत प्रतिपादन केलेल्या सर्वच तत्त्वांसंबंधीं किंवा तिच्यांतील सर्वच श्लोकांच्या अर्थासंबंधीं त्या दोघांचें एकच मत आहे असें म्हणण्याचा माझा आशय नाहीं. तथापि आधुनिक पाश्चात्य संस्कृतींत न आढळणारें असें एक सर्वश्रेष्ठ अमृततत्त्व या धर्म ग्रंथांत आहे आणि त्या तत्त्वाचा आश्रय केल्याविना सर्व मानव संस्कृतीची खरी उन्नति होणार नाहीं असें या दोघांचेंहि मत आहे. हें सर्वश्रेष्ठ अमृततत्त्व म्हणजे मानव संस्कृतीला आध्यात्मिक अधिष्ठान देऊन तिच्या सर्व अंगोपागांचे व्यवहार अध्यात्मवृत्तीनें अथवा मोक्षदृष्ट्या चालू झाले पाहिजेत, अथवा संसार शास्त्राचा मोक्ष शास्त्राशीं म्हणजे अध्यात्माशीं मेळ घालण्यांत आला पाहिजे, हेंच होय. भगवद्गीतेनें जगांतील इतर धर्मग्रंथांहून श्रेष्ठ असें जर कोणतें कार्य केलें असेल अथवा इतर सर्व धर्मग्रंथांहून या ग्रंथाचें अद्वितीय वैशिष्ट्य जर कोणतें असेल, तर तें म्हणजे धर्म-दृष्टीनें वा मोक्षदृष्टीनें संसारांतील सर्व व्यवहार कसे करावेत हें दाखवून देऊन हीं सांसारिक कर्में न सोडतां धर्माची व मोक्षाची प्राप्ति कशी करून घ्यावी तें भगवद्गीतेनें उत्कृष्ट रीतीनें दिग्दर्शित केलें आहे असें या दोघांचेंहि मत आहे ! धर्म व मोक्ष हीं शास्त्रें अथवा हे पुरुषार्थ मानवाला सांसारिक कर्तव्यें करण्यास कमकुवत बनवितात, त्यांच्यामुळें मनुष्यें कर्तव्य पराङ्मुख बनून निवृत्त बनतात अथवा आपल्या स्वत्वाच्या किंवा स्वाभिमानाच्या संरक्षणासाठीं लढण्याचें त्यांचें सामर्थ्य कमी होतें या आधुनिक काळांतील कल्पना त्यांना मुळींच पटत नाहींत. याच्या उलट या दोघांचेंहि असें स्पष्ट मत आहे कीं, आधुनिक युरोपीय संस्कृति ही अर्थ-कामप्रधान बनली असल्यामुळें ती धर्ममोक्षप्रधान मध्ययुगीन युरोपीय संस्कृतीपेक्षां अथवा भारतीय संस्कृतीपेक्षां हीन दर्जाची आहे व तिच्या भपक्यानें भुलून न जातां तिचा लवकरच अंत होणार आहे हें जाणून मानव संस्कृतीला आध्यात्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. मानव संस्कृतीचें हें आध्यात्मीकरण भरतखंडांत होऊं शकेल व युरोपीय तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांना अध्यात्माचा आधार घ्यावा लागेल.



**चार पुरुषार्थः—** लो० टिळक किंवा म० गांधी हे जेव्हां मानव संस्कृतीला धर्माचा व अध्यात्माचा आधार हवा असें म्हणतात तेव्हां धर्म व मोक्ष यांचा अर्थ ते काय समजतात तें प्रथम समजून घेतलें पाहिजे. धर्म म्हणजे केवळ ईश्वरोपासना अथवा वैयक्तिक मोक्षाचें साधन येवढीच त्यांची दृष्टि नसते. ईश्वरोपासना व मोक्षप्राप्ति हें सर्व धर्मांचें रहस्य व अंतिम उद्दिष्ट आहे यांत शंका नाहीं, पण धर्म या शब्दांत वैयक्तिक आत्मोन्नतिबरोबर समाजाच्या धारणेचाहि अंतर्भाव होत असतो असें त्यांचें मत आहे. समाजांतील सर्व व्यवहार स्वार्थबुद्धीनें घडत न राहतां ते समाजधारणेच्या कर्तव्यबुद्धीनें होत राहावेत, यालाच ते समाजधारणेचा धार्मिक आधार असें म्हणतात. स्वार्थबुद्धि सोडून सर्वहित बुद्धीचा आश्रय करून वर्तन करणें म्हणजेच धर्मबुद्धीनें वर्तन करणें होय. मानवी अंतःकरणांत जशी स्वार्थबुद्धि ही उपजत आहे त्याचप्रमाणें त्याच्या अंतःकरणांत सर्वहित बुद्धीहि उपजत असते व तिच्या आश्रयानें अथवा तिच्या प्रेरणेनें वर्तन करणें हेंच प्रत्येक मनुष्याचें नैतिक कर्तव्य आहे. धर्म या शब्दाचा अर्थ व्यक्तीचीं नैतिक कर्तव्यें असा करण्यास हरकत नाहीं. हीं कर्तव्य-

बुद्धि आणि कर्तव्याचरणाची वृत्ति समाजांत जितक्या प्रमाणांत जागृत संघटित व प्रभावी असेल तितक्या प्रमाणांतच त्या समाजाची योग्य प्रकारें धारणा होत असते व ही धर्मबुद्धि मंद होऊन मनुष्यें स्वार्थी व इंद्रियसुखासक्त बनलीं म्हणजे समाजाची अवनति होऊन त्याचा ऱ्हास होतो.

मानवी अंतःकरणांत ज्या अनेक वासना धिंगाणा घालीत असतात त्यांचा उद्‌भव चार मूलभूत प्रेरणांतून होत असतो. पहिली अर्थप्रेरणा, दुसरी कामप्रेरणा, तिसरी धर्मप्रेरणा व चौथी मोक्षप्रेरणा किंवा आत्मप्रेरणा. मनुष्याला जगावयाचें तर त्याला अन्नाची आवश्यकता आहे, केवळ अन्नाचीच नव्हे तर सर्व प्रकारच्या इंद्रियसुखांची विशिष्ट प्रमाणांत त्याला गरज असते. अन्न या शब्दाचा व्यापक अर्थ सर्व प्रकारचीं इंद्रियसुखें असाहि करण्यांत येत असतो आणि अन्नाचा प्रश्न म्हणजे सर्व प्रकारच्या विषयसुखांचा प्रश्न असाहि अर्थ संस्कृत भाषेंत रूढ आहे. हा सर्व अर्थशास्त्राचा विषय आहे असें स्थूल मानानें समजण्यास हरकत नाहीं. पोटाला जशी भूक लागते किंवा तहान लागते त्याचप्रमाणें मनुष्याच्या प्रत्येक इंद्रियाला भूक किंवा तहान लागते व या तृष्णेची आर्ति शमन केल्यानें मनुष्यास सुख लागतें. इंद्रियें व त्यांचे विषय यांच्या संयोगापासून प्राप्त होणाऱ्या सुखांसच भौतिक सुखें असें म्हणतात व या सुखांची प्राप्ति हाच अर्थशास्त्राचा विषय आहे. मानवी जीवनाला आधारभूत अशीं हीं सुखें आहेत व या दृष्टीनें समाजधारणेचा तो पाया आहे. पण हीं मनुष्याचीं श्रेष्ठ प्रतीचीं सुखें नव्हेत व त्या सुखांतच रत होणाऱ्या मनुष्यास मनुष्य ही पदवीहि देतां येणार नाहीं.

या अर्थप्रेरणेहून श्रेष्ठ अशी मनुष्याच्या अंतःकरणांत कामप्रेरणा आहे. अर्थप्रेरणेंतून मनुष्याच्या जीवित रक्षणाच्या साधनांचा बोध



होतो त्याप्रमाणें कामप्रेरणा ही जातिरक्षणाचा आधार आहे व त्याच दृष्टीनें तिचें मानव समाजाला महत्त्व आहे. या प्रेरणेपासून मनुष्याला कौटुंबिक सुखें प्राप्त होतात आणि इतरांसंबंधींच्या कर्तव्यांची व प्रेमभावनेपासून प्राप्त होणाऱ्या श्रेष्ठ सुखांची कल्पना येते. त्याग व प्रेम यांचें शिक्षण मनुष्याला कुटुंबांतच प्रथम मिळतें आणि क्षणिक चंचल विकारांच्या पलीकडे जाऊन चिरंतन स्थिर भावनांचा आस्वाद घेण्यास तो कुटुंबांतच शिकत असतो. कुटुंबांत प्राप्त होणारी श्रेष्ठसुखें केवळ अर्थ व काम यांच्यापासून मिळत नाहींत तर तीं कर्तव्य, त्याग व प्रेम यांच्यापासून प्राप्त होणाऱ्या आनंदांतून प्राप्त होत असतात. अर्थ व काम या दोन प्रेरणांपलीकडे ज्यांचीं दृष्टी गेलेली नाहीं त्यांना कौटुंबिक सुखें मिळणार नाहींत, इतकेंच नाहीं तर त्या कुटुंबाची धारणाहि होणार नाहीं.

कर्तव्याचरण केल्यावाचून अर्थ व काम यांचीहि प्राप्ति होऊं शकत नाहीं याचा अनुभव मनुष्याला कुटुंब संस्थेंतच येत असतो. बलिष्ठ तोच श्रेष्ठ हाच एक निसर्गाचा नियम नसून दुर्बलांचें संरक्षण, असहायांना साहाय्य आणि अज्ञानांचें संवर्धन करण्याची आवश्यकता मनुष्याला कुटुंब संस्थेंत लागते. एकमेकांनीं एकमेकांची सेवा करावी, परस्परांनीं परस्परांसाठीं झीज सोसावी, ज्यानें कष्ट केले असतील त्यांच्याबद्दल कृतज्ञता धारण करावी, स्वतः कष्ट करून प्राप्त केलेली संपत्ति सर्वांना विभागून तिचा उपभोग घ्यावा, एकाच्या दुःखांत इतरांनी सहभागी होऊन तें दुःख हलकें करावें आणि आपल्या सुखांत इतरांना वाटेकरी करून आनंद शतगुणित करावा. कोणत्याहि प्रत्युपकाराची आसक्ति न धरतां अंतःकरणाच्या कळकळीनें इतरांवर उपकार करावेत आणि मनगटाच्या जोरावर इतरांचीं सुखें हिरावून न घेतां आपलीं सुखें बाजूस सारून इतरांच्या

सुखांसाठी झटावें. प्रसंगीं इतरांच्या आपत्तींचें निवारण करण्यासाठीं स्वतःवर आपत्ति किंबहुना मरणहि ओढवून घ्यावें. या कर्तव्याच्या गहन व गूढ भावना मनुष्याला कुटुंबांत अनुभवितां येतात व त्यांचा विकास करतां येतो. हीं कर्तव्येंच मातृभक्ति, पितृभक्ति, पतिनिष्ठा, एकपत्नीव्रत, अपत्यवात्सल्य, बंधुप्रेम इत्यादि रूपांनीं निरनिराळे कौटुंबिक धर्म बनतात. या धर्मांचें पालन करणाऱ्यास ऐहिक व पारलौकिक सुख लाभतें आणि मरणोत्तरहि त्याला सद्गति मिळते अशा कल्पना रूढ होतात. या कल्पनांच्या आधारेंच स्वर्गीयसुखांचीं चित्रें रेखाटण्यांत येतात. या सर्व धर्मांच्या बुडाशीं केवळ आपलाच स्वार्थ साधीत न बसतां सर्वांचें हित करण्यासाठीं झटणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे, ही धर्मबुद्धि असते. पुढें ही धर्मबुद्धि समाजांतील सर्व व्यवहारांत प्रतीत होऊं लागते व ज्या समाजांतील सर्व व्यवहार स्वार्थबुद्धीनें न होतां धर्मबुद्धीनें होत असतील तोच समाज सुसंस्कृत, त्याच समाजांत ऐक्य व प्रेम नांदतात आणि तोच समाज इतर समाजांशीं कलह झाला असतां आपलें संरक्षण करूं शकतो ही कल्पना उदय पावून समाजांतील अनेकविध कर्तव्यांचे अनेकविध धर्म उदय पावतात. या सर्व धर्मांचें ध्येय समाजांतील अन्याय, अव्यवस्था, जुलूम, जबरदस्ती, अत्याचार, अनाचार बंद पाडून न्याय, व्यवस्था, स्वतंत्रता, सदाचार यांची प्रस्थापना करणें हेंच असतें व त्या सर्वांचा मूळ आधार नीतीवर असतो. अशा प्रकारें हे सामाजिक धर्म म्हणजे सामाजिक नीतिनियम असून समाजांतील सर्व व्यवहार कसे चालावेत तें दाखवून देण्याचें कार्य हे धर्म करीत असतात. हा धर्मच समाजाच्या सर्व अंगांची सुव्यवस्था व सुस्थिति राखून समाजाची धारणा करीत असतो. सामाजिक नीति हा या धर्मांचा आधार असतो.



धर्म हा मनुष्याचा पहिला पुरुषार्थ आहे आणि हा पुरुषार्थ साध्य करण्यासाठीं सर्व लोक झटत असले म्हणजे अर्थ व काम या पुरुषार्थांचीहि प्राप्ति त्या समाजांतील व्यक्तींना होऊन सर्वांना सुख लागते व समाजाची धारणा होते. म्हणून समाजाच्या नेत्यांनीं समाजांत धर्मप्रवृत्ति कशी वाढेल आणि स्वार्थबुद्धि क्षीण होऊन न्यायनिष्ठा कशी वृद्धिंगत होईल यासाठींच प्रयत्न करीत असलें पाहिजे. सामान्य लोक हे कर्तव्यांकडे दुर्लक्ष करून अर्थ व काम यांच्या प्राप्तीसाठींच धडपडत असतात व त्यामुळें ते धर्माला झुगारून देतात अथवा अधर्मालाच धर्म समजूं लागतात. अशा वेळीं

ऊर्ध्वबाहु र्विरौम्येष
नच कश्चित् शृणोति माम् ।
धर्मात् अर्थश्च कामश्च
स धर्मः किं न सेव्यते ॥

असें घोषित करून समाजनायक सामान्य लोकांना धर्मप्रवृत्त करतात. धर्माची व नीतीची पुनः गांठ घालून देऊन खरी धर्मसंस्थापना करतात. अशा धर्मसंस्थापकांना लोक अवतारी पुरुष, ऋषि किंवा साधुसंत असें म्हणूं लागतात. युगायुगानुसार अशा अवतारी पुरुषांची, ऋषींची अथवा साधुसंताची समाजाला आवश्यकता भासते कारण पूर्वीचे धर्म मलिन, नष्ट अथवा विकृत बनलेले असतात. आणि लोक अधर्माला धर्म मानत असतात, अशा वेळीं नवे धर्म व नवे विधिनिषेध घालून द्यावे लागतात. अशाच काळांना आपण सामाजिक क्रांतीचा काळ म्हणत असतो. या क्रांतीनंतर नव्या युगांतील नव्या धर्माची संस्थापना होत असते. अशा क्रांतिकालांतच आज आपण राहात असून मानव समाजाला नव्या धर्माचें अधिष्ठान देण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे; पण हें नव्या धर्माचें अधिष्ठान मनु-

ष्याच्या अध्यात्मवृत्तींतूनच मिळूं शकेल, असें म. गांधीप्रभृति भगवद्गीतेच्या भक्तांचें म्हणणें आहे.

हें अध्यात्म किंवा मोक्ष म्हणजे काय ? धर्म आणि मोक्ष यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे, किंबहुना मोक्ष हें धर्मवृक्षाचें अत्यंत परिणत फल आहे; धर्मबुद्धि म्हणजे सर्वहितबुद्धि. ही प्रत्येकाच्या अंतःकरणांत असते म्हणूनच त्याला सामाजिक कर्तव्यें करण्याचा उपदेश पटूं शकतो. पण सामान्य लोक जें कर्तव्याचरण करतात ते केवळ कर्तव्यासाठीं कर्तव्य, कर्तव्य आहे म्हणून त्याचें आचरण करतात असें नाहीं. तसें करण्यास त्यांना ऐहिक वा पारलौकिक फलांची आशा दाखवावी लागते, लोकनिंदेचें भय दाखवावें लागतें, लौकिकाचें आमिष निर्माण करावें लागते, राजसत्तेची दहशत बसवावी लागते अथवा भौतिक भरभराटीचें बक्षिस द्यावें लागते. अशा आचरणास सकाम धर्माचरण म्हणतात. हें श्रेष्ठ प्रतीचें धर्माचरण नव्हें. याच्या बुडाशी खरी सर्वहितनिष्ठ धर्मबुद्धि नसते, तर एक प्रकारचा शहाणा किंवा दूरदर्शी स्वार्थ असतो. नीतिदृष्ट्या या आचरणाला फारसें महत्त्व नाहीं व खऱ्या धर्माचरणाच्या कसोटीला हें वर्तन उतरूं शकत नाहीं. समाजाच्या बाह्य दडपणानें व बाहेरून होणाऱ्या संस्कारांतून या नीतीचा उगम झालेला असतो. अशी नीतिमत्ता आचरणारांना नैतिक बंधनांचा काच त्रासदायक वाटत असतो. या बंधनांमुळें दडपल्या गेलेल्या त्यांच्या अर्थकामप्रेरणा तीं बंधनें थोडीं कोठें शिथिल झालीं तर बंड करून उठतात. अथवा बंधनें शिथिल न झाल्यास त्यांच्यामुळें जीवनांतील जोम नष्ट होऊन व्यक्ति कर्तृत्वशून्य बनतात अथवा त्यांच्यांत मानसिक विकृतीहि निर्माण होते. कित्येक वेळां सामाजिक बंधनांचें राजरोस उल्लंघन होत असतें अथवा त्या बंधनांनाच विकृतीचें व अनीतीचें स्वरूप प्राप्त होतें व जुन्या



धर्माला समाजाच्या पायांत घातलेल्या शृंखलांचें स्वरूप प्राप्त होत असतें.

पण हा खरा धर्म नव्हे आणि खऱ्या धर्माचें मूळ समाजाच्या बाह्य बंधनांत अथवा बाहेरच्या दडपणांत नाहीं. मनुष्याच्या कर्तव्यबुद्धींत तें आहे हें मागें सांगितलेंच आहे; पण या कर्तव्यबुद्धीहूनहि श्रेष्ठ अशी एक भावना मानवी अंतःकरणांत आहे. ही भावना म्हणजेच सर्वभूतमात्रांवर समदृष्टीनें प्रेम करणारी अद्वैत भावना होय. या भावनेचीहि प्रतीति मनुष्याला आपल्या लहानशा कुटुंबांत प्रथम येऊं शकते. कौटुंबिक कर्तव्यें हीं कोणांसच सर्वस्वीं बंधनकारक वाटत नाहींत. तीं बंधनें स्वीकारण्यानें आत्मविकास झाल्याचा अनुभव मनुष्यास येऊं लागतो. आपल्या देहाचें भरण हें जसें सुखावह वाटतें तसेंच आपल्या मुलाला अन्न भरविणें सुखावह वाटूं लागतें. आपला देह आणि मुलाचा देह हे भिन्न दिसले, तरी त्या दोघांची सुखदुःखें परस्परावलंबी आहेत याचा अनुभव मनुष्याला येऊं लागला म्हणजे मुलांसंबंधींचीं कर्तव्यें हीं कर्तव्यें या सदरांत न उरतां तीं स्वभावसिद्ध कर्में होऊं लागतात. या बाबतींत स्वधर्म हा आपला स्वभावधर्मच बनतो. कर्तव्यबुद्धि स्वपरभेदभावावर विजय मिळविते आणि आत्मक्लेशांतून आत्मानंदाचा अनुभव घेऊं लागते. या आनंदांतून परमानंदाचा ध्यास मनुष्याला लागतो आणि आपला आत्मा केवळ आपल्या देहांतच कोंडलेला नसून तो सर्व विश्वांत भरलेला आहे याचा अनुभव त्याला येऊं लागतो. हा आध्यात्मिक अनुभव सर्व नीतिशास्त्राच्या बुडाशीं असून हा आत्मानंद उपभोगणारे जीवन्मुक्त ऋषी, सर्व भेदभावनांना उल्लंघून व आपपरभाव विसरून सर्व भूतमात्रांवर प्रेमाचा वर्षाव करणारी त्यांची समदृष्टि, आणि कोणत्याहि क्षणिक विकारांना वश न होतां अव्यभिचारी सत्यनिष्ठेनें प्रकाशत

राहणारी त्यांची स्थिरबुद्धि, हाच सर्व धर्मांचा खरा उगम आहे. अशा स्थितप्रज्ञांची अथवा जीवन्मुक्तांची समाजाला नेतृत्वासाठीं आवश्यकता असून ही सर्व बंधनातीत स्थितप्रज्ञावस्था प्रत्येक मनुष्याला आपल्या प्रयत्नांनीं प्राप्त करून घेतां येईल. बुद्धीची ही साम्यावस्था हाच मोक्ष असून हा मोक्ष सर्वांना प्राप्त करून देणें हेंच सर्व धर्मांचें ध्येय आहे. हा मनुष्याचा चौथा व सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ असून त्याचा उगम मनुष्याच्या आत्मज्ञानाच्या एषणेंतून झालेला असतो.

मानवाच्या चार पुरुषार्थांचें हें वर्णन झालें. वित्तैषणा, पुत्रैषणा, लोकैषणा आणि आत्मैषणा या चार एषणांच्यारूपानेहि अर्थ, काम, धर्म व मोक्ष या चार पुरुषार्थांचें वर्णन करतां येईल. वित्तैषणा व पुत्रैषणा यांच्यामुळें मनुष्याला संपत्ति व संतति यांची आसक्ति निर्माण होते, लोकैषणेंतून लोकसंग्रहाची म्हणजे समाजधारणेची अथवा कर्तव्याची जाणीव होते आणि आत्मैषणेंतून मी कोण, माझें स्वरूप काय, मला खरें सुख कसें प्राप्त होईल, खरी शांति कशानें लाभेल, खरें समाधान कसें प्राप्त होईल, खरी उन्नति कशी होईल, हे प्रश्न त्याच्यापुढें येऊन उभे राहतात. या प्रश्नांच्या शोधांत त्याला आपपरभाव खोटा भासूं लागतो, स्वहितबुद्धि नष्ट होऊन सर्वहितबुद्धि प्रभावी बनते, कर्तव्यांत आनंद भासूं लागतो, अहंकार नष्ट होतो आणि ममत्वामुळें बुद्धी भ्रष्ट होत नाहीं. सत्यसंशोधन, सत्यप्रचार आणि सत्यसंस्थापना हें बुद्धीचें नैसर्गिक कार्य ती सर्व मोहांतून व भयांतून मुक्त होऊन करूं लागते आणि " यद्भूतहित मत्यन्तमेतत्सत्यं मतं मम " या व्याख्येंत सांगितलेल्या सत्याचें संशोधन करण्याचें सामर्थ्य मानवबुद्धीला प्राप्त होतें. समाजधारणेला धर्माचें अधिष्ठान दिलें, म्हणजे त्याचे अर्थकाम हे पुरुषार्थ सहज सफल होऊन त्याच्या संस्कृतिमंदिरावर हें मोक्षाचें निशाण फडकूं लागतें. मानव



संस्कृतीचें आदर्शमंदीर असेंच असलें पाहिजे असें भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांचें व भगवद्गीतेच्या भक्तांचें मत आहे. गांधीवादाचा हा मूळ आधार आहे.

## सत्यनिष्ठा आणि मोक्षसाधन

गांधीवादांत सत्यनिष्ठा आणि मोक्षसाधन यांचा अविभाज्य संबंध जडलेला आहे. लो. टिळकांच्या भगवद्गीतारहस्यानें लोकसंग्रह आणि मोक्षप्राप्ति यांच्यांतील अभेद लोकनिदर्शनास आणून दिला आणि लोकसंग्रहार्थ निष्कामबुद्धीनें सर्व सामाजिक कर्तव्यें करीत राहणें हाच स्वतःचा मोक्ष साधून जगाचा उद्धार करण्याचा सर्व श्रेष्ठ मार्ग होय हें लोकांना पटवून दिलें. म. गांधी सत्यनिष्ठा हाच परमात्मप्राप्तीचा व लोकसंग्रहाचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे असें जगाला दाखवून देत आहेत. " सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म ॥" या संतोक्तीचें आचरण पूर्ण अनासक्तबुद्धीनें करीत राहणें हें म० गांधींचें वैशिष्ट्य आहे. सत्याची अनासक्त उपासना करणारानें समाजांतून निवृत्त व्हावयाचें नाहीं, तर समाजांत राहून समाजांतील सर्व व्यवहार सत्यनिष्ठेनें होत राहतील याबद्दल सतत यत्न करीत राहावयाचें. समाजांतील सर्व अन्यायांचें व दुःखांचें निवारण करण्यास सत्यसंशोधन आणि सत्यसंस्थापन हाच एक खरा मार्ग आहे. पण ही सत्याची उपासना, संशोधन आणि संस्थापन करण्यास अहिंसा हेंच सर्व श्रेष्ठ साधन आहे. अहिंसा म्हणजे प्रेम, " दुःख नेदूनि सुख देणें। या नांव अहिंसा म्हणणें । " अशी अहिंसेची व्याख्या आहे. ही अहिंसावृत्ति म्हणजेच प्रेमवृत्ति समाजांत ज्या मानानें निर्माण होईल, त्या मानानें त्यांत न्यायप्रस्थापना म्हणजेच सत्यसंस्थापना होत असते. सत्यसंशोधन व संस्थापन हें साध्य, व अहिंसा हें सत्यसंस्थापनेचें व

संशोधनाचें परम साधन असें म० गांधींचें आत्मोन्नतीचें व समाजोन्नतीचें तत्त्वज्ञान आहे. " नहि सत्यात्परो धर्मः । " म्हणजे " सत्यापरता नाहीं धर्म ", येथें धर्म हा शब्द साध्यार्थी योजिलेला आहे व " अहिंसा परमोधर्मः " येथें धर्म शब्द साधनार्थी योजिलेला आहे. अहिंसा हाच सत्यप्राप्तीचा परम म्हणजे सर्वश्रेष्ठ मार्ग आहे किंवा सर्वश्रेष्ठ साधन आहे असें म० गांधी मानितात.

हिंसा हा मानवाचा धर्म नाहीं तर तो पशूचा धर्म आहे; तथापि भेकडपणापेक्षां हिंसा श्रेष्ठ असें म० गांधींचें हिंसेसंबंधीं मत आहे. सत्यासाठीं असत्याविरुद्ध अथवा न्यायासाठीं अन्यायाविरुद्ध सतत लढलें पाहिजे आणि तें अहिंसेनें लढलें पाहिजे. पण ज्यांना अहिंसेनें लढण्याचें सामर्थ्य नसेल त्यांनीं हिंसेनेंहि लढावें पण सत्य विरुद्ध असत्य, आणि न्याय विरुद्ध अन्याय, हा लढा केव्हांहि सोडून देऊं नये. अहिंसा म्हणजे अन्यायाचा अप्रतिकार नव्हे, अन्यायाशी सहकार नव्हे, तर अहिंसा, म्हणजे अन्यायाचा अशस्त्र प्रतिकार, अन्यायाशीं संपूर्ण असहकार. " यदि मामप्रतीकारं अशस्त्रं शस्त्रपाणयः । धार्तराष्ट्रा रणे हन्युः तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ " या श्लोकांत अर्जुन ' अशस्त्र अप्रतीकारा'चा मार्ग हा कल्याणकारक मार्ग आहे असें समजतो. म० गांधींना हा ' अशस्त्र अप्रतीकारा ' चा मार्ग कल्याणकारक वाटत नाहीं, त्यांचा सत्याग्रहाचा मार्ग हा ' अशस्त्र ' असला तरी तो ' अप्रतीकारा ' चा नसून तो ' अशस्त्र प्रतीकारा ' चा मार्ग आहे. अर्जुनाचा मार्ग हा कर्मसंन्यासाचा मार्ग होता. तो कर्मयोग्याचा मार्ग नव्हता. माझा राज्याचा लोभ सुटला, आतां माझें राज्य कोणीहि घेतलें तरी त्याची मला पर्वा नाहीं, किंबहुना माझ्या आप्तेष्टांनीं राज्य केलें काय व मी केलें काय सारखेंच या भावनेनें तो युद्धपराङ्मुख झाला होता. या युद्ध पराङ्मुखतेंत समाजधारणेचा, न्याय-अन्यायाचा प्रश्न नव्हता. दुर्योधनाचा पक्ष न्यायाचा आहे व आपला अन्यायाचा आहे, असें त्याला वाटत होतें असें नाहीं. सत्यासत्याचा विवेक करून तो युद्ध पराङ्मुख होत नव्हता. तो फक्त स्वजनहिंसेला पाप समजत होता व स्वजनहिंसेपेक्षां अन्यायाची उपेक्षा करणें बरें, असा मोह त्याला झाला होता.



अर्जुन अहिंसावादीहि बनला नव्हता. त्याला फक्त स्वजनाच्या हिंसेचा तिटकारा आला होता. हिंसा-अहिंसा, सत्य-असत्य, न्याय-अन्याय यांपैकीं कोणताहि तत्त्वाधिष्ठित भेद त्याच्या मनांत उद्‌भवला नव्हता. तर स्वजन—परजन, आप-पर भाव येवढा एकच भेद त्याच्या दृष्टीसमोर उभा होता. धर्मयुद्ध त्याला मान्य होतें, पण स्वजनाशीं युद्ध करण्यास तो तयार नव्हता. स्वजनानें अधर्म केला तरी त्यांशीं युद्ध करावयाचें नाहीं ही भूमिका लोकसंग्रह करूं शकत नाहीं; व या वृत्तीनें युद्धेंहि थांबणार नाहींत. अर्जुनाचा पूर्वपक्ष मांडतांना ज्ञानेश्वर त्याच्या तोंडीं पुढील ओव्या घालतातः—

आम्ही दिगंतीचे भूपाळ । विभांडूनि सकळ ।
मग संतोषविजें कुळ । आपुलें जें ॥
तेचि हे समस्त । परी कैसें कर्म विपरीत ।
जे जाहले असती उद्यत । झुंजावया ॥ ....
ऐसियांतें कैसेनि मारूं । कवणावरी शस्त्र धरूं ।
निजहृदया करूं । घात केवी ॥

अर्जुनाची भूमिका बरोबर हीच होती. सामान्य संसारी मनुष्याप्रमाणें त्याच्या अंतःकरणांत स्वजनपरजन भेद, आपपरभाव उदित झाला होता आणि सत्यासत्य विवेक, सदूसद्विवेक, न्यायान्याय विवेक नष्ट झाला होता.

ज्याप्रमाणें एखाद्या न्यायाधिशापुढें खुनी आरोपी येऊन उभा राहावा, त्याच्यावर खुनाचा आरोप शाबीत व्हावा, त्याला फाशीं देणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्याला वाटत असावें, इतक्यांत तो आपला मुलगा आहे असें पाहून त्याचें मन गोंधळून जावें, पुत्रप्रेमाची माया जागृत व्हावी आणि न्यायसंस्थापनेपेक्षां पुत्रप्रेमाला अधिक महत्त्व देणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें त्यानें म्हणूं लागावें, त्याप्रमाणें अर्जुनाची वृत्ति झाली होती.

कौरवांनीं राज्य करावें कीं पांडवांनीं राज्य करावें, यासाठींच हें युद्ध नव्हतें. त्या युद्धाला आतां न्यायसंस्थापनेचें व अन्याय निवारणाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. आमच्या स्वार्थासाठीं आम्ही लढतो असें पांडव म्हणत नव्हते. जगांत न्यायसंस्थापना व्हावी, प्रत्येकाचा कायदेशीर हक्क सुरक्षित व्हावा, दंडुकेशाहीचें राज्य नष्ट व्हावें आणि कायद्याचें राज्य सुरू व्हावें, यासाठीं हें युद्ध आहे असें घोषित करण्यांत आलें होतें. श्रीकृष्णांनीं, विदुरांनीं, भीष्माचार्यांनीं सर्वांनीं पांडवांचा पक्ष न्यायाचा आहे अशी ग्वाही दिली होती. अशा वेळीं आपणांस जो न्याय दिसेल, जें सत्य दिसेल, त्यासाठीं स्वजनाशीं व गुरुजनांशींहि लढणें हें अर्जुनाचें कर्तव्य होतें. या कर्तव्याचरणाच्या आड स्वजनप्रेम येऊं देणें ही माया होती, हा मोह होता. श्रीकृष्णांनीं ही माया, हा मोह दूर केला. तसें करतांना अर्जुनाला आत्मानात्मविवेक शिकविला आणि अनासक्त बुद्धीनें युद्ध करण्यास सांगितलें. आत्मानात्मविवेक हा कर्तव्याचरणास प्रवृत्त करतो, आपपरभाव कर्तव्याचरणापासून मनुष्याला च्युत करतो. आपल्या कुलांतील, आपल्या जातींतील, आपल्या राष्ट्रांतील, आपल्या वर्गांतील, आपल्या धर्मांतील मनुष्यांनीं असत्याचरण केलें तर त्याला एक कायदा, आणि दुसऱ्या कुलांतील, दुसऱ्या जातींतील, दुसऱ्या राष्ट्रांतील, दुसऱ्या वर्गांतील, दुसऱ्या धर्मांतील मनुष्यांनीं तेंच दुष्कृत्य केलें, तर त्यास दुसरा कायदा. हेंच ममत्व, हीच माया, हाच कुलाचा, जातीचा, राष्ट्राचा, वर्गाचा व धर्माचा अहंकार होय. या ममत्वांतून व या अहंकारांतूनच मनुष्य अन्यायास प्रवृत्त होतो. याच ममत्वांतून व अहंकारांतून न्यायबुद्धि, सत्यनिष्ठा नष्ट होते आणि सत्यासत्याचा, सदसत् यांचा व्यामोह उत्पन्न होतो. आत्मानात्मविवेक या आपपरभावांतून बुद्धीला मुक्त करतो आणि शुद्ध सत्याची निष्ठा जागृत करतो. अशी सत्यनिष्ठबुद्धि स्वजनपरजन असा भेद करीत नाहीं; तर सज्जन दुर्जन असा भेद ती करते. किंबहुना सज्जन हाच स्वजन आणि दुर्जन हाच परजन असें आत्मानात्मविवेक करणाऱ्या बुद्धीला वाटतें. आपल्या मुलानें दुष्कर्म केलें, तर इतर कोणीहि दुष्कर्म केलें असतां जें शासन करावयाचें तेंच शासन त्याला करावयाचें आणि आपल्या मुलांशीं ज्या प्रेमानें वागावयाचें त्याच प्रेमानें आपणास शत्रु लेखणारांशीहि वागावयाचें हीच समत्वबुद्धि होय. अर्जुनाची बुद्धि या समत्वापासून ढळली होती, व त्याला कारण त्याचें कुलासंबंधींचें ममत्व हें होतें.



तसेंच त्याला जें वैराग्य उत्पन्न झालें होतें व ज्या क्षणिक वैराग्याला बळी पडून तो त्रैलोक्याचें राज्य मिळालें तरी तें मला नको, मी त्यासाठीं स्वजनांशीं लढणार नाहीं व भैक्ष्यचर्येचें आचरण करीन असें तो म्हणत होता तोहि त्याचा अहंकार होता. ही गोष्ट त्याला अखेरपर्यंत निभणारी नव्हती. त्याची प्रकृति केवळ जन्मानेंच नव्हे तर गुणकर्मांनीं व आजन्म आचरणानें क्षत्रिय होती. या क्षात्र प्रकृतींत आपला न्याय्य हक्क सोडून देऊन भिक्षावृत्ति स्वीकारणें हें बसण्याजोगें नव्हतें, तो त्याचा स्वभाव नव्हता व तें झेपण्याजोगें नव्हतें. एखादा मनुष्य भरधाव जाणाऱ्या आगगाडींत बसला असतां आपली प्रवासाची दिशा चुकली असें समजतांच तींतून उडी

टाकील तर तो अत्याचार होईल व त्याचा त्यांत घात होईल, तशीच अर्जुनाची स्थिति झाली असती. "यदहंकार माश्रित्य न योत्स्ये इति मन्यसे। मिथ्यैष व्यवसाय स्ते प्रकृति स्त्वां नियोक्ष्यति ॥" हें श्रीकृष्णाचें त्याच्या प्रकृतीसंबंधीचें निदान खोटें नव्हतें. असा मनुष्य अहंकाराला व ममत्वाला वश होऊन संन्यास घेण्यास निघाला तर तो खरा संन्यासहि होऊं शकत नाहीं. संन्यासाचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वीं आत्मानात्मविवेक अंगीं मुरावा लागतो आणि अहंकार व ममत्व यांतून पूर्णपणें मुक्त व्हावें लागतें. यांपैकीं अर्जुनाच्यापाशीं एकहि स्थिति बाणलेली नव्हती, अर्थात् संन्यास घेण्यासहि अर्जुन अनधिकारी होता.

पण भगवद्गीतेंतील संन्यास याचा अर्थ केवळ काम्यकर्मांचा संन्यास असा आहे. निष्कामबुद्धि व अनासक्ति पूर्वक सर्व कर्में करीत राहावें असें भगवद्गीतेचें शिक्षण आहे. भगवद्गीतेला कर्में सोडणें मान्य नाहीं, कारण तिची दृष्टि लोकसंग्रहाची आहे. काम्य कर्में तेवढीं सोडावींत आणि इतर सर्व कर्में अनासक्त बुद्धीनें, अहंकाररहित व ममत्त्वरहित होऊन केवळ कर्तव्य म्हणून करीत राहावें. अशा अनासक्त कर्तव्याचरणानें आत्मानात्मविवेक अंगीं बाणतो आणि देह, मन व बुद्धि यांच्यामार्फत फक्त सत्कर्मेंच घडत राहतात. इंद्रियें, मन व बुद्धि यांची, अहंकार व ममत्व यांच्यामुळें, असत्कर्माकडे प्रवृत्ति होते व फलासक्तीमुळें असत्कर्में घडत असतात. एकदां इंद्रियें, मन व बुद्धि यांना भ्रष्ट बनविणारा कामक्रोधजन्य रजोगुणी अहंकार नष्ट झाला म्हणजे असत्कर्मांचें अथवा पापप्रवृत्तीचें बीजच नष्ट होतें व मनुष्याच्या इंद्रियमनबुद्धींकडून सत्कर्मेंच घडत राहतात. त्या कर्मांचाहि कर्ता मी आहे असा अहंकार त्याला राहत नाहीं व त्यांच्या आसक्तीनें तो लिप्त होत नाहीं. असा अनासक्त मनुष्य नैष्कर्म्यावस्थेला पोहोंचतो



म्हणजे तो कर्में करीत नाहीं असें नाहीं, तर सत्कर्में हीं सहज लीलेनें त्याच्या हातून घडतात व त्याच्या इंद्रियमनबुद्धीचे सर्व व्यापार जगाच्या सुखोद्देशानेंच घडत असतात. मी व माझे हा मोह त्याच्यापाशीं नसल्यानें आणि स्वतःचें असें त्याला कांहींच प्राप्तव्य उरलेलें नसल्यानें तो जगाच्या हितार्थ केवळ सत्कर्में करीत असतो. संपूर्ण सत्यमय व अहिंसामूर्ति असा तो बनेल, त्याच्या हातून असत्य व हिंसा घडणारच नाहीं असें म. गांधी समजतात. मात्र असा पूर्ण मनुष्य प्रत्यक्ष आजपर्यंत झालेला आहे असें ते समजत नाहींत. तो एक आदर्श आहे व हा आदर्श नित्य अमूर्तच असणार. या आदर्शानुसार बनण्याचा शक्य तो प्रयत्न करणें हा प्रत्येक मनुष्याचा धर्म आहे व तोच धर्म भगवद्गीतेंत सांगितलेला आहे असें म० गांधी समजतात.

## अहिंसा व भगवद्गीता

संपूर्ण सत्य व संपूर्ण अहिंसा हा आदर्श भगवद्गीतेंत असला तरीहि श्रीकृष्णांनीं अर्जुनाला युद्ध करण्याचा उपदेश केलेला आहे यांत शंका नाहीं. जगांतील अन्यायनिवारणासाठीं धर्मयुद्धाची आवश्यकता आहे, हें तत्त्व भगवद्गीतेंत गृहीत धरलेलें आहे आणि हें धर्मयुद्ध क्षत्रियांचें शास्त्रविहित कर्तव्यकर्म असून अर्जुनाचें तें स्वभावसिद्ध कर्महि होतें. भगवद्गीतेच्या वेळींहि संन्यासी यतींना धर्मयुद्ध वर्ज होतें, तथापि क्षात्रधर्मांत व राजधर्मांत हिंसेला स्थान होतें. भगवद्गीता हा राजधर्माचा उपदेश करणाराच धर्मग्रंथ आहे. त्यांतील अनासक्त राहून कर्में करण्याचा उपदेश सर्वांना सर्वकालीं आचरण्यासारखा असला तरी युद्ध करण्याचा उपदेश क्षात्रधर्माच्या व राजधर्माच्या सापेक्षेनेंच केला

आहे असें समजलें पाहिजे. अहिंसा व सत्य हे जसे नित्यधर्म आहेत तसा युद्ध हा नित्यधर्म होऊं शकत नाहीं. हिंसाकर्म हें अहिंसेची मर्यादा म्हणून शास्त्रांत मान्य केलेलें असतें. समाजाची व व्यक्तीची अहिंसाधर्माच्या आचरणाची शक्ति किंवा अधिकार लक्षांत घेऊन त्यांच्या अहिंसेची मर्यादा शास्त्रकार वेळोवेळीं घालून देत असतात. ज्यांच्या अंगीं अधिक अहिंसा आचरण्याचें सामर्थ्य असेल त्यानें या मर्यादेचें उल्लंघन करूं नये असाहि या मर्यादेचा अर्थ नाहीं-तर तें सामर्थ्य नसेल त्यानें मात्र अहिंसाचरणाच्या नादीं न लागतां शास्त्रानें मान्य केलेली हिंसा आचरावी. ताकद किंवा अधिकार नसतां या मर्यादेचें उल्लंघन करूं नये येवढाच याचा अर्थ आहे. तसेंच हें उल्लंघन करीत असतां अन्याय प्रतिकाराचें कर्तव्य डोळ्या आड होऊं देतां कामा नये. अन्याय झाला तरी मला चालेल ही वृत्ति समाजांत अहिंसा वाढवूं शकत नाहीं, तर अन्याय निवारण्यासाठीं अहिंसेनें लढत राहण्यानें मात्र समाजांतील अहिंसा वाढूं शकते. पण अहिंसेनें अन्यायाच्या प्रतिकाराचा लढा कसा चालवावा याचा विचार अर्जुन किंवा श्रीकृष्ण यांच्यापैकीं कोणाच्याहि भाषणांत आपणांस दिसून येत नाहीं. म० गांधींनीं समाजधारणाशास्त्र व मोक्षप्राप्ति यांत जी महत्त्वाची भर घातली आहे ती हीच होय. अहिंसेनें अन्याय निवारणाचा लढा चालविण्याचें एक नवें सत्याग्रहशास्त्र त्यांनीं निर्माण केलें आहे. या सत्याग्रहशास्त्रालाच '**गांधीवाद**' असें नांव आहे. हा सत्याग्रह राजधर्मांतून उगम पावलेला नसून तो

अक्रोधेन जयेत्क्रोध
मसाधुं साधुना जयेत्।
जयेत्कदर्यं दानेन
जयेत् सत्येन चानृतम् ॥



या यतिधर्मांतून उगम पावलेला आहे आणि म० गांधींनीं त्याचा प्रवेश प्रजाधर्मांत केलेला आहे. या सत्याग्रहाचें किंवा अहिंसात्मक लढ्याचें विवेचन भगवद्गीतेंत नाहीं. तींत जी हिंसा सांगितली आहे तिचा सत्याग्रहाशीं विरोधहि नाहीं, कारण सत्याग्रहाला राजधर्मांतील सर्व हिंसा नष्ट करावयाची असली तरी ती सर्व राजांनी व क्षत्रियांनीं केवळ शस्त्र टाकून देऊन संन्यास घेतल्यानें आणि कर्म पराङ्मुख बन-ल्यानें नष्ट होऊं शकत नाहीं हें म० गांधींनाहि मान्य आहे. राजधर्म हा शस्त्रबलानें अन्यायनिवारण करण्यासाठींच निर्माण झाला असून प्रजाधर्मांतील अहिंसेच्या वृद्धीनें राजधर्मांतील हिंसा आपोआप कमी होईल व अंतीं नष्ट होईल. सत्याग्रहाचें ध्येय प्रजाधर्मांतील अहिंसा-वृद्धि करणें, हें असून राजधर्मांतील हिंसा ही शास्त्रमान्य असली तरी तिनें खरी धर्म संस्थापना होऊं शकत नाहीं. प्रजाधर्मांतील अहिंसा—वृद्धीचें कार्य यतिवर्गानें करावयाचें असतें. राजधर्म, प्रजाधर्म व यतिधर्म यांतील परस्पर संबंधाचें विवेचन पुढें स्वतंत्र प्रकरणांत करावयाचें आहे. येथें येवढेंच सांगावयाचें आहे कीं भगवद्गीता हा राजधर्मावरील अथवा राजर्षींच्या आचरणाचा आदर्श ग्रंथ असल्यानें त्यांत अक्रोधानें क्रोधावर, साधुत्वानें असाधुवृत्तीवर आणि सत्यानें असत्यावर विजय कसा संपादन करावा या विषयाचें प्रतिपादन अथवा विवेचन आलेलें नाहीं. श्रीकृष्ण व अर्जुन हे दोघेहि राजर्षींच्या धर्माचें अनुसरण करणारे क्षत्रिय होते आणि सज्जनांच्या संरक्षणासाठीं दुर्जनांना शासन करणें हा ते आपला धर्म समजत असत आणि समाजधारणेला या क्षात्रधर्माची आवश्यकता आहे असें त्यांचें मत होतें. मात्र ही क्षात्रधर्मांतील हिंसा शास्त्रसंमत असली पाहिजे असें बंधन ते मानत होते. समाजधारणेचें शास्त्रविहित कर्तव्य आपापल्या गुणकर्मानुसार अनासक्त बुद्धीनें प्रत्येकानें आचरावें म्हणजे आत्मोन्नति व लोकसंग्रह,

मोक्ष आणि समाजधारणा ही दोन्हीं साधतां येतात असें भगवद्गीता सांगते.

पण शास्त्रांनीं क्षात्रधर्मांत समाजधारणेच्या दृष्टीनें अपरिहार्य म्हणून मान्यता दिली असली तरी शस्त्रबल हें धर्मसंस्थापना करण्याचें श्रेष्ठ साधन किंवा परम धर्म नव्हे.

परित्राणाय साधूनां
विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय
संभवामि युगे युगे ॥

असें श्रीकृष्ण म्हणतात. साधूंचें संरक्षण व असाधूंचें निर्दालन हें अवतारी राजर्षींचें कर्तव्य आहे. तथापि समाजांतील साधुत्वाची वृद्धि या शस्त्रबलानें होऊं शकत नाहीं आणि असाधुत्वाचें निर्मूलनहि होऊं शकत नाहीं. हें कार्य शस्त्रबलाचा आधार न घेणाऱ्या यतिवर्गालाच करावें लागतें. यतिवर्ग हा आत्मबलानें दुष्टाचें परिवर्तन करीत असतो. आपल्या प्रेमानें तो दुसऱ्याच्या द्वेषावर विजय संपादन करतो आणि सत्यासाठीं आत्मक्लेश सहन करून दुसऱ्यांच्या अंतःकरणांतील सत्यनिष्ठा जागृत करतो. " ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति " या सिद्धान्तावर त्याचा दृढ विश्वास असल्यानें या ईश्वराला आत्मबलिदानानें प्रसन्न करण्याचें व्रत त्यानें घेतलेलें असतें. प्रतिपक्षाच्या अंतःकरणांतील सत्यनिष्ठेचा ईश्वर शस्त्रबलानें जागृत होत नाहीं. इतकेंच नाहीं तर स्वतःच्या अंतःकरणांतील सत्यनिष्ठाहि शस्त्रग्रहणानें व हिंसेनें मलिन होते व असत्याचा उद्भव होतो असें सत्याग्रही तत्त्वज्ञान आहे. समाजधारणा होण्यास दुर्जन गणलेल्यांना शासन करणें हा खरा मार्ग नसून त्यांना सज्जन बनविणें हाच खरा मार्ग आहे व आत्मोन्नतीच्या दृष्टीनेंहि दुर्जनहिंसा बंधक झाल्या-



वाचून राहत नाहीं असें यतिधर्मांतील तत्त्व आहे. म० गांधींनीं हें तत्त्वच सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानांत गृहीत धरलेलें आहे आणि प्रजेला आपल्यावरील अन्यायांचें निवारण शस्त्रबलाचा आश्रय न करता आत्मबलानें कसें करावें याचें शिक्षण ते देत आहेत. तथापि जोंपर्यंत प्रजेचें हें आत्मबल पूर्ण प्रभावी बनलें नाहीं, तोंपर्यंत राजधर्मांतील लोकसंग्रहास अपरिहार्य ठरलेली हिंसा हेंहि सरकारचें कर्तव्य आहे हें त्यांना मान्य आहे. पण आतां युद्ध ही संस्था नष्ट करण्याचा काळ लोकसंग्रहदृष्ट्या प्राप्त झाला असून अंतर्गत संरक्षण अथवा अन्याय-निवारण यासाठीं होणारी कायदेशीर अथवा न्यायांकित हिंसा पूर्णपणें नष्ट करणें अद्यापि व्यवहार्य राजकारण होत नसलें तरी युद्ध संस्था नष्ट करणें हें व्यवहार्य राजकारणाचें ध्येय आतां बनविलें पाहिजे. या ध्येयाचा प्रचार व अंमल व्हावयाचा तर सत्याग्रहसेना निर्माण करून प्रजेला आत्मबलानें आत्मरक्षण करण्याचें शिक्षण देणारे सत्याग्रही सैनिक निर्माण करणें प्रजाधर्मांतील एक अवश्य अंग समजलें गेलें पाहिजे. प्रजेंतील हें आत्मबल संघटित व प्रभावी करण्याचा प्रयत्न करणें हेंच सत्याग्रही वीरांचें जीवितकार्य आहे. अशा सत्याग्रही वीरांची संघटना करणारे म० गांधी अहिंसेच्या बाबतींत भगवद्गीतेच्यापुढें गेलेले आहेत. तथापि " भगवद्गीतेनें ज्याप्रमाणें यज्ञ या शब्दाचा अर्थ वाढवून यज्ञांतील पशुबलिदानाऐवजीं पशुवृत्तींचें बलिदान असा अर्थ केला व ज्ञानयज्ञ–पशुवृत्तींना बली देऊन आत्मज्ञानाची प्राप्ति–हाच खरा श्रेष्ठ यज्ञ असा अभिप्राय व्यक्त केला, त्याचप्रमाणें " मा मनुस्मर युद्धच च " या वचनाचा अर्थ विकसित करून ' सत्यनिष्ठेसाठीं अहिंसेनें लढत रहा ' असा आपण अर्थ करीत आहों व हें कृत्य भगवद्गीतेनें आचरिलेल्या धोरणास अनुसरूनच आहे असें त्यांचें म्हणणें आहे. कारण जगांतील

सर्व युद्धें बंद झाली तरीहि "योगस्थः कुरु कर्माणि" हा भगवद्गीतेचा अपूर्व संदेश जगाला नित्य मार्गदर्शक राहीलच अशी म० गांधींची श्रद्धा आहे व भगवद्गीतेचें हेंच वैशिष्ट्य आहे असें ते समजतात.

युद्ध ही संस्था त्रिकालाबाधित आहे, लोकसंग्रहार्थ हिंसा केलीच पाहिजे हा भगवद्गीतेचा संदेश नव्हे. मागें स्वतःच्या खुनी मुलाला फांशी देणाऱ्या न्यायाधीशाचें उदाहरण दिलें. ज्या समाजांत फांशीची शिक्षा रूढ आहे त्या समाजांतील न्यायाधीश मुलाला शिक्षा देण्याच्या वेळीं गांगरून गेला व कर्तव्यपराङ्मुख होऊं लागला तर त्याला स्थितप्रज्ञ वृत्तीनें फांशीची शिक्षा दे, असा उपदेश करावा लागेल व तो योग्यच होईल. पण त्यावरून, फांशीची शिक्षा रद्द करावी किंवा नाहीं असा प्रश्न पुढें हजारों वर्षांनीं उपस्थित झाला असतां फांशीची शिक्षा ठेवलीच पाहिजे असा आग्रह धरणारांना वरील उपदेशाचा आधार घेतां येणार नाहीं. तसेंच युद्ध ही संस्था लोकसंग्रहाला अपरिहार्य वाटत होती त्यावेळीं 'योगस्थ होऊन युद्ध कर' 'स्वजनांच्या मायेनें मोहित होऊन स्वधर्मच्युत होऊं नको' 'कर्तव्य पराङ्मुख होऊन संन्यास घेऊं नको' असा केलेला उपदेश आज युद्धसंस्था नष्ट करण्याचा काल लोकसंग्रह दृष्ट्या प्राप्त झाला असतां यापुढील प्रगतीस प्रतिबंध करूं शकत नाहीं. श्रीकृष्णांनीं ज्याप्रमाणें यज्ञ संस्थेचा अर्थ वाढवून 'ज्ञानयज्ञ' हाच खरा यज्ञ असें प्रतिपादन केलें त्याचप्रमाणें युद्ध संस्थेचा अर्थ वाढवून 'सत्यासाठीं केलेलें अहिंसात्मक युद्ध हेंच खरें धर्मयुद्ध' असें जगाला सांगणें म्हणजेच श्रीकृष्णाचें व भगवद्गीतेचें कार्य पुढें चालू ठेवणें असें म. गांधी समजतात. आज जगांत लोकशाहीचा उदय होऊन प्रजेचें राजकारण फार वाढलें आहे, आणि भौतिक शोधांमुळें राष्ट्रीय भेद लयास जाऊन सर्व जग एक राष्ट्र बनूं



लागलें आहे, तसेंच संहारसाधनांची व आर्थिक परस्परावलंबनाची कल्पनातीत वाढ झाली आहे. या सर्व कारणांमुळें युद्ध संस्था जगाला मारक बनली आहे. या कालांत भगवद्गीतेच्या अनासक्ति योगाचा संदेश अहिंसा युद्धाच्या व अहिंसात्मक क्रांतीच्या स्वरूपांतच जगाला मिळाला पाहिजे. हेंच कार्य म. गांधींचा सत्याग्रह म्हणजेच गांधीवाद करीत आहे.

## श्रीकृष्ण, गौतम बुद्ध व म. गांधी

वरील विवेचन केवळ भगवद्गीतेच्या आधारेंच केलें आहे, तथापि गांधीवादाचें विवेचन गौतमबुद्धाच्या अहिंसावादावाचून पुरें होऊं शकत नाहीं. आतांपर्यंत धर्मसंस्थापक अवतारी पुरुष म्हणून जे जे होऊन गेले त्या सर्वांचे स्थूलमानानें दोन वर्ग करतां येतात. गौतमबुद्ध व येशू ख्रिस्त यांच्याप्रमाणें केवळ निवृत्तिपर यतिधर्माचा उपदेश करून संन्यासी संघ निर्माण करणारांचा एक वर्ग आणि श्रीकृष्ण आणि महंमद पैगंबर यांच्याप्रमाणें मोक्ष आणि लोकसंग्रह या दोहोंकडेहि सारखीच दृष्टि देऊन निष्काम बुद्धीनें लोकसंग्रहार्थ केलेल्या कर्मांतूनच मोक्ष प्राप्ति करून घेण्याचा उपदेश करणाऱ्या कर्मयोग्यांचा दुसरा वर्ग. दोन्हीहि धर्मसंस्थापकांना सत्य व अहिंसा ही धर्माची सनातन नीतितत्त्वें आहेत हें मान्य असलें, तरी पहिल्या वर्गांतील धर्मसंस्थापकांनीं सत्याचें व अहिंसेचें स्वरूप जितकें निर्मल ठेविलेलें आहे तितकें दुसऱ्या वर्गांतील धर्मसंस्थापकांच्या अनुयायांना ठेवितां आलेलें नाहीं. तथापि पहिला धर्म हा समाजापासून निवृत्त बनलेल्या यतींचा धर्मच प्रायः बनून राहिला असून मुमुक्षु अवस्थेंत वा मुक्तावस्थेंत संन्यास—कर्मसंन्यास-हीच निष्ठा त्यांनीं उपदेशिली असल्यामुळें सामाजिक व्यवहारांत पडलेल्या संसारीं जगाचा उद्धार करण्याचें कार्य त्यांच्या-

कडून व्हावें तसें झालेलें नाहीं. आत्मनात्मविवेक आणि वैराग्य प्राप्त झालें कीं मुमुक्षूंनीं संसाराचा त्याग करावा आणि केवळ भिक्षाटन करून सक्रिय आचरणानें नीतिमत्तेचें शिक्षण द्यावें हें महत्त्वाचें कार्य या यतिवर्गानेंहि केलें असलें तरी राजकारण, अर्थकारण, कुटुंबभरण हीं समाजधारणेला अवश्य असणारीं कर्में करणाऱ्या संसारी जीवांचें प्रश्न कसे सोडवावेत आणि सत्य-अहिंसा या धर्मांचें आचरण या सर्व सामाजिक व्यवहारांत कसें आणावें, याचें उत्तर यतिधर्मांतून समाजाला मिळूं शकलें नाहीं.

हें कार्य अंगावर घेऊन राजकारणादि लोकसंग्रहाचीं कर्तव्यकर्में करीत असतां समबुद्धीचा योग कसा आचरावा आणि धर्म व व्यवहार यांच्यांतील फारकत दूर करून धर्माला व्यवहारांत कसें उतरवावें हें श्रीकृष्ण आणि महंमद पैगंबर यांनीं केलें आहे. दोघांनीहि राजर्षींच्या राजधर्मांत लोकसंग्रहार्थ कराव्या लागणाऱ्या हिंसेला मान्यता दिलेली असली, व धर्मयुद्ध सशास्त्र मानिलें असलें, तरी दोघांचेंहि अंतिम ध्येय सत्य व अहिंसा हेंच होतें असें म० गांधींचें मत आहे. हें म० गांधींचें मत भगवद्गीतेच्या व कुराणाच्या उपदेशाचें आजन्म आचरण करणाऱ्या शेकडों धर्मनिष्ठांना पटलेलें असून सत्य व अहिंसा यांचें संपूर्ण शुद्ध प्रतिबिंब आजच्या अपूर्ण समाजांतील सर्व व्यवहारांत पडणें शक्य नसलें, तरी सर्व सामाजिक व्यवहारांत सत्याचें व अहिंसेचें जितकें शुद्ध प्रतिबिंब पडेल तितकी समाजाची प्रगति व उन्नति झाली, व हीं प्रतिबिंबें जितकीं मलिन दिसतील तितकी समाजाची अधोगति होत आहे असें समजावें, हें मत आतां सर्वमान्य होऊं लागलें आहे. राजकारणांतील हिंसा, अर्थकारणांतील असत्य आणि कौटुंबिक जीवनांतील कामवासना यांचा संयम झाल्यावाचून समाजांत शांतता, न्याय आणि सामर्थ्य यांची निर्मिति होऊं शकत नाहीं व



म्हणून अहिंसा, सत्य व ब्रह्मचर्य यांचें संपूर्ण आचरण करणाऱ्या आदर्श पुरुषांकडे समाजांतील सर्व व्यवहारांचें नेतृत्व देणें अवश्य आहे याची जाणीव पुढारलेल्या गणलेल्या युरोपीय राष्ट्रांतील तत्त्वज्ञांनाहि आज होऊं लागली आहे. युरोपीय तत्त्ववेत्त्यांचेंच नव्हे तर समाजशास्त्रज्ञांचें व समाजसेवकांचेंहि लक्ष गांधीवादानें आकर्षून घेतलें आहे त्याचें खरें कारण हें आहे. म० गांधी यांच्या जीवनांत समाजाचें व्यावहारिक नेतृत्व करण्यास लागणारा कर्मयोग आणि त्याची नैतिक व आध्यात्मिक उन्नति करण्यास लागणारा सत्य-अहिंसेवरील अढळ निष्ठेचा आदर्शवाद यांचा सुंदर समन्वय जगाला दिसत आहे. म० गांधी श्रीकृष्ण व महंमद पैगंबर यांच्याप्रमाणें झुंझार कर्मयोगी व व्यावहारिक राजकीय नेते आहेत, तसेच ते गौतमबुद्ध व येशू ख्रिस्त यांच्याप्रमाणें शुद्ध सत्यनिष्ठा व अहिंसा यांचा आदर्श ठेवून त्याच्या प्राप्तीसाठीं सतत यत्न करणारे यतीहि आहेत. प्राचीन धर्मसंस्थापकांच्या यतिधर्मांतील अहिंसेच्या आधारावर त्यांनीं प्रजाधर्मांत सत्याग्रहाच्या क्रांतिशास्त्राची महत्त्वाची भर टाकिलेली आहे आणि या क्रांतिशास्त्राच्या अवलंबनानें लोकसत्ता, समाजसत्ता इत्यादि आधुनिक काळांत निर्माण झालेल्या सामाजिक ध्येयांची प्राप्ति करून घेतां येईल, इतकेंच नाहींतर त्यांच्याहिं पुढें जाऊन आत्मसत्तेच्या बलावर सत्ययुगाचें ध्येयशिखर गाठतां येईल आणि मानव समाजाला सर्वांगीण स्वातंत्र्याचा व पूर्णावस्थेचा मार्ग सापडूं शकेल, असें गांधीवादाचें म्हणणें आहे.

प्रजाधर्मांतील सत्याग्रही क्रांतिशास्त्र हें येशू ख्रिस्त किंवा गौतम बुद्ध यांनीं स्थापन केलेल्या यतिसंघांतील अप्रतिकाराच्या तत्त्वाहून भिन्न तत्त्वावर आधारलेलें आहे. यतिसंघ आणि यतिधर्म यांत व्यक्तीचे हक्क, वैयक्तिक परिग्रह आणि अन्यायाचा प्रतिकार यांना स्थान नाहीं

व युयुत्सु वृत्तीलाहि स्थान नाहीं. अपरिग्रही यतीच्या दृष्टीनें अन्याय निवारणाला महत्त्व नाहीं, पण समाजधारणेंत अन्याय निवारणाला महत्त्व आहे. अन्यायनिवारणाचा अहिंसात्मक मार्ग जितक्या प्रमाणांत यशस्वी होईल तितक्या प्रमाणांतच समाजधारणेला लागणारी हिंसा नष्ट होईल, हें जाणूनच म० गांधींनीं अहिंसात्मक प्रतिकाराचें क्रांतितंत्र प्रजाजनांचें स्वातंत्र्य संपादन करणाऱ्या क्रांतिकारकांच्या हातीं दिलेलें आहे. यांत त्यांचें वास्तववादी क्रांतिकारक नेतृत्व सांठवलेलें आहे आणि क्रांतितंत्राला अहिंसावादी स्वरूप देण्यांत त्यांची आदर्शवादी आध्यात्मिक वृत्ति प्रकट झालेली आहे.

## व्यावहारिक क्रांतिवाद आणि आध्यात्मिक आदर्शवाद

वरील आशय निराळ्या शब्दांत व्यक्त करावयाचा तर गांधीवादांत आध्यात्मिक आदर्शवाद आणि व्यावहारिक क्रांतिवाद यांचा समन्वय दृष्टीस पडतो असें म्हणतां येईल. संपूर्ण सत्य, संपूर्ण अहिंसा आणि संपूर्ण ब्रह्मचर्य हे आदर्श पुढें ठेऊन जीवन्मुक्त होऊं इच्छिणारे मुमुक्षू आणि समाजांत सर्वांगीण क्रांति करूं इच्छिणारे वास्तववादी क्रांतिकारक नेते, या दोहोंचे गुण गांधीवादाची दीक्षा घेतलेल्या समाजसेवकांपाशीं असले पाहिजेत.

युरोपखंडांत गेल्या तीन शतकांत लोकसत्तावाद आणि समाजसत्तावाद अशीं दोन क्रांतिकारक तत्त्वज्ञानें निघालीं. या दोघांनींहि राजधर्मांतील हिंसावादाच्या आश्रयानें क्रांति करून प्रजेला आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतां येईल आणि सर्वत्र लोकसत्तेची वा समाजसत्तेची संस्थापना करून स्वातंत्र्याचें, समतेचें व बंधुभावनेचें



राज्य स्थापन करतां येईल असा आशावाद युरोपीय जनतेंत फैलावला. रूसो, मॅझिनी व मार्क्स हे युरोपीय क्रांतिवादाचे जनक व प्रणेते समजले जातात. युरोपांतील क्रांतिविरोधी तत्त्वज्ञान राष्ट्रवादाच्या रूपानें पुढें आलें, अध्यात्म व धर्म यांच्या नांवानें लोकसत्ता व समाजसत्ता यांना त्यानें विरोध केला आणि राजधर्मांतील हिंसावादाच्या आश्रयानें भांडवलशाही, लष्करशाही व साम्राज्यशाही यांचा धिंगाणा सर्व जगभर सुरू केला आहे.

इकडे भारतीय राष्ट्रवादाचा इतिहास अगदीं निराळा झाला. म० गांधींनीं भारतीय राष्ट्रवादाला सत्याग्रहाची दीक्षा देऊन त्याला अहिंसात्मक क्रांतिवादी बनविलें. या राष्ट्रवादाच्या आश्रयानें भरतखंडांत आत्मबलाधिष्ठित लोकसत्ता व समाजसत्ता यांचा उदय होत आहे आणि युरोपखंडांतील लोकसत्ता व समाजसत्ता नष्टप्राय झाली असतां भरतखंडांत आत्मबलाच्या जोरावर आम्ही या दोहोंत अंतर्भूत होणारी सामाजिक ध्येयें मूर्त स्वरूपास आणूं असा आशावाद उद्भवत आहे. याचें सर्व श्रेय गांधीवादालाच द्यावें लागेल.

राष्ट्रीय व वैयक्तिक स्वातंत्र्य, सामाजिक समता, लोकसत्ता, समाजसत्ता हीं सामाजिक ध्येयें समाजाच्या बाह्यांगांतील रूपान्तराचीं निदर्शक चिन्हें असून तीं स्थलकालांनीं मर्यादित आहेत. तीं मानवोन्नतीच्या अखंड यात्रेंतील पवित्र स्थळें आहेत. या यात्रेचा मार्ग या स्थळांवरून जात असल्यानें तो दाखवून देतांना त्यांचा नामनिर्देश करणें आणि एक स्थळ गेल्यानंतर पुढें कोणचें लागणार तें सांगून मानव समाजाला पुढें पुढें नेण्याचा प्रयत्न करणें, हा त्याचें नेतृत्व करण्याचा एक मार्ग आहे. पण हीं पवित्र स्थळें किंवा त्यांचें दर्शन हें मानवी जीवनाचें खरें ध्येय नव्हे. या पवित्र स्थळांचें दर्शन घेत यात्रा करीत असतां अंतःकरणांत ज्या दैवी वृत्ति जागृत होत अस-

तात, सत्यपूत, प्रेममय आणि तपःशुद्ध जीवनाचा आस्वाद घेण्याचा जो ध्यास लागतो, अपूर्णांतून पूर्णत्वाकडे, असत्यातून सत्याकडे आणि नश्वर सुखांतून शाश्वत आनंदाकडे जात असतां आपल्या अमर्याद सामर्थ्याचा जो अनुभव मानवाला येत असतो, विश्वांत नित्य अनंत घडामोडी करणारी शक्ति आपल्या अंतःकरणांत जागृत असून तिच्या ठायीं अनंत नवीं ध्येयें निर्माण करणारें अगाध सामर्थ्य आहे असा जो आत्मानुभव त्याला येतो आणि जुनीं मंदिरें कालान्तरानें उध्वस्त झालीं असतां नवीं ध्येयमंदिरें निर्माण करण्याची अमरशक्ति आपल्या अंतरात्म्यांत असून तिच्या सृजनलीलेंतून अनंत मंदिरें या पुढेंहि निर्माण होणार आहेत असा जो साक्षात्कार त्याला होतो, त्यासाठीं ही यात्रा चालू आहे. मानवाची अंतःशुद्धि, मंगल प्रेम-भावना आणि निष्काम कर्तव्यांत रममाण होणारी समत्वबुद्धि यांची प्राप्ति हें मानवाचें ऐहिक ध्येय आहे. सत्यनिष्ठेचा ध्रुवतारा आणि त्याचें दर्शन घडविणारें अहिंसेचें दिङ्‌निर्णायक यंत्र, यांच्या साह-य्यानें मानवांनीं आपली जीवितयात्रा चालविली म्हणजे झालें असा म० गांधी उपदेश करीत असतात. आपल्या यात्रेंतील पुढील स्थळ कोणतें हें त्यांना या दोन साधनांच्या साहाय्यानेंच समजतें, कारण आपण योग्य दिशेनें चालत आहोंत किंवा नाहीं, हें जाणण्यास मनुष्याला या दोहोंहून अधिक श्रेष्ठ साधनें अद्यापि उपलब्ध झालेलीं नाहींत. वाटेवर लागणाऱ्या जवळच्या अथवा दूरच्या स्थळांचें—म्हणजे विशिष्ट कालीं प्राप्त होणाऱ्या समाजघटनेचें—वर्णन करण्याकडे ते फारसें लक्ष पुरवीत नाहींत. कारण ही मानवाची यात्रा अज्ञात प्रदेशांतून चालू आहे व जे थोडे पुढे गेले आहेत त्यांच्या मागून जाऊन त्यांच्या चुकांचें अनुकरण करण्यांतहि कांहीं स्वारस्य नाहीं. प्रत्येक समाजानें आपला मार्ग स्वतंत्र शोधून काढिला



पाहिजे व वरील साधनांच्या आश्रयानें तो त्यास अचुक सापडेल असें त्यांचें मत आहे.

पण संपूर्ण सत्याचें दर्शन झालेला व संपूर्ण अहिंसेचें आचरण करणारा मनुष्य अद्यापि कोणीहि झालेला नाहीं, किंबहुना पुढेंहि कोणी होणार नाहीं, असा आक्षेप म० गांधींच्या या आध्यात्मिक आदर्शवादी नेतृत्वावर घेतां येतो हें त्यांना माहित आहे. मानवाची असत्याकडे व हिंसेकडे असणारी ओढ त्यांना पुरेपूर माहित आहे आणि सत्ययुगाची संस्थापना विशिष्ट मर्यादित कालांत या जगांत होऊं शकेल असा भ्रम त्यांना केव्हांहि झालेला नाहीं. तथापि आदर्श हे नेहमीच अमूर्त असतात व प्रत्येक मूर्त समाजरचना अथवा मूर्त मानव यांच्यांतील अपूर्णत्वाची प्रतीति करून देऊन पूर्णत्वाची दिशा दाख-वून देणें हेंच आदर्शाचें कार्य आहे, असें म० गांधींचें मत आहे. मान-वाचें ध्येय हें आकाशाप्रमाणें अनंत असलें पाहिजे आणि क्षितिजा-प्रमाणें त्याच्याजवळ जाणाऱ्याच्या पुढें धावणारें तें असावें. मी आपलें ध्येय गांठलें, मी कृतकार्य झालों अथवा मी पूर्ण झालों असें कोणांसहि वाटतां उपयोगी नाहीं. असें वाटणें हा त्या मनु-ष्याचा अहंकार आहे अथवा इतरांचा भ्रम आहे. मनुष्य जितका अधिक उन्नत होईल त्याहून त्याची पूर्णत्वाची कल्पना अधिक उन्नत झाली पाहिजे आणि आपल्या अपूर्णत्वाचीहि त्याला अधिक प्रतीति आली पाहिजे. मी पूर्ण झालों असें जो म्हणतो त्याच्या अधःपाताला सीमा नाहीं आणि मी अपूर्ण आहे हें जो जाणतो त्याच्या उन्नतीला सीमा नाहीं असें गांधीवादी तत्त्वज्ञान आहे. यामुळें तुमचें सत्य-युगाचें ध्येय फार दूरचें आहे असें म्हटल्यास त्याबद्दल गांधीवाद्यांना विषाद होत नाहीं, तर उलट आनंद होतो.

पण गांधीवाद्यांना हेंहि माहित आहे कीं सत्ययुग हें फार दूरचें

ध्येय असलें तरी सत्याचा दीप हें अत्यंत निकटचें साधन आहे. ज्यानें अहिंसेची दीक्षा घेतली त्याला सत्याचा प्रकाश प्रत्येक क्षणीं मार्गदर्शन करूं शकतो, कारण तो आपल्या अंतःकरणांतील गाभाऱ्यांत नित्य तेवत असतो. याच्या इतकें निकट ध्येय दुसरें कोणतें असणार? किंबहुना हा अंतःकरणांतील सत्याचा प्रकाश हेंच माझें खरें स्वरूप आहे, त्याला दूर समजून मी कोणत्या ध्येयाला निकट समजणार? हें ध्येय बाह्य दृष्टीला अत्यंत दूर दिसलें तरी तें प्रत्येकाला अत्यंत निकट आहे. या ध्येयाची उपासना ही समाजाच्या बाह्यांगांत होणाऱ्या रचनांतरांच्या उपासनेहून श्रेष्ठ आहे, इतकेंच नव्हे तर या श्रेष्ठ उपासनेनेंच समाजाच्या बाह्यांगांतील क्रांतीचा खरा मार्ग सांपडणार आहे. समाजाच्या अंतरंगांतील क्रांतीच्या प्रेरणेनें बाह्यांगांतील क्रांति घडवून आणणें व मानव समाजाला आत्मोन्नतीच्या अखंड यात्रेचा आध्यात्मिक मार्ग दाखवून देणें, हेंच सत्याग्रहाचें ध्येय आहे.

---

# राजकीय अहिंसा : : २

## गांधीवादाचें वैशिष्ट्य

गांधीवाद हा अहिंसावाद आहे हें त्याचें वैशिष्ट्य नाहीं, तर तो राजकीय अहिंसावाद आहे, हें त्याचें वैशिष्ट्य आहे. राजकारण म्हणजे हिंसावाद, राजधर्म म्हणजे दंडनीति आणि राज्यसंस्था म्हणजे संघटित शस्त्रबल, अशीं वचनें प्राचीन ग्रंथांत व अर्वाचीन राज्यशास्त्रीय



ग्रंथांत मुबलक आढळतात. या वचनांच्या आधारें राजकारणांत अहिंसेचा प्रवेश करण्याचा अथवा राजकीय व्यवहारांना अहिंसेचें व आत्मबलाचें अधिष्ठान देण्याचा म० गांधींचा प्रयत्न हें एक 'शुद्ध खूळ' किंवा 'निव्वळ ढोंग' आहे, असें मानणारे कांहीं लोक आढळतात. पण त्यांना राजकारण म्हणजे केवळ राजधर्म नव्हे, राज्यसंस्थेचें खरें अधिष्ठान शस्त्रबल नसून आत्मबल हेंच आहे, लोकसत्ता व समाजसत्ता हे अर्वाचीन राजकारणांत निर्माण झालेले ध्येयवाद अंतिमदृष्ट्या अहिंसक समाजरचना निर्माण करण्यासाठींच झटत आहेत आणि लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन केल्यापासूनच राजकारणाला अहिंसावादी स्वरूप येऊं लागलें असून लोकसत्तेचे खरें भक्त आंतरराष्ट्रीय राजकारणांतून युद्ध संस्था नष्ट करण्याचे प्रयत्न करीत आहेत, याची बहुधा जाणीव असत नाहीं. युद्धसंस्था नष्ट झाल्यावाचून अथवा शस्त्रसंन्यासाचें ध्येय अमलांत आल्यावाचून आजच्या परिस्थितींत मानव संस्कृतींतील कोणतेहि व्यवहार न्यायाचे होऊं शकत नाहींत आणि लोकसत्ता व समाजसत्ता या ध्येयांत अंतर्भूत होणारीं मानव संस्कृतीच्या उन्नतीचीं तत्त्वें अमलांत येऊं शकत नाहींत, हें सूक्ष्म विचारांनीं सर्वांस पटणार आहे. राजकारणांतील आजची हिंसा कशी कमी करावी, समाजांत अहिंसेचें बल कसें संघटित व प्रभावी बनवावें आणि शस्त्रसंन्यासाचें ध्येय अमलांत आणून जगांत शांततेची संस्थापना कशी करावी, हा प्रश्न आज केवळ तात्त्विक महत्त्वाचा व व्यवहारदृष्ट्या गौण उरलेला नसून त्याला व्यावहारिक दृष्टीनेंच अत्यंत महत्त्व प्राप्त झालें आहे. युद्धसाधनें कल्पनातीत प्रमाणांत संहारक बनलीं आहेत, युद्धाला लागणारा खर्च आणि युद्धांत होणारा मनुष्यसंहार यांना मर्यादा राहिलेली नाहीं, निरनिराळ्या राष्ट्रांचें आर्थिक जीवन परस्परावलंबी बनल्यानें पर-

राष्ट्रीयांची हिंसा ही स्वराष्ट्रीयांचीहि हिंसा बनूं लागली आहे आणि परराष्ट्रीयांची धनहानि ही स्वराष्ट्रीयांच्या धनहानीस कारण होऊं लागली आहे. यामुळें स्वकीयांना सुख देऊन परकीयांना नष्ट करण्याचे राजकीय व्यवहार स्वतःच्या राष्ट्रासहि नष्ट करूं लागले आहेत. सर्व मानवशक्ति युद्धाची तयारी करण्यांत व युद्धें चालविण्यांत नष्ट होऊं लागल्यानें भौतिक उन्नति आणि आत्मिक शांतता यांचा लाभ होणें अशक्य झालें असून राजकीय हिंसावादाला, संघटित शस्त्रबलाला व राष्ट्रीय अहंकाराला मर्यादा घातल्यावाचून मानव संस्कृतीचा विनाश थांबूं शकत नाहीं अशी अवस्था प्राप्त झाली आहे. यामुळेंच राजकारणांत अहिंसा प्रविष्ट करणारा गांधीवाद आज जगापुढें आला आहे व जगांतील सर्व विचारवंतांचें चित्त त्यानें आपणांकडे वेधून घेतलें आहे.

## प्राचीन राजधर्म आणि प्रजाधर्म

राज्यसंस्था म्हणजे समाजाचें संघटित शस्त्रबल अशी व्याख्या करणें बरोबर होणार नाहीं. राज्यसंस्था ही न्याय प्रस्थापना करणारी व समाजरक्षण करणारी संस्था असून या कार्यासाठीं समाजाचें शस्त्रबल ती उपयोगांत आणूं शकते, असें तिचें वर्णन करावें लागतें. न्यायप्रस्थापना व संरक्षण हें तिचें आद्य कर्तव्य आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें आपलें व आपल्या हक्कांचें संरक्षण स्वतःच्या बाहुबलानें अथवा शस्त्रबलानें करावयाचें ठरविलें, तर समाजांत जें हिंसेचें वातावरण निर्माण होईल तें मानवाला आपली कोणतीहि उन्नति करूं देणार नाहीं. ज्याप्रमाणें रोग जंतूंनीं भारलेल्या हवेंत मनुष्य जगूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें हिंसेनें भरलेल्या वातावरणांत मानवसमाज जगूं शकत नाहीं. हिंसेच्या या वातावरणांत न्याय संस्थापनाहि होऊं शकत नाहीं. अशा अवस्थेंत



'बलिष्ठ तोच श्रेष्ठ' हाच न्याय व या न्यायालाच मात्स्य न्याय असें म्हणतात. जंगलांतील कायदा तो हाच. या मात्स्यन्यायाला अथवा जंगलांतील कायद्याला "सत्याचें व अहिंसेचें अधिष्ठान" असूं शकत नाहीं. मानव संस्कृतीच्या संरक्षणास सत्याचें व अहिंसेचे, सर्वहितबुद्धीचें व प्रेमाचें अधिष्ठान असावें लागतें. हें सत्याचें व अहिंसेचें सर्वहितबुद्धीचें व प्रेमाचें अधिष्ठान निर्माण करावें म्हणूनच समाजांत राजधर्माची उत्पत्ति झाली. ज्यांत सर्वांचें हित आहे तें सत्य, या सत्याची संस्थापना करण्यासाठीं समाजांत राजा अथवा राज्यसंस्था असावी आणि त्या राज्यसंस्थेनें आपल्या हातीं शस्त्रबल घेऊन असत्याचरण व हिंसा करणाऱ्यांना शिक्षा करावी अशी व्यवस्था राज्यसंस्था करीत असते, अथवा तिनें तसें करावें अशी लोकांची अपेक्षा असते व तें तिचें जाहीर ध्येय असतें. या ध्येयानुसार वागणाऱ्या राज्यसंस्था किती आहेत ? या प्रश्नाचा विचार पुढें करूं.

समाजांत राजधर्म निर्माण झाला तो संरक्षणासाठीं व न्यायप्रस्थापनेसाठीं झाला आणि समाजांतील हिंसा व असत्य यांचा अंत करण्यासाठींच आपल्या शक्तीचा उपयोग करण्याचें कर्तव्य राजावर लादण्यांत आलें. समाजाचें शस्त्रबल संघटित होऊन राजाच्या हातीं गेलें आणि समाजांत अनवस्था माजविणारांना शासन करण्याचें कार्य राजे करूं लागले. हे राजे प्रथम लोकच निवडीत व लोक त्यांना काढीतहि. घराचें रक्षण करण्यास जसा कुत्रा त्याचप्रमाणें समाजाचें रक्षण करण्यास राजा असें लोक म्हणूं लागले. राजा हा लोकांचा संरक्षक नोकर आणि दुसऱ्या समाजाची धाड आली तर त्यांच्याशीं लढतांना होणारा म्होरक्या. संरक्षणासाठीं ठेवलेला कुत्रा कित्येक वेळां वेडा होतो व घरच्या लोकांनाच चावूं लागतो, तेव्हां त्याला मारून

टाकतात, त्याचप्रमाणें राजा लोकांचें संरक्षण करीनासा झाला व लोकांनाच लुबाडूं लागला तर त्याला सर्वांनीं मिळून मारून टाकावा असा प्रजाधर्म प्राचीन धर्मग्रंथांत सांगितला आहे.

" अहं वो रक्षिते त्युक्त्वा
यो न रक्षति भूमिपः ।
स संहत्य निहंतव्यः
श्वेव सोन्माद आतुरः ॥

असें महाभारतांत सांगितलें आहे. हिंसावादी क्रांतिशास्त्राचा हा उगम आहे. प्राथमिक अवस्थेंतील हें क्रांतिशास्त्र आहे. यामुळेंही समाजांत पुनः गोंधळ माजूं लागला, तेव्हां एका राजाला काढून दुसऱ्या राजाला गादीवर बसविण्याचा विधि शास्त्रीय पद्धतीनें करण्याचा विचार लोक करूं लागले असावेत. वैदिक वाङ्मयांत राजाला सिंहासनावर बसविण्याचा जसा एक राज्याभिषेक विधि आहे त्याच प्रमाणें वाईट राजाला काढून टाकण्याचा एक सौत्रामणि या नांवाचा यज्ञविधि आहे. वाटेल त्यानें उठून राजाला मारावें व वाटेल त्यानें राजा बनावें हीं धटिंगणशाही न्यायप्रस्थापनेस उपयोगी पडत नाहीं म्हणून राजाला यथाविधि पदच्युत करून नवा राजा नेमण्यासाठीं हा अहिंसात्मक क्रांतीचा विधि निघालेला असावा. तात्पर्य राजधर्माच्या उत्पत्ति बरोबरच प्रजाधर्माचीहि उत्पत्ति झाली असून प्रजाधर्मांत अहिंसक व हिंसक क्रांति यांची निर्मिति झाली असावी.

राजानें उन्मत्त होऊन आपल्या हातांतील शस्त्रबलाचा उपयोग प्रजेला लुबाडण्यासाठीं करूं नये यासाठीं त्याला शास्त्राचें बंधन घालण्यांत आलें व हीं शास्त्रें बदलण्याची सत्ता स्वतः शस्त्र धारण न करणाऱ्या यतिवर्गाकडे देण्यांत आली. वरील सौत्रामणि विधि अथवा यज्ञ करून राज्यक्रांति करण्याचा हक्क, या यतिवर्गाकडेच असून



पूर्वीचीं शास्त्रें बदलून नवीं शास्त्रें निर्माण करण्याचाहि अधिकार त्यांना होता. राजधर्मांत ही गोष्ट येत नाहीं. यतिवर्गानें केलेल्या शास्त्रानें मान्य केलेली हिंसा समाजधारणेसाठीं अथवा धर्मयुद्धांत राजांनीं करावयाची, पण शास्त्रांचें उल्लंघन करावयाचें नाहीं. यतिवर्ग हा अहिंसावादी असल्यानें " निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः " या न्यायानुसार तो विधिनिषेधांच्या पलीकडे जाऊं शकतो, सर्व विधिनिषेध मोडून नवे घालून देण्याचें कार्य करूं शकतो, कारण सर्व विधिनिषेध समाजांत सत्याची व अहिंसेची संस्थापना करण्यासाठींच असतात. राजाला समाजधारणेसाठीं सत्य व अहिंसा यांना अपवाद करण्याचें स्वातंत्र्य दिलें आहे, पण तें शास्त्रांनीं मर्यादित केलें असून त्यानें आपल्या शस्त्रबलाचा उपयोग यतिवर्गाच्या —म्हणजे सत्याच्या व अहिंसेच्या निरपवाद उपासकांच्या—कार्यास साहाय्य करण्यासाठीच करावयाचा असतो. यतिवर्ग हा अपराध्यांना शिक्षा करीत नाहीं. प्रेमानें द्वेषाला जिंकण्याचा प्रयत्न करतो, समाजांत अहिंसावृत्ति व सत्यनिष्ठा जागृत करतो आणि अशा प्रकारें समाजधारणेचें खरें अधिष्ठान निर्माण करतो. त्यांच्या मागून जाणें हेंच प्रजेचें कर्तव्य आहे व सर्व प्रजाजन या नेत्यांच्या मागून जातील तर समाजाला राजधर्माची आवश्यकताच लागणार नाहीं किंवा राजधर्माला हिंसेची आवश्यकता वाटणार नाहीं. पण जोंपर्यंत यतिवर्गाचें आत्मबल समाजांत पुरेशी सत्यनिष्ठा व अहिंसा निर्माण करूंच शकत नाहीं तोंपर्यंत राजधर्मांत हिंसा राहणार व ती अवश्य आहे. राजधर्मांतील हिंसा नष्ट होण्यास प्रजेंतील अहिंसा व सत्यनिष्ठा वाढवीत राहणें हाच खरा मार्ग आहे. तेव्हां प्रजाधर्मांतील अहिंसा कशी वाढवावी हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. ही अहिंसा व सत्यनिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न यतिवर्ग भावरूपानें करीत असतो व राज्यकर्तें

निषेधरूपानें, म्हणजे हिंसेला व असत्याला प्रतिबंध करून, करीत असतात. यतिवर्गाचें आत्मबल अपुरें पडतें म्हणून राजधर्मांतील हिंसेचा आश्रय करावा लागतो व राजे हिंसाबलानें उन्मत्त बनतात म्हणून प्रजाधर्माला क्रांतिशास्त्रें निर्माण करावीं लागतात. हिंसेच्या वातावरणांत केलेली क्रांति खरी न्याय प्रस्थापना करूं शकत नाहीं असा अनुभव येतो, म्हणून अहिंसात्मक क्रांतिशास्त्राचा उदय होतो व तिचें अध्वर्युत्व यतिवर्ग घेत असतो.

## आधुनिक राज्यशास्त्र व लोकशाही

फार प्राचीन काळीं राज्यक्रांतीचें नेतृत्व ऋषिवर्गाकडे किंवा यतिवर्गाकडे असावें असें दिसतें. पण पुढें राज्यें मोठीं झालीं व राज्यांत सरदारवर्ग बळावला. सरदार लोक उन्मत्त राजांविरुद्ध बंडें करीत आणि स्वतः राजे बनत. अशा क्रांत्या मध्ययुगांत हरघडीस होत असत. पुढें यांतून यादव्या माजूं लागल्या आणि देशांत एकसारखी बेबंदशाही निर्माण होऊं लागली. व्यापारी, सावकार व शेतकरी या अंदाधुंदीला कंटाळले तेव्हां इंग्लंडांत सरदार पक्ष व व्यापारीशेतकरी पक्ष असे दोन पक्ष निर्माण झाले. व्यापारीशेतकरी पक्षाचें नेतृत्व क्रॉम्वेलनें पतकरिलें आणि सरदार पक्षाचा व राजाचा पाडाव केला. राजशाही मोडून लोकशाहीची स्थापना केली. ही लोकशाही लवकरच क्रॉम्वेलच्या लष्करशाहीच्या हातीं गेली व लोक तिला कंटाळले. पुनः राजशाही निर्माण झाली. पुनः राजा दुसरा जेम्स उन्मत्त झाला तेव्हां त्याला काढून दुसरा राजा तिसरा विल्यम गादीवर आला. पण यावेळी बिनरक्तपातानें क्रांति झाली.

यावेळपासून इंग्लंडांत एक नवी राज्यपद्धति अस्तित्वांत आली. या राज्यपद्धतीप्रमाणें राजा नामधारी बनला, मंत्रिमंडळ सत्ताधारी



बनलें आणि पार्लमेंटांत ज्या पक्षाचें बहुमत असेल, त्या पक्षाचें मंत्रिमंडळ बनवावें असें ठरलें. ज्यावेळीं या मंत्रिमंडळाचें बहुमत नष्ट होईल, तेव्हां त्यानें राजीनामे द्यावेत व ज्या पक्षाचें बहुमत असेल त्यानें मंत्रिमंडळ बनवावें अशी व्यवस्था झाली. याला जबाबदार मंत्रिमंडळाची पद्धति म्हणतात. हा एक शांततेनें राज्यक्रांति करण्याचाच मार्ग आहे असें ब्रिटिश लोक म्हणूं लागले. पार्लमेंटांत सभासद निवडण्याचा हक्क देशांतील सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांना असावा, त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधिसभेंत ज्या पक्षाचें बहुमत होईल त्या पक्षाचें मंत्रिमंडळ बनावें आणि त्या मंत्रिमंडाळाच्या हातीं सर्व सत्ता असावी. कायदे करण्याची, आव्ययाची आणि मंत्रिमंडळ काढण्या-नेमण्याची सत्ता प्रतिनिधिसभेला असली म्हणजे वाटेल त्या पक्षाला आपलें मत लोकांना पटवून कायदेशीर मार्गानें देशांतील राज्ययंत्र आपल्या हातीं घेतां येईल आणि जुलमी सरकार टिकणार नाहीं अशी आशा लोकांना वाटूं लागली. आतां लोकशाही राज्यांत प्रजेला सशस्त्र क्रांति करावीच लागणार नाहीं व कायदेशीर मर्यादांचें उल्लंघन न करतां वाटेल ती समाजरचना आपणांस निर्माण करतां येईल असें असें लोक मानूं लागले. प्रजाधर्मांतील राजकारणांत हिंसेची आवश्यकता उरली नाहीं, कारण अहिंसक क्रांतीचा मार्ग सांपडला.

पण ही आशा फार काळ टिकली नाहीं. प्रातिनिधिक संस्था धनिक वर्गाच्या हातीं जाऊं लागल्या आणि निवडणुकींत भांडवलदार वर्गच यशस्वी होऊं लागला. औद्योगिक क्रांति होऊन मोठमोठे कारखाने व पेढ्या निर्माण झाल्या. धनोत्पादनाचीं व उदरभरणाचीं सर्व साधनें छोट्या धनिक वर्गाच्या हातीं गेलीं व बहुसंख्य वर्ग निर्धन व गुलाम बनला. देशांतील संपत्तिमान वर्ग लोकशाही राज्ययंत्र काबीज करून सत्ताधारी बनला आणि दरिद्रि वर्ग त्याच्या राजकीय व आर्थिक दास्यांत गेला.

यानंतर समाजसत्ताक क्रांति करण्याची कल्पना पुढें आली. देशांतील सर्व धनोत्पादनाचीं साधनें कारखाने, खाणी, पेढ्या, शेतें सार्वजनिक मालकीचीं बनवावींत, राष्ट्रीय संपत्तीचे सर्वांना मालक बनवावें आणि सर्वांनीं उत्पादकश्रम करावेत, अशा श्रमप्रधान संस्कृतीचें ध्येय पुढें आलें. आजची संस्कृति धनप्रधान आहे, तींत सधन–निर्धन वर्गभेद विकोपास गेला आहे, सधनांना काम करण्याची गरज नाहीं आणि काम करणारांना धन मिळत नाहीं. यामुळें लोकशाही राष्ट्र दुभंगलें आहे व लोकशाहीला धनिकशाहीचें स्वरूप प्राप्त झालें आहे. यासाठीं समाजसत्ताक क्रांतीची आवश्यकता भासूं लागली.

पण ही क्रांति लोकशाही राज्यांत कायदेशीर मार्गांनीं होईल असें म्हणणारा एक सनदशीर समाजवादी पक्ष इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशांत निघाला होता. बरीच वर्षें खटपट करून त्याला असा अनुभव आला कीं, येवढी मोठी सामाजिक क्रांति लोकशाही राज्ययंत्राच्या आश्रयानेंहि होऊं शकत नाहीं. सनदशीर लोकशाहीचें राजकारण बारीकसारीक सुधारणा करण्यास उपयोगी पडलें तरी तें समाजांत आमूलाग्र परिवर्तन करण्यास उपयोगी पडत नाहीं. तेव्हां पुनः क्रांति कार्याला हिंसेची आवश्यकता भासूं लागली व प्रजाधर्मांत हिंसावाद बळावूं लागला.

## समाजसत्ताक क्रांतिः वर्गयुद्धः—

समाजसत्ताक क्रांति कायदेशीर मार्गांनीं घडून येत नाहीं व भांडवलदार लोकशाही धनिकवर्गाच्या हातीं जाते, असें सिद्ध झाल्यावर कामगार वर्गाला संघटित करून सशस्त्र क्रांतीनें समाजसत्तेची स्थापना करण्याचें तत्त्वज्ञान शास्त्रीय समाजवाद या नांवानें पुढें आलें. या तत्त्वाप्रमाणें रशियांत क्रांति झाली व अनियंत्रित कामगारशाही स्थापन झाली. याच धर्तीवर सर्व जगांत समाजसत्ताक क्रांति करण्याचे प्रयत्न गेलीं वीस वर्षें युरोपांत व आशियांत अनेक देशांत झाले. या प्रयत्नांना रशियावाचून कोठेंहि यश आलें नाहीं व वर्गयुद्ध माजल्यास निर्धन वर्गाच्या हातीं राज्ययंत्र येण्याऐवजी वरिष्ठ धनिक वर्गच तें हस्तगत करतो असेंहि दिसूं लागलें. प्रत्यक्ष रशियांतहि सशस्त्र क्रांतीनंतर जें राज्ययंत्र स्थापन झालें, तें एका गटाच्या हातीं जाऊन अनियंत्रित नोकरशाहीचा जुलूम प्रजेला अनुभवास येत आहे. यामुळें सशस्त्र क्रांतीवाचून क्रांति करण्याचा कांहीं मार्ग आहे काय असा विचार प्रजेचें राजकारण करणाऱ्यांना सुचूं लागला आहे.



## सत्याग्रही क्रांतिशास्त्र

गेल्या वीस वर्षांत हिंदुस्थानांत सत्याग्रह नांवाचें एक क्रांतितंत्र वाढत आलें असून या काळांत हिंदी प्रजेचें राजकारण करणारे इतर पक्ष मागे पडून या तंत्राचा आश्रय करणारा राष्ट्रसभापक्ष बराच पुढें आला आहे. हिंदुस्थान हा आपणांस लोकशाही संस्कृतीचे अभिमानी समजणाऱ्या ब्रिटिश राष्ट्राच्या साम्राज्यांतील एक जित देश आहे. येथील प्रजेच्या पुढाऱ्यांनीं लोकशाही राष्ट्र निर्माण करण्याच्या आकांक्षेनें पंन्नासपंचावन वर्षांपूर्वीं १८८५ मध्ये राष्ट्रसभा ही संस्था स्थापन केली. तिचे पहिले पुढारी इंग्लंडांतील सनदशीर राजकारणाचे चहाते होते. ते स्वतःस प्रागतिक व नेमस्त म्हणवीत. पुढें वीस वर्षांनीं १९०५ नंतर तिच्यांत एक राष्ट्रीय म्हणविणारा जहाल पक्ष निर्माण झाला. त्याचा सनदशीर राजकारणावर विश्वास नव्हता, तरीहि सशस्त्र क्रांतीचा मार्ग आपणांस अशक्य आहे असेंहि त्याला दिसत होतें. त्यानें बहिष्कार, निःशस्त्रप्रतिकार, कायदेभंग, करबंदी यासारखा अडवणुकीचा कार्यक्रम देशापुढें ठेविला व निर्भेळ स्वराज्याचें ध्येय

पुकारलें. तथापि या पक्षाला हें कार्य यशस्वी करतां आलें नाहीं. लो० टिळक यांनीं १९१७ सालीं राष्ट्रसभा या राष्ट्रीय पक्षाच्या हातीं आणून दिली व ते १९२० सालीं निधन पावले.

१९२० सालीं म० गांधींनीं राष्ट्रसभेचें नेतृत्व स्वीकारलें. बहिष्कार, कायदेभंग, करबंदी हा पूर्वीच्या राष्ट्रीय पक्षाचा सर्व कार्यक्रम त्यांनीं घेतला, पण त्याला असहकार हें नांव दिलें. अन्यायाशीं, असत्याशीं, आसुरी सत्तेशीं असहकार, या आध्यात्मिक वृत्तीनें त्यांनीं हिंदी प्रजेचा लढा पुढें चालविला. निःशस्त्र प्रजाहि असहकार व कायदेभंग यांचा आश्रय करील तर देशांत क्रांति करील व संपूर्ण स्वातंत्र्य मिळवूं शकेल, मात्र तिनें अनत्याचाराचें व अहिंसेचें व्रत स्वीकारलें पाहिजे, असें त्यांनीं राष्ट्रसभेपुढें मांडिलें. गेल्या महायुद्धानंतर स्वराज्याच्या कामीं पूर्ण फसगत झालेल्या आणि अन्यायानें व जुलमानें गांजलेल्या निःशस्त्र हिंदी प्रजेला सशस्त्रक्रांति करणें शक्यच नव्हतें. सनदशीर राजकारण पसतीस वर्षांच्या अनुभवानें निष्फळ ठरलें होतें. अशा अवस्थेंत राष्ट्रसभेनें स्वराज्यप्राप्तीसाठी व्यवहार्य क्रांतिशास्त्र, म्हणून सत्याग्रहाचा स्वीकार केला. या वेळपासून म० गांधींचें नेतृत्व तिनें स्वीकारिलें आहे. तरीहि समग्र गांधीवादाचा राष्ट्रसभेनें अद्यापि स्वीकार केलेला नाहीं. हिंदी प्रजेला राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांची प्राप्ति सत्याग्रहानें होईल अशी तिची दृढनिष्ठा आहे. ही प्राप्ति झाल्यानंतर राष्ट्रसभेनें राज्ययंत्र हस्तगत केल्यास सरकार या नात्यानें राजधर्मांतील अपरिहार्य हिंसा तिला करावी लागेल, ती तिनें करावी कीं राजधर्माची जबाबदारी मुळीच अंगावर न घेतां केवळ प्रजेचें आत्मबल संघटित करण्याचें प्रजाधर्माचेंच कार्य करीत राहावें, यासंबंधीं राष्ट्रसभेंत तीव्र मतभेद आहेत. तसेंच युद्धसंस्था जगांतून नष्ट करण्याच्या कामीं आपण पुढाकार



घ्यावा असें तिचें मत असलें, तरी आपल्या देशावर परचक्र आलें असतां आपण सशस्त्र युद्धाचा अवलंब करूं नये अथवा तसें करण्याच्या प्रयत्नांत इतरांशीं सहकार्य करूं नये, असेंहि सर्व राष्ट्रसभा आज म्हणत नाहीं. तथापि कोणत्याहि राज्यांत क्रांति करण्यास सत्याग्रहाचा उपयोग होऊं शकेल आणि जित राष्ट्रांना स्वतंत्र बनण्यासहि तें एक सर्वश्रेष्ठ साधन आहे असें राष्ट्रसभेचेंहि मत आहे.

गांधीवाद याच्यापुढें जाऊन असें म्हणतो कीं, कोणत्याहि राष्ट्राला सत्याग्रहानें आपलें रक्षण करतां येत नसेल तर सशस्त्रयुद्धानें तसें करणें हें त्याचें कर्तव्य आहे हें खरें असलें, तरी सशस्त्रयुद्धानें राष्ट्रीयस्वातंत्र्य व लोकशाही यांचें रक्षण करण्याचाहि काळ आज उरलेला नाहीं. जगांतील दोन चार राष्ट्रें सोडलींतर आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य रक्षण करण्याइतकें शस्त्रबल व धनबल कोणत्याहि राष्ट्रांपाशीं नाहीं. अर्थात् अशांना आपलें राष्ट्रीयस्वातंत्र्य रक्षण करण्यास शस्त्रबलाहून श्रेष्ठ असें साधन शोधून काढिलेंच पाहिजे. हें साधन आपण शोधून काढिलें आहे व त्याचेंच नांव सत्याग्रह. सत्याग्रहानें परकीय सरकारशीं कसें लढावें हें राष्ट्रसभेनें आजपर्यंत हिंदीप्रजेला शिकविलें आहे. तेंच कार्य तिनें तसेंच पुढें चालवावें. ज्यांचा सत्याग्रहावर विश्वास नसेल त्यांनीं राष्ट्ररक्षणार्थ राजधर्मांतील परंपरागत हिंसेचा वाटेल तर आश्रय करावा, पण आपण त्यांत भाग घेऊं नये आणि चालू महायुद्धांतून अंग काढून घेऊन तटस्थता जाहीर करावी. धनिकशाही, लष्करशाही व हिटलरशाही नष्ट करण्याचा मार्ग सत्याग्रह हाच असून सर्व जगांतील प्रजेला सत्याग्रहाची दीक्षा देण्यानेंच आजच्या जगांतील साम्राज्यें व त्यांतून उद्भवणारीं युद्धें थांबतील. एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील आणि एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावरील वर्चस्व नष्ट करण्यानें युद्धें थांबतील व हें वर्चस्व नष्ट करण्यास

सत्याग्रह हाच एक मार्ग आहे. या सत्याग्रहाची संघटना करण्याचें शिक्षण प्रजेला देणें हेंच राष्ट्रसभेचें कार्य असून निदान युद्ध चालू असेंपर्यंत तरी राष्ट्रसभेनें देशांतील राज्ययंत्र आपल्या हातीं घेऊं नये व युद्धांत सामील होऊं नये. अर्थात् आपल्या राष्ट्रावर परचक्र आलें तर तसें करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांची अडवणूक राष्ट्रसभेनें जाणून बुजून करूं नये किंवा जे सत्याग्रही नसतील त्यांना राष्ट्ररक्षणाच्या कर्तव्यापासून परावृत्तहि करूं नये.

## लोकशाही व युद्धः

गांधीवादाचें आणखी असें म्हणणें आहे कीं, जीं राष्ट्रें आज सशस्त्र युद्ध करून लोकशाहीचें संरक्षण करूं म्हणत आहेत त्यांना युद्धांत विजय मिळविण्यासाठीं अंतर्गत लोकशाहीहि नष्ट करून लष्करशाही उभारावी लागत आहे. इतकेंच नाहींतर आपल्या साम्राज्यांतील देशांतील लोकशाही नष्ट करावी लागत आहे. अशा मार्गांनीं विजयी झालेलीं हीं राष्ट्रें युद्धांतीं लोकशाहीची पुरस्कर्तीं राहाणार नाहींत. युद्ध आणि लोकशाही या संस्था परस्परांना मारक आहेत तेव्हां लोकशाही राष्ट्रांनीं आपलें राष्ट्रीयत्व, व लोकशाही यांच्या रक्षणार्थ सशस्त्र युद्धाऐवजी निःशस्त्र युद्धाचा म्हणजेच सत्याग्रहाचा मार्ग अनुसरला पाहिजे. सत्याग्रहानेंच लोकशाहीचें संरक्षण होईल, इतकेंच नाहींतर एका राष्ट्रावरील दुसऱ्या राष्ट्राचें व एका वर्गावरील दुसऱ्या वर्गाचें आर्थिक व राजकीय वर्चस्व नष्ट होईल आणि युद्धसंस्थाहि नष्ट होऊन शस्त्रसंन्यासाचें ध्येय अमलांत आणतां येईल. राष्ट्रसभेला हीं तत्त्वें अंतिम दृष्ट्या मान्य असलीं, तरी याबाबतींत म० गांधींच्या मागोमाग जाण्या इतकें आत्मबल अद्यापि आपल्या राष्ट्रांत आलेलें नाहीं असें तिला वाटतें. शस्त्रसंन्याशाच्या कामीं पुढाकार घेण्याचें तत्त्व



तिनें मान्य केलें आहे, तरी त्याची अंमलबजावणी आंतर्बाह्य अनेक परिस्थितींवर अवलंबून आहे अशी मर्यादा तिनें घातलेली आहे. तात्पर्य राष्ट्रसभा ही क्रांतिशास्त्र या दृष्टीनें सत्याग्रहाचा स्वीकार करीत असली तरी परचक्रनिवारणाच्या बाबतींत सत्याग्रहाचा उपयोग करण्यासंबंधी तिचें मत गांधीवादाहून भिन्न आहे.

आज राष्ट्रसभेनें जो युद्धविरोधी सत्याग्रह सुरू केला आहे, त्यांत दोन प्रकारचे सत्याग्रही आहेत. कोणत्याहि युद्धाशीं असहकार करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें मानणारे सत्याग्रही आणि हें युद्ध साम्राज्यशाही किंवा भांडवलशाही यांचें रक्षण करण्यासाठीं आहे, म्हणून त्यांत भाग घेणें हा अपराध आहे, असे मानणारे सत्याग्रही गांधीवाद्यांचा समावेश पहिल्यावर्गांत होतो आणि राष्ट्रवाद्यांचा व समाजवाद्यांचा समावेश दुसऱ्या वर्गांत होतो. राष्ट्रीय स्वातंत्र्याची शाश्वति मिळाली कीं, राष्ट्रवाद्यांचा युद्धविरोध थांबेल. तरीहि हें राष्ट्रीय स्वातंत्र्य भांडवलशाही स्वरूपाचें आहे व साम्राज्यशाहीचें मूळ भांडवलशाहींत असल्यानें हें खरें स्वातंत्र्य नव्हे, अशा वृत्तीनें समाजवादी युद्धविरोध चालू ठेवूं शकतील. जोपर्यंत युद्धोत्तर जगांत भांडवलशाही टिकण्याचा संभव आहे तोंपर्यंत आम्ही युद्धाशीं सहकार्य करणार नाहीं असें समाजवादी म्हणूं शकतील. ते सत्याग्रही असल्यास त्यांचा युद्धविरोध अथवा युद्धाशीं असहकार राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनें थांबणार नाहीं. पण गांधीवादी आपला युद्धविरोध केव्हांच थांबविणार नाहींत, कारण आजच्या जगांतील प्रत्येक युद्ध हें भांडवलशाही, साम्राज्यशाही व लष्करशाही यांनाच सुस्थिर बनवील व लोकशाही नष्ट करील अशी त्यांची श्रद्धा आहे.

आपल्या राष्ट्रांतील व इतर राष्टांतील सामान्य जनतेला आपल्या वरील राजकीय व आर्थिक जुलमाविरुद्ध शांततेनें संघटित प्रतिकार

करण्याचें शिक्षण देणें, जुलमी कायदे मोडून अन्यायाचें निवारण करण्यास प्रजेला प्रवृत्त करणें, आर्थिक स्वावलंबन आणि स्वदेशी या तत्त्वांवर समाजाची आर्थिक घटना निर्माण करणें, प्रत्येक राष्ट्र, राष्ट्रविभाग व गांव शक्य तितकें औद्योगिक दृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणें, आर्थिक व्यवहारांत मोहाला व लोभाला वश न होतां न्यायदृष्टीनें वागण्याचें व अन्यायाचा प्रतिकार करण्याचें शिक्षण लोकांना देणें इत्यादि अनेक मार्गांनीं जनतेची विधायक व लढावू संघटना करणें, हाच नवें जग निर्माण करण्याचा मार्ग आहे असें गांधीवादी समजतात. खेड्यापाड्यांतील लोकांची स्वावलंबन व स्वयंपूर्णता या तत्त्वांवर आर्थिक संघटना करणें हा सत्याग्रहाचा पाया आहे असें म० गांधी मानतात व त्याच दृष्टीनें ग्रामोद्योग, खादी आणि सूत कातणें या कार्यक्रमाला तें सत्याग्रहांत आद्यस्थान देतात. या विषयाचा विचार पुढें स्वतंत्रपणें करण्यांत येईल.

## अहिंसक क्रांतीची पूर्वपीठिका

आज सत्याग्रहाचा प्रयोग जरी फक्त हिंदी जनताच करीत असली तरी अहिंसक क्रांति आणि केवळ अहिंसाबलावर चालणारा समाज या कल्पना बऱ्याच जुन्या आहेत. राज्यकर्त्यांच्या जुलमामुळें राजकीय क्रांतीचीं ध्येयें निर्माण होतात, त्याचप्रमाणें क्रांतिकारकांच्या अत्याचारांमुळें अनत्याचारी क्रांतीचें ध्येय जन्मास येत असतें. फ्रेंच रेव्होल्यूशन ही क्रांति अठराव्या शतकाच्या अखेरीस झाली. या क्रांतींतून नेपोलियनची लष्करशाही निर्माण झाली, हें पाहून इंग्लंडांतील गोड्विन या राज्यशास्त्रज्ञाला अहिंसक क्रांति आणि हिंसाबलावाचून चालणारा समाज यांची कल्पना सुचली. या दोनहि कल्पना गोडविन् याच्या " Political Justice " (राजकीय न्याय) या ग्रंथांत त्यानें



शास्त्रीय पद्धतीनें मांडिल्या असून इंग्लंडांतील वर्डस्वर्थ, शेले वगैरे कवींनीं त्यांना आपल्या काव्यांत अमरस्तान निर्माण करून दिलेलें आहे. शेलेनें आपल्या "Revolt of Islam" या काव्यांत सामान्य जनतेला जुलमी वर्गांविरुद्ध अहिंसात्मक वृत्तीनें लढून सर्व जुलमांतून आपली कायमची मुक्तता करून घेण्याचा उपदेश केलेला आहे. शेलेच्या विचारांवर गोड्विनच्या ग्रंथांचा फार परिणाम झालेला होता. तथापि शेले किंवा गोड्विन् यांच्या विचारांत बुद्धिबल व आत्मबल यांतील भेद फारसा विशद झालेला नव्हता. अहिंसक क्रांतीला बुद्धिबलापेक्षां आत्मबलाची—म्हणजे निरहंकार, निर्ममवृत्तीनें मतें बनवून त्यासाठीं अनासक्त बुद्धीनें आत्माहुति देण्याची—अधिक आवश्यकता लागते. हें आत्मबल जागृत करावयाचें तर संयम, मनोनिग्रह आणि इंद्रियविजय ही संतप्रवृत्ति जागृत करावी लागते.

रशियांतील झारशाही आणि तिचा सशस्त्र मार्गांनीं प्रतिकार करणारे क्रांतिकारक, या दोघांच्या अत्याचारांना पाहून समाजांत न्यायप्रस्थापना व्हावयाची असेल तर ती अनत्याचारी क्रांतीनेंच होत जाईल आणि त्या प्रयत्नांतूनच अखेरीस केवळ आत्मबलावर चालणारा दंडहीन मानवसमाज निर्माण होईल, ही कल्पना कौंट टॉलस्टॉय याला सुचली. त्याच्या ग्रंथांत सत्याग्रही क्रांतीच्या कल्पना विशद रीतीनें मांडलेल्या आढळतात व म० गांधींच्या चारित्र्यावर, जीवनावर व विचारांवर टॉलस्टॉयच्या लेखनाचा फार परिणाम झालेला आहे. तथापि टॉलस्टॉयच्या अंगीं आपले विचार अमलांत आणून क्रांतिकार्याचें नेतृत्व करण्याचें कर्मकौशल्य दिसून येत नाहीं. रशियांतील क्रांतिकारकांचें नेतृत्व करण्याचा त्यानें कधीं प्रयत्नहि केला नाहीं अथवा अहिंसक क्रांतिकारक पक्ष स्वतंत्रपणें संघटित करण्याचेंहि कार्य त्याच्या हातून घडलें नाहीं. यामुळें अहिंसक क्रांतीच्या

टॉलस्टॉयच्या कल्पना व्यावहारिक राजकीय क्षेत्रांत अवतरूं शकल्या नाहींत.

म. गांधी हे जसे ख्रिस्ताप्रमाणें वा बुद्धाप्रमाणें निर्भेळ सत्य-अहिंसेचे उपासक आहेत, त्याचप्रमाणें श्रीकृष्णाप्रमाणें ते एक झुंझार कर्मयोगी आहेत. आपला उच्चतम ध्येयवाद व्यवहार क्षेत्रांत आणण्याचे सतत प्रयत्न करीत राहणें हाच आत्मोन्नतीचा व समाजोन्नतीचा खरा मार्ग आहे हें ते ओळखतात. व्यावहारिक क्षेत्रांतील अडचणी ते ओळखूं शकतात, इतकेंच नाहींतर समाजांत जोंपर्यंत पुरेसें आत्मबल निर्माण झालेलें नाहीं तोंपर्यंत हिंसाबलाचा उपयोग करून त्याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारे राजकीय नेते हेहि समाजाची सेवाच करीत आहेत व प्रत्येक व्यक्तीनें व समाजानें आपल्या अधिकारानुसार आपला धर्म ठरवावा व सतत कर्म करीत राहावें, असें त्यांचें मत आहे. यामुळें ज्यांना आत्मबलानें आत्मरक्षण किंवा समाजरक्षण करतां येत नसेल, त्यांनीं शस्त्रबलानें तसें करणें हें त्यांचें कर्तव्य आहे असेंहि ते मानतात व तसें बोलूनहि दाखवितात. अहिंसाबल वाढत जाईल त्या मानानेंच शस्त्रबल निरुपयोगी ठरत जाईल अशी त्यांची सापेक्ष दृष्टि असल्यानें ते सशस्त्र युद्धाचें व सशस्त्र क्रांतीचेंहि सापेक्ष समर्थन करतात. मात्र स्वतः त्यांनीं आपला धर्म ठरवून घेतला आहे व जनतेला अहिंसक क्रांति करण्याचें शिक्षण देणें हेंच आपलें अंगीकृत कार्य असें ते मानतात. या आपल्या अंगीकृत जीवनकार्यास भरतभूमि हीच अधिकांत अधिक अनुकूल भूमि आहे व अहिंसक क्रांतीचा पहिला मोठा प्रयोग येथेंच यशस्वी होईल अशी त्यांना आशा आहे. ही आशा गेलीं वीस वर्षें प्रत्यक्ष अनुभवानें एकसारखी वाढत आली असून ती लवकरच सफल होईल अशी त्यांची श्रद्धा आहे.



राष्ट्रसभेचें नेतृत्व त्यांच्या हातीं जाण्यापूर्वी राष्ट्रसभेंतील राष्ट्रीय पक्षानें बहिष्कारयोगाच्या नांवानें निःशस्त्र क्रांतीचा मार्गच आपल्या परिस्थितींत व्यवहार्य व प्रभावी होऊं शकेल असें निदान केलें होतें. पण निःशस्त्र क्रांति यशस्वी होण्यास जें आत्मबल लागतें त्याच्या प्रभावावर विश्वास असणारा लोकनायक राष्ट्रसभेला लाभलेला नव्हता. लो. टिळक किंवा योगी अरविंद यांच्या भाषणांत व लेखांत निःशस्त्र क्रांतीचें विवेचन आढळतें व तेंच धोरण आपणास अनुरूप आहे असा निर्णयहि दिसून येतो, परंतु भगवद्गीतेनें केलेल्या राजधर्मातील अपरिहार्य हिंसेचा उपदेश त्यांच्या अंतःकरणावर इतका ठसलेला होता कीं, आत्मबलाचा भावरूप प्रभाव राजकीय क्षेत्रांत कोणत्या मार्गानीं पाडावा याची बरोबर कल्पना त्यांना असल्याचें दिसत नाहीं. म. गांधी हे राजकीय कर्मयोगी आहेत, तरी ते राजधर्मानें भारलेले नाहींत. समाजधारणेंत राजधर्माला आद्यस्थान नसून यतिधर्माला व प्रजाधर्माला आद्यस्थान आहे व समाजाची धारणा राजधर्मातील हिंसेनें होत नसून प्रजाधर्मातील अहिंसेनें होत असते, अशी त्यांची दृष्टि आहे.

प्रजेला खरें स्वातंत्र्य अहिंसेच्या आश्रयानेंच उपलब्ध होईल अशी त्यांची श्रद्धा असल्यानें प्रजेचें राजकारण करण्यांत ते मागील सर्व पुढाऱ्यांच्या व तत्त्वचिंतकांच्या पुढें गेलेले आहेत. लोकशाहीचे ते अनन्य भक्त असून हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे या देशांतील राजेरजवाडे सम्राटबादशहा यांच्या आपापसांतील लढायांचा इतिहास नसून या देशांतील ग्रामसंस्था व जातपंचायती यांचा आश्रय करून छोटीं छोटीं लोकशाही राज्यें चालवून आर्थिक स्वयंपूर्णतेनें व शांततेनें, धार्मिक सहिष्णुतेनें व आध्यात्मिक संतुष्टतेनें एकमेकांशीं प्रेमानें वागणाऱ्या कोट्यवधि जनतेचा इतिहास असें ते समजतात. साम्राज्यलालसा आणि धनातितृष्णा हा मानवस्वभाव सामान्य

जनतेचा नसून त्यांतून निर्माण होणारी हिंसा आणि अत्याचार टिकावू नाहीत. मानव संस्कृतीच्या ऐतिहासिक प्रवाहाच्या पृष्ठभाग-वरील या लाटा किंवा भोवरे कितीहि प्रचंड दिसले, तरी त्यांच्याखाल अथांग जलनिधि पसरलेला असून तिकडे लक्ष देऊनच त्या सागराच्या धीर गंभीर स्वरूपाचें खरें ज्ञान होऊं शकतें. हें ज्ञान ज्याला झा त्याला मानव संस्कृतीचें खरें अधिष्ठान सत्य व अहिंसा हेंच आहे त्या आधारावरच प्रजाधर्मांतील खरें क्रांतिशास्त्र निर्माण होईल, हें सम शकेल. लोकसत्तावाद आणि समाजसत्तावाद हीं जीं क्रांतिकार तत्त्वज्ञानें आधुनिक काळांत निर्माण झालीं आहेत, त्यांना अभि असणारीं स्वातंत्र्य, समता व बंधुभावना हीं ध्येयें प्राप्त करून घेण्य हिंसावादी राजधर्म उपयोगी पडणार नसून प्रजाधर्मांतील अहिंसावा क्रांतिशास्त्रच उपयोगी पडेल असें गांधीवादाचें मत आहे.

## जागतिक क्रांतिवादः—

गांधीवाद हा एक आंतरराष्ट्रीय क्रांतिवाद आहे. राष्ट्रधर्माच्या प कडे तो गेलेला आहे. आधुनिक काळांत लोकसत्ताक क्रांतिवाद समाजसत्ताक क्रांतिवाद असे जे दोन क्रांतिवाद प्रजाधर्मांतून निर्मा झाले तेहि आंतरराष्ट्रीय क्रांतिवादच आहेत, कारण आजच्या जग राष्ट्रभेद भौतिक दृष्ट्याच नामशेष होऊं लागले असून राष्ट्रवादाच्या संकुचित मर्यादांचें उल्लंघन केल्यावाचून कोणताहि खरा क्रांतिव यशस्वी होऊं शकतच नाहीं. तथापि गांधीवादानें हेंहि ओळखिले आहे कीं प्रत्येक क्रांतिवादानें आपली कार्यक्षेत्राची मर्यादा राष्ट्र राज्य यांच्या मर्यादांनीं आखून घेतली पाहिजे. सत्याग्रहाचें क्रां शास्त्र सर्व जगांत फैलावणारें असलें तरी त्याचें तंत्र प्रत्येक राष्ट्रांत व राज्यांतील विशिष्ट परिस्थितीनें निबद्ध व विशिष्ट आक



राचें बनावें लागेल. या क्रांतिशास्त्राचें ध्येय जुनें जग नष्ट करून नवें जग निर्माण करणें हें असलें तरी हें नवें जग निर्माण करण्यास प्रत्येक राज्यांत व राष्ट्रांत सत्याग्रही क्रांतिकारक निर्माण झाले पाहिजेत व आपापल्या परिस्थितीस अनुरूप अशा रीतीनें आपल्या राज्यसंस्थेंत व समाजजीवनांत क्रांति घडवून आणिली पाहिजे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रसभेचा ब्रिटिश साम्राज्याशी स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा हा एक नव्या जगाच्या निर्मितीचा जगाच्या डोळ्यांत भरण्यासारखा पहिला सत्याग्रही लढा आहे. तो यशस्वी होण्यावर सत्याग्रही क्रांतिवादाचें व त्याला अभिप्रेत असणाऱ्या नव्या जगाच्या निर्मितीचें भवितव्य बरेंच अवलंबून आहे.

---

# गांधीवादी क्रांतितंत्र आणि राष्ट्रसभा : : ३

इ. स. १९१५ मध्ये म० गांधी दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा लढा यशस्वी करून हिंदुस्थानांत आले. हिंदुस्थानांत वंगभंगाविरुद्ध चळवळ चालली होती त्याचवेळीं दक्षिण आफ्रिकेंत म० गांधींनीं सत्याग्रहाचा लढा चालविला होता. इ० स० १९०६ पासून १९१३ पर्यंत हा लढा चालला व त्यांत त्यांना यश मिळालें. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना समानतेचे हक्क मिळाले असा या यशाचा अर्थ नाहीं, तर एका विशिष्ट कायद्याविरुद्ध जो लढा चालला होता त्यांत यश मिळालें आणि तेथील हिंदी लोकांना

आपला स्वाभिमान रक्षण करून हक्क संपादन करण्यासाठीं लढण्याचें एक विशिष्ट तंत्र उपलब्ध झालें. याच लढ्याच्या तंत्राचा उपयोग करून हिंदी लोकांना स्वराज्याचा लढा यशस्वी करतां येईल अशी म० गांधींना श्रद्धा वाटत होती, व ती त्यांनीं १९०९ सालीं मद्रास येथें भरलेल्या हिंदी राष्ट्रसभेला पाठविलेल्या संदेशांत व्यक्त केली होती. याचवेळीं त्यांनीं ' हिंद स्वराज्य ' या नांवाचें एक छोटेसें पुस्तक लिहिलें होतें. त्यांतहि हिंदुस्थानला सत्याग्रहानेंच स्वराज्य प्राप्त करून घेतां येईल, प्रागतिकांच्या केवळ बुद्धिबलाच्या मार्गानें अथवा सशस्त्रक्रांतीच्या मार्गानेंहि हा प्रश्न सुटणार नाहीं असें त्यांनीं प्रतिपादन केलें होतें. या बहुमोल लघुग्रंथांत मानव संस्कृतीसंबंधीं आधुनिक युरोपीय संस्कृतीसंबंधींची त्यांचीं मतें व्यक्त झालेलीं आहेत. सामान्य जनतेचें लोकशाही राज्य स्थापन करण्यास सशस्त्र क्रांतीचा मार्ग उपयोगी पडणार नाहीं, त्या मार्गानें स्वराज्य मिळालें तरी तें देशांतील लष्करशाही व सरंजामदार वर्ग यांच्या हातीं जाईल व सामान्य जनतेवरील जुलुम कमी होणार नाहीं असेंहि त्यांनीं आपलें मत त्यांत व्यक्त केलें आहे. इटालींतील स्वराज्य मॅझिनीच्या अपेक्षेप्रमाणें झालें नाहीं, यावरून खरें लोकशाही स्वराज्य जनतेच्या सशस्त्र प्रतिकारांतून निर्माण होऊं शकणार नाहीं तर तें तिच्या संघटित आत्मबलांतूनच निर्माण होऊं शकेल, असा निष्कर्ष त्यांनीं या पुस्तकांत काढिला आहे. तसेंच युरोपीय देशांतील व विशेषतः इंग्लंडांतील लोकशाही ही धनिकशाहीची बटीक बनलेली आहे, युरोपीय संस्कृति धनबल व शस्त्रबल यांच्या आहारीं जाऊन आसुरी बनूं लागली आहे व तिचा विनाश लवकरच होणार आहे, हेंहि त्यांनीं त्या पुस्तकांत दाखवून दिलें आहे. त्याचप्रमाणें हिंदी जनता आपलें संरक्षण आत्मबलानें करूं शकेल, त्यासाठीं तिला ब्रिटिशांच्या शस्त्रबलाची



आवश्यकता नाहीं आणि ब्रिटिशांच्या लष्करानें स्थापन केलेल्या स्मशान शांततेपेक्षां स्वराज्यांतील दंगेधोपे किंवा अशांततामय जीवन हें अधिक मानार्ह आणि अधिक उन्नतिकारक आहे असेंहि त्यांनीं त्यांत प्रतिपादिलें आहे. ब्रिटिशांच्या संगिनींवांचून आपण आपलें संरक्षण करूं शकूं आणि सर्व जातींचें व धर्मांचें ऐक्य करून शांतता स्थापन करूं शकूं, हा आत्मविश्वास धारण केल्यावांचून आपण स्वतंत्र होणार नाहीं व हा आत्मविश्वास केवळ आत्मबलाची प्रतीति आल्यानेंच सामान्य जनतेंत येऊं शकेल. युरोपीय राष्ट्रें जनतेला सशस्त्र प्रतिकाराचें व शस्त्रग्रहणाचें शिक्षण देत आहेत, पण त्यांतून लोकशाहीची खरी जोपासना होणार नाहीं. असहकारानें व सविनय कायदेभंगानें, म्हणजेच सत्याग्रहानें, आपल्यापुढें राजसत्तेला नमविणारें आत्मबल जागृत, संघटित व प्रभावी बनविणें हाच राजकीय जुलमाचा अंत करून खरी लोकशाही निर्माण करण्याचा मार्ग असून सत्याग्रहानें राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही संस्कृति निर्माण करण्याचा प्रयोग यशस्वी करण्यास हिंदुस्थान सर्वांत अधिक अधिकारी आहे असें म. गांधींनी १९१५ सालीं येथें येण्यापूर्वींच आपल्या मनाशीं ठरविलें होतें. मात्र सत्याग्रहाचा हा अभिनव प्रयोग केव्हां सुरू करावयाचा, तो कोणत्या प्रकारें करावयाचा आणि तो कोणत्या लोकांच्या सहकार्यानें करावयाचा यासंबंधीं त्यांचे विचार निश्चित व्हावयाचे होते. तात्पर्य त्यांचें क्रांतिशास्त्र तयार झालेलें असलें तरी भारतीय क्रांतितंत्र येथें आल्यावर तयार व्हावयाचें होतें. येथील परिस्थितीचें पूर्ण निरीक्षण केल्यावाचून आपण कोणतेंहि पाऊल टाकावयाचें नाहीं व म्हणून दोन वर्षेपर्यंत आपण कोणतीहि राजकीय चळवळ करावयाची नाहीं, असेंहि त्यांनीं ठरविलें होतें. येथील राज्यकर्त्यांचें धोरण काय आहे, राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांचीं धोरणें काय आहेत आणि जनतेची वृत्ति

कशी आहे याचें सूक्ष्म निरीक्षण त्यांनीं १९१७ पर्यंतच्या काळांत केलें. राष्ट्रसभेच्या प्रत्येक अधिवेशनास ते उपस्थित राहिले आणि १९१७ च्या एप्रिल महिन्यांत त्यांनीं चंपारण्यांतील निळीच्या मळ्यांतील शेतकऱ्यांची चळवळ करून सत्याग्रहाचा पहिला लढा हिंदुस्थानांत यशस्वी केला. चंपारण्यांतील लढा यशस्वी करून ते गुजराथेंत परत येतात, तों खेडा जिल्ह्यांत दुष्काळ पडला असून चुकीची आणेवारी केलेली आहे असें त्यांना दिसून आलें. त्यासाठी १९१८ च्या प्रारंभीं त्यांना खेडा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना सत्याग्रह करण्याचा उपदेश करावा लागला. ही चळवळहि थोडेच दिवसांत यशस्वी झाली. हें यश मिळाल्यानंतर म० गांधी दिल्लीस भरलेल्या युद्ध परिषदेला हजर राहिले व तेथून परत येतांच त्यांनीं व्हाईसरॉयला एक सविस्तर पत्र लिहिलें. त्यांत ते लिहितात :

" ही परिषद म्हणजे माझ्या मतें व आमच्यापैकीं पुष्कळांच्या मतें एका सामान्य कार्यास आपलीं जीवितें वाहून घेण्याची पहिली पायरी आहे. पण आमची स्थिति थोडी विशेष प्रकारची आहे, साम्रा ज्याच्या भागीदारींत आमचा अद्यापि प्रवेश व्हावयाचा आहे. भविष्य कालीन आशेवर आम्ही आपलीं जीवितें वहात आहों..........ह आशा सफल करावी असा सौदा मी मांडत नाहीं, तरीहि हें जाणणे योग्य आहे कीं, ही आशा भग्न होणें म्हणजे आमचा भ्रमनिरा होण्यासारखेंच आहे. आम्ही जर साम्राज्याच्या रक्षणार्थ सेवा केली तर त्याच कृतीमुळें स्वराज्यहि मिळत आहे, असें आम्हांस अनुभवितां आलें पाहिजे. " स्वराज्याच्या चळवळींसंबंधीं इतकें लिहू झाल्यावर घरगुती भांडणें मिटविण्याची विनंति व्हाईसरॉयांनीं केली होती त्यासंबंधीं ते याच पत्रांत लिहितातः—" आपलीं घरगुती भांडे मिटविण्याची आपण विनंति केली आहे, पण या विनंतीचा अर्थ ज



अधिकाऱ्यांचे अन्याय व जुलूम आम्ही सहन करावेत असा असेल तर ती मान्य करणें माझ्या शक्तीबाहेरचें काम आहे. संघटित जुलमाचा प्रतिकार, माझें सर्व बल खर्चीं घालून, मी करीत राहीन. अधिकाऱ्यांनीं कोणत्याहि जीवावर अन्याय करूं नये आणि पूर्वीं कधीहि दिला नव्हता इतका मान लोकमताला देऊन राज्यकारभार करूं लागावें, अशी विनंति अधिकाऱ्यांस आपण केली पाहिजे. चंपारण्यांत चालू असलेल्या जुलमांचा प्रतिकार करून मी ब्रिटिश न्यायदेवतेचें श्रेष्ठत्व व्यक्त करून दाखविलें आहे. खेडा जिल्ह्यांत जी जनता सरकारला शाप देत होती, तिलाच आज असें वाटूं लागलें आहे कीं, आपणांस पटलेल्या सत्यासाठीं कष्ट सोसण्यास जर आपण तयार होऊं तर सरकार सत्ताधारी दिसत असलें, तरी खरे सत्ताधारी आपणच आहों. यामुळें जनतेच्या मनांतील तेढ आज नाहींशी होत आहे व ती म्हणत आहे कीं हें सरकार लोकांच्या हिताचेंच आहे; कारण जेथें अन्याय दिसेल तेथें सविनय कायदेभंग केला तर ती गोष्ट तें सहन करतें. अशा प्रकारें चंपारण्य व खेडा या दोन प्रकरणांत मी साम्राज्याची निश्चित व विशेष प्रकारची सेवा केलेली आहे. या स्वरूपाचें माझें काम तहकूब करण्यास तुम्ही मला सांगणें म्हणजे माझें जीवन तहकूब करण्यास सांगण्यासारखेंच आहे. "

या पत्रांतील मजकुरावरून गेल्या महायुद्धाच्या वेळीं म० गांधींचें प्रस्थापित सरकारसंबंधीं कोणतें राजकीय धोरण होतें तें दिसून येतें. तें पुढीलप्रमाणें सांगतां येईल.

(१) साम्राज्याच्या लढ्यांत भागीदारी, म्हणजे साम्राज्यांत समानभागीदारी व स्वराज्य यांच्या प्राप्तीचा मार्गच होय. ही गोष्ट सौद्याच्या वृत्तानें घडवून आणूं नये, तथापि ती घडणें अवश्य आहे हें सरकारला व लोकांना निःसंदिग्ध

बजावून ठेवावें व ती मनोवृत्ति उभयपक्षांत जागृत ठेऊन संकटकाळीं प्रस्थापित सरकारास साहाय्य करावें.

(२) युद्ध चालू असतांना अनियंत्रित सत्ता एकदम जनतेच्या हातीं देणें शक्य नसलें, तरी येथील सरकार आपल्या मताला मान देऊनच चालू आहे, आपणांवर अन्याय करीत नाहीं आणि अन्यायाविरुद्ध सत्याग्रह केला तर तो सहन करून अंतीं त्याच्यापुढें नमतें व तो अन्याय आत्मबलानें दूर करून घेतां येतो, असा प्रत्यक्ष अनुभव जनतेला येत राहिला पाहिजे. असें करण्यास जनतेला शिकविणें हें राजनिष्ठेचेंच एक अंग असून राज्यसुधारणा व स्वराज्यसंस्थापना या दोहोंचा तोच एक मार्ग आहे. अशा अन्यायनिवारणाच्या सत्याग्रहानें आपली अडवणूक होते, असें सरकारनें मानू नये आणि आपद्ग्रस्त सरकारास अडवूं नये, या सत्याग्रही नीतीचा अर्थ सरकारनें अन्याय केला तरी आपण तो सहन करावा असा जनतेनेंहि समजूं नये. ही खरी राजनिष्ठा नव्हे व तो खरा प्रजाधर्महि नव्हे, तसें केल्यानें राजा व प्रजा दोघांचाहि अंतीं घात होतो.

(३) प्रजेला आपल्यावरील जुल्माचा अहिंसेनें प्रतिकार करण्याचें शिक्षण प्रत्यक्ष कृतीनें देत राहणें, हें सत्याग्रही व्यक्तीचें जीवनच आहे व तें जीवन ती कोणत्याहि परिस्थितींत थांबवूं शकत नाहीं. तात्पर्य सत्यनिष्ठा हीच खरी राजनिष्ठा आहे हें राजानें व प्रजेनें कधीहि विसरूं नये. अन्यायी राजाज्ञेचा सत्याग्रही प्रतिकार हें राजनिष्ठेचेंच एक अवश्य अंग आहे. ज्या राज्यांत हें स्वातंत्र्य मिळतें तेंच खरें स्वराज्य व या स्वराज्याचा प्रत्यक्ष अनुभव प्रजेला नित्य येत राहिला पाहिजे, मग त्या राज्याची बाह्य घटना कशीहि असो.



## सत्याग्रह नीतीची तात्त्विक मीमांसाः—

महायुद्ध संपतांच आपणांस स्वराज्यप्राप्ती होईल अशी आशा प्रजा बाळगून असतांना रौलट ॲक्ट नांवाचे काळे कायदे करून प्रजेचें नागरिक स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा उपक्रम १९१९ सालच्या मार्च महिन्यांत सरकारनें केला. सर्व पक्षांचा या कायद्यांना एकमुखानें विरोध होता, तरीहि या कायदेशीर व सनदशीर विरोधाचा सरकारवर मुळींच परिणाम झाला नाहीं. तेव्हां या कायद्यांविरुद्ध अखिल भारतीय स्वरूपाचा पहिला सविनय कायदेभंग म० गांधींनीं इ. स. १९१९ च्या ६ एप्रिलपासून १३ एप्रिल पर्यंतच्या सप्ताहांत केला. याच आठवड्यांत ब्रिटिश सरकारच्या वतीनें जालीयनवाला बागेंत निःशस्त्र प्रजेवर यांत्रिक तोफा डागून राजाची आज्ञा कितीही अन्यायाची असली तरी तिचा भंग करूं नये, असा धडा हिंदी प्रजेला शिकविण्याचा प्रयत्न ज० डायरनें केला. या डायरशाहींत नवें असें कांहीं नव्हतें. ब्रिटिश साम्राज्याच्या हिंदी इतिहासांत ती अनेकवार घडलेली गोष्ट होती. पण अशारीतीनें कायदे पाळण्याचे शिक्षण प्रजेला देतां येणार नाहीं व निःशस्त्र प्रजाहि अशा राक्षसी धोरणानें बंडखोर बनूं शकते असा ब्रिटिश राज्यकर्त्यांना यानंतर जो अनुभव आला तो अपूर्व होता. या बंडखोरीचा अर्थ अत्याचार असा कांहीं ठिकाणीं प्रजेनें केला होता; तेव्हां सत्याग्रही क्रांति म्हणजे अत्याचारी बंडखोरी नव्हे हें प्रजेला समजून सांगणें व प्रजेच्या या अत्याचारांचा मनःपूर्वक निषेध करणें लोकनायकांचें कर्तव्य होतें. राष्ट्रसभेसारख्या प्रजाधर्माचें शिक्षण देणाऱ्या संस्थेला हें शिकविणें भाग होतें. तात्पर्य सत्याग्रह म्हणजे सशस्त्र क्रांति किंवा अत्याचारी बंडखोरी नव्हे, व ती यांत्रिक तोफा डागून मारतां येणार नाहीं. तें एक अपूर्व

क्रांतिशास्त्र आहे व त्याचें स्वागत राज्यकर्ते व प्रजाजन या दोघांनीहि मनःपूर्वक केलें पाहिजे याची जाणीव दोघांनाहि करून देण्याची आवश्यकता म० गांधींना भासली. या जाणीवेच्या अभावीं सत्याग्रह पुढें चालणें शक्य व योग्य नव्हतें. म्हणून १३ एप्रिल १९१९ रोजीं अखिल भारतीय स्वरूपाचा पहिलाच असा हा सत्याग्रहसंग्राम म० गांधींनी तहकूब केला. तथापि या सप्ताहांत हिंदी राजकारणांतील सत्याग्रह पर्व सुरू झालें व तें आजपर्यंत चालू आहे. याचें स्मारक म्हणूनच ता. ६ एप्रिल ते ता. १७ एप्रिलपर्यंत दरसाल "**राष्ट्रीय सप्ताह**" पाळण्यांत येत असतो.

पंजाबांतील जालीयनवाला बागेंतील कत्तलीच्या वेळीं पंजाबांत ठिकठिकाणीं अत्याचार झाले होते व सरकारनें लष्करी कायदाहि पुकारला होता. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं सरकारनें हंटर कमिटी नांवाची एक कमिटी नेमिली होती. तिच्यापुढें म. गांधींनीं सत्याग्रही क्रांतिशास्त्र व क्रांतितंत्र यासंबंधींचें आपलें म्हणणें मांडिलें आहे. त्यांतील महत्त्वाचा कांहीं भाग पुढें दिला आहे. कमिटीचे अध्यक्ष लॉर्ड हंटर व म. गांधी यांच्यामध्यें पुढील प्रश्नोत्तरें झालीं.

" प्र०—श्री. गांधी, तुम्हीच सत्याग्रह चळवळीचें प्रणेते आहा असें मी समजतों.

उ०—होय, महाराज.

प्र०—आपण त्या चळवळीचें थोडक्यांत विवरण कराल काय ?

उ०—हिंसेचे मार्ग नाहीसे करण्याच्या हेतूनें पूर्णपणें सत्यावर अधिष्ठित झालेली अशी ही एक चळवळ आहे. कौटुंबिक व्यवहारांतील तत्त्व राजकीय व्यवहारांस लागू करण्याचा हा प्रयत्न आहे अशी माझी तिच्यासंबंधीं कल्पना आहे. मला आलेल्या अनुभवावरून माझें असें मत बनलें आहे कीं, हिंदुस्थानच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अन्याय निवारणासाठीं होणारा अत्याचारांचा प्रसार थांबविण्याचें सामर्थ्य या चळवळींत आहे व तें फक्त तिच्याच अंगीं आहे.



प्र०—ही चळवळ मूलतःच सरकारविरोधी नाहीं काय ? कारण या चळवळींत सरकारच्या इच्छेऐवजी सत्याग्रह मंडळाच्या इच्छेप्रमाणें लोकांनीं वागावयाचें असतें.

उ०—लोकांना ही चळवळ तशी वाटत नाहीं.

प्र०—सरकारच्या दृष्टीनें या चळवळीकडे पहा, असें मी म्हणतों. समजा कीं, तुम्हीच राज्यकर्ते आहा, तर, तुमच्या मंडळानें जे कायदे मोडावयाचे ठरविले आहेत ते कायदे मोडणाऱ्या चळवळीकडे तुम्ही कोणत्या दृष्टीनें पहाल ?

उ०—असें म्हणण्यानें सत्याग्रही तत्त्वाची सर्व मांडणी होत नाहीं. जर राज्यसूत्रें माझ्या हातीं असतील आणि केवळ सत्याच्या संशोधनार्थ, अत्याचाराचा आश्रय न करतां, अन्यायाचें निवारण करूं इच्छिणारें एकादें मंडळ मला आढळलें, तर मी त्याचें स्वागत करीन आणि हेच अत्यंत सनदशीर वृत्तीचे लोक आहेत असें मानून, माझें वर्तन अन्यायाचें होऊं नये व न्यायापासून मी ढळूं नये, म्हणून मी त्यांना माझे सल्लागारच बनवीन.

प्र०—पण विशिष्ट कायद्यांच्या न्यायान्यायासंबंधीं लोकांचीं मतें भिन्न भिन्न असूं शकतील.

उ०—या चळवळींतून अत्याचार नाहींसा करण्याचें तेंच मुख्य कारण आहे. सत्याग्रही हा स्वातंत्र्याचा जो हक्क व जी भावना आपणास हवी म्हणतो तो हक्क व ती भावना इतरांसहि उपभोगतां यावी असें सत्याग्रही मानतो.

प्र०—सरकार चालू राहण्याच्या दृष्टीनें मी या प्रश्नाकडे पहात आहें. जर सरकारविरुद्ध सरकारच्या मताऐवजी एखाद्या मंडळाच्या मताप्रमाणें चालणारी संस्था निर्माण केली तर सरकार चालूं शकेल काय?

उ०—दक्षिण आफ्रिकेंत आठ वर्षें सतत झगडा चालू असतां सरकार चालूं शकलें असा माझा अनुभव आहे. या चळवळीचें प्रारंभापासून अंतापर्यंत ज्यांनीं निरीक्षण केलें होतें ते जनरल स्मट्स चळवळीच्या अखेरीस म्हणाले कीं, या सत्याग्रहींनीं जसें वर्तन केलें तसेंच जर सर्व करतील तर आपणांस भिण्याचें कांहींच कारण नाहीं."

× × ×

यानंतर सर चिमणलाल सेटलवाड व म. गांधी यांच्यामध्यें झालेलीं पुढील प्रश्नोत्तरें वाचनीय आहेत.

"प्र०—तुमच्या सत्याग्रहाचें तत्त्व मला समजतें, तें असें कीं त्यांत सत्याचें संशोधन अंतर्भूत होतें व हें संशोधन करीत असतां तुम्ही स्वतःवर क्लेश ओढवून घेतां, पण दुसऱ्या कोणांवरहि अत्याचार करीत नाहीं.

उ०—होय, महाराज.

प्र०—मनुष्यानें सत्यसंशोधनाचा कितीहि यत्न केला तरी सत्यासंबंधींचें त्याचें मत हें इतरांच्या मतांहून भिन्न असूं शकेल. अशा स्थितींत सत्य कोणतें, याचा निर्णय कोणी करावयाचा?

उ०—ती व्यक्तीच तो निर्णय करील.

प्र०—निरनिराळ्या व्यक्तींचीं सत्यासंबंधीं निरनिराळीं मतें असूं शकतील. यामुळें गोंधळ माजणार नाहीं काय?

उ०—मला तसें वाटत नाहीं.

प्र०—प्रत्येकाचा सत्यसंशोधनाचा प्रामाणिक प्रयत्न निरनिराळा असूं शकेल.



उ०—म्हणूनच अहिंसा पाळावी, असा अपरिहार्य निष्कर्ष निघतो. अहिंसेच्या अभावीं केवळ गोंधळ माजेल येवढेंच नाहींतर त्याहूनहि भयंकर गोष्टी घडतील.

प्र०—सत्याचें अनुसरण करणारा मनुष्य हा बुद्धीनें व शीलानें असामान्यच असावयास नको काय?

उ०—नको. प्रत्येक मनुष्य तसा असेल अशी अपेक्षा करतां येणार नाहीं. जर अनें स्वतःच्या प्रयत्नानें सत्याचें संशोधन केलें असेल आणि ब, क इत्यादि त्या सत्याचें अनुसरण करीत असतील तर अच्या अंगचे असामान्यत्व ब, क यांच्या अंगीं असण्याची गरज मला वाटत नाहीं.

प्र०—म्हणजे याचा अर्थ असा होतो कीं, एका मनुष्यानें सत्याचा निर्णय करावयाचा आणि त्याच्याहून कमीबुद्धीचे व शीलाचे जे असतील त्यांनीं त्याचें अंधपणानें अनुसरण करावयाचें.

उ०—अंधपणानें नाहीं. मला येवढेंच सांगावयाचें आहे कीं ज्याला स्वतंत्रपणानें सत्याचें संशोधन करावयाचें नाहीं, त्याला दुसऱ्यानें संशोधन केलेल्या सत्याचें अनुसरण करणें भागच आहे.

प्र०—क्लेश भोगणें व पुनः पुनः क्लेश भोगणें, या कामीं असामान्य संयम लागत नाहीं काय?

उ०—नाहीं. असामान्य संयम लागत नाहीं. प्रत्येक आई क्लेश भोगते. तुमच्या देशबंधूंच्या अंगीं इतका संयम आहे, असें मी सांगतो व तो त्यांनी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर व्यक्तहि केलेला आहे.

प्र०—अहमदाबादचेंच उदाहरण घ्या. तेथें लोकांनीं संयम पाळला काय?

उ०—माझें येवढेंच म्हणणें आहे कीं, सर्व हिंदुस्थानभर पाहिलें तरी जेथें जेथें तुम्हाला अत्याचाराचीं तुरळक उदाहरणें आढळतील

तेथें तेथें आत्मसंयम पाळणारांची बरीच मोठी संख्या तुम्हांस आढळेल. अहमदाबाद व इतर ठिकाणच्या उदाहरणांवरून आम्हाला पूर्ण आत्मसंयम साध्य झाला नाहीं येवढेंच सिद्ध होतें. गेल्यावर्षी खेडा जिल्ह्यांतील लोक भयंकर प्रक्षोभन झाले असतांहि आत्यंतिक संयमानें वागले.

प्र०—हीं अत्याचारीं कृत्यें केवळ अपवाद होत असें आपण म्हणतां काय ?

उ०—केवळ अपवाद नव्हेत. पण तीं फार क्वचित् घडलीं आणि सत्याग्रहाची अधिक स्पष्ट कल्पना येईल तर त्याहूनहि क्वचित् घडतील. देशाला या तत्त्वाचें इतकें आकलन झालें आहे कीं त्याचा दुसरा प्रयोग करण्यास हरकत नाहीं. सत्याग्रहाच्या या अग्निदिव्यांतून गेल्यामुळें देश अधिक शुद्ध व श्रेष्ठ बनला आहे असें मला वाटतें."

× × ×

"प्र०—या चळवळीच्या बुडाशीं सरकारची अडवणूक करणें हाच हेतु नाहीं काय ?

उ०—खात्रीनें नाहीं. अन्याय निवारणासाठीं अडवणुकीवर सत्याग्रही अवलंबून राहत नाहीं, तर तो आत्मक्लेश भोगण्यावर अवलंबून राहतो.

प्र०—पण सत्याग्रहामुळें सुव्यवस्थित राज्य चालविणें अशक्य होणार नाहीं काय ?

उ०—जर पूर्ण निरपराधी लोक कायदे मोडतील तर, सरकार सुव्यवस्थित चालविणें अशक्य होणार नाहीं. पण एखाद्या सरकारनें समंजसपणाशीं फारकतच करून घेतली आहे असें मला आढळलें, तर असलें सरकार चालविणें मी खात्रीनें अशक्य बनवीन."

× × ×



यानंतर पंडित जगत् नारायण व म० गांधी यांच्या दरम्यान पुढील प्रश्नोत्तरें झालीं.

"प्र०—बेजबाबदार परकीय अधिकारीवर्गाविरुद्ध दुसरा कोणताहि उपाय योजणें शक्य नाहीं, म्हणूनच तुम्ही ही चळवळ सुरू केलेली आहे. असेंच ना ?

उ०—तसेंच कांहीं मला निश्चयानें म्हणतां येणार नाहीं. भावी कालांत स्थापन होणाऱ्या पूर्ण जबाबदार सरकाराविरुद्धहि सत्याग्रहाची आवश्यकता निर्माण होईल, अशी कल्पना मला करतां येते. आजच्या इंग्रज अधिकाऱ्यांना परिस्थितीच्या अज्ञानाची सबब पुढें करतां येते, तशी ती आपल्या मंत्र्यांना करतां येणार नाहीं येवढेंच.

प्र०—पण स्वराज्याचे सर्व हक्क मिळाले तर आपणास मंत्र्यांना वाटेल तेव्हां काढून टाकतां येईल.

उ०—या मुद्यावर मला नेहमींच इतकी खात्री वाटणार नाहीं. इंग्लंडांत असें अनेक वेळां घडतें कीं, जनतेचा विश्वास पूर्णपणें उडून गेला असतांहि मंत्री राज्यावर राहूं शकतात. तसेंच इथेंहि घडूं शकेल आणि म्हणून स्वराज्याखालींहि सत्याग्रह करण्याची परिस्थिति निर्माण होऊं शकेल अशी कल्पना मला करतां येते."

× × ×

वरील प्रश्नोत्तरांत सत्याग्रहांतील सविनय कायदेभंगाच्या अंगासंबंधी बहुतेक महत्त्वाचे मुद्दे आलेले आहेत. समाजांतील अत्याचारांचें निर्मूलन करणें हा सत्याग्रही चळवळीचा हेतु असतो, सरकार अत्याचार करतें तेव्हां त्याच्या प्रतिकारार्थ ही चळवळ करावी लागते, अशी चळवळ न केल्यास लोकहि अत्याचारी बनण्याचा संभव असतो, न्यायप्रस्थापना हा या चळवळीचा हेतु असून सरकार व लोक यांना अनत्याचारी बनविणें हें तिचें साध्य आहे, सामान्य लोकांना न्याय-

अन्यायाचीं तत्त्वें आकलन करतां येतात व त्यासाठीं आत्मक्लेश सहन करण्याइतकें शील जनतेंत असतें, यासाठीं असामान्य बुद्धिमत्ता किंवा असामान्य शील असणारेच सर्व सत्याग्रही असावे लागतात असें नाहीं, सत्याचें नवें संशोधन करण्यास असामान्य बुद्धिमत्ता किंवा असामान्य शील लागत असलें तरी सामान्य जनता संशोधित सत्याचें आकलन व आचरण करूं शकते, सरकारची अडवणूक करणें हा या चळवळीचा हेतु नसतो, तथापि एखादें सरकार वेडेपणानें असत्याचा दुराग्रह धरून बसेल तर अनत्याचारी सत्याग्रहामुळें तें बंद पडलें तर तो सत्याग्रहींचा किंवा सत्याग्रहाचा दोष नव्हे, स्वकीय किंवा लोकशाही सरकार असलें तरीहि कांहीं प्रसंगीं सत्याग्रही प्रजेला अथवा तिच्या नेत्यांना सविनय कायदेभंग करणें भाग पडेल, हीं सविनय कायदेभंगासंबंधीं सत्याग्रही भूमिका आहे. हा सत्याग्रही कायदेभंग संपूर्ण अनत्याचारी वृत्तीनें चालणार असल्यानें अत्याचारी सरकारची त्यामुळें अडवणूक झाली, तरी समाजांत अनवस्था माजणार नाहीं.

## कायदेभंग व असहकार

सविनय कायदेभंग हें सत्याग्रही क्रांतितंत्रांतील अखेरचें शस्त्र आहे, पण त्याशिवाय दुसरेंहि एक प्रभावी अंग सत्याग्रहाला आहे. हें दुसरें अंग म्हणजे असहकार. जुलमी अथवा अन्यायी सरकारशी अनत्याचारी असहकार, हें एक प्रजेच्या हातांतील प्रभावी शस्त्र आहे. रौलट कायद्याविरुद्ध सुरू केलेली कायदेभंगाची चळवळ १३ एप्रिल १९१९ रोजीं तहकूब करण्यांत आली. त्यानंतर १९२० च्या सप्टेंबरमध्यें कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रसभेच्या जादा अधिवेशनांत व १९२० च्या डिसेंबरमध्यें नागपुरास भरलेल्या नित्याच्या अधिवेशनांत



'अनत्याचारी असहकारा'चा ठराव प्रचंड बहुमतानें मंजूर करण्यांत आला. या वेळपासून स्वराज्याची प्राप्ति सत्याग्रहानें करून घेण्याचा लढा राष्ट्रसभेनें आतांपर्यंत चालविला आहे. यावेळीं अनत्याचारी असहकाराचें जें धोरण देशापुढें ठेविलें होतें व ज्या धोरणाची बजावणी राष्ट्रानें केली तर एक वर्षांत स्वराज्य मिळूं शकेल असें म० गांधी म्हणत होते, त्या धोरणाचें स्पष्टीकरण म० गांधींनी यंग इंडियाच्या २२ सप्टेंबर १९२० च्या अंकांत पुढीलप्रमाणें केलें आहे:—

"माझ्या असहकाराच्या कार्यक्रमाला जर राष्ट्रानें पुरेसा पाठिंबा दिला तर एक वर्षांत स्वराज्य मिळूं शकेल असें मी कलकत्त्यास बोललों त्याबद्दल माझी बरीच चेष्टा करण्यांत येत आहे. कांहींनीं माझ्या भाषणांत जी शर्त सांगितली आहे तिकडे पूर्ण दुर्लक्ष केलें आहे आणि कांहीं केलें तरी एका वर्षांत स्वराज्य मिळणें शक्य नाहीं म्हणून ते चेष्टा करीत आहेत. इतर कांहीं म्हणतात कीं, 'जर तर' ची भाषाच वापरावयाची तर कोणताहि अशक्य सिद्धान्त शक्य आहे असें सिद्ध करतां येईल. पण माझा सिद्धान्त गणिती हिशेबावर आधारलेला आहे. आणि मी असें म्हणण्याचें धारिष्ट करतों कीं माझ्या अटी पूर्ण झाल्यावाचून खरें स्वराज्य व्यवहारतः अशक्यच आहे. ब्रिटिशांच्या साहाय्यावाचून आपणास आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवितां येईल अशी अवस्था प्राप्त करून घेणें, हेंच स्वराज्य होय. जर ब्रिटिशांशी भागीदारी असा त्याचा अर्थ असेल, तर ती भागीदारी स्वेच्छेची असली पाहिजे.

× × ×

"शस्त्रमार्गांतील शिक्षण घेण्याचा प्रश्न आज तरी उपस्थितच होऊं शकत नाहीं. याच्याहि पुढें जाऊन मी असें म्हणतों कीं

जगाला एक श्रेष्ठतर संदेश हिंदुस्थान देणार आहे. केवळ आत्मशुद्धीने, आत्मयज्ञानें आपलें भवितव्य आपण प्राप्त करूं शकतों हें दाखवून देण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानपाशीं आहे. हें केवळ असहकारानेंच करतां येईल आणि ज्यांनीं सहकार्य करण्यास प्रथम सुरवात केली, ते जेव्हां असहकार करूं लागतील तेव्हांच असहकार शक्य होईल. सरकारनियंत्रित शिक्षण संस्था, सरकारी कोर्टें आणि कायदेमंडळें या त्रिविध मायेंतून जर आम्ही मुक्त होऊं आणि आपल्या शिक्षणाचें खरें नियंत्रण आपण करूं लागूं, आमचे तंटे आम्हीं मिटवूं आणि सरकारनें केलेल्या कायद्यांसंबंधीं उदासीन राहूं शकूं तर आम्ही आपलें राज्य चालविण्यास पात्र बनूं आणि त्यानंतरच मुलकी किंवा लष्करी खात्यांतील नोकरांनी राजीनामे द्यावेत व कर भरणारांनीं करबंदी करावी, असें सांगण्याची आमची तयारी होईल.

"या मायेंतील अखेरच्या, पण अत्यंत महत्त्वाच्या, भागाचा अद्यापि विचार केलेला नाहीं. स्वदेशी हीच ती बाब होय. आपण जर स्वदेशीचा त्याग केला नसता तर आजच्या अवनत स्थितीस आपण पोहोचलों नसतों. जर आर्थिक दास्याचा अंत करण्याची आपली इच्छा असेल तर आमचें कापड आपण बनविलें पाहिजे व आज तें फक्त हातकताईनेंच बनविलें पाहिजे.

"या सर्वांचा अर्थ शिस्त, संयम, स्वार्थत्याग, संघटनाकौशल्य, आत्मविश्वास व धैर्य असा आहे. आपण जर एक वर्षाच्या आंत देशांतील प्रमुख वर्गांत हे गुण निर्माण करूं शकूं आणि लोकमत आपणास अनुकूल बनवूं, तर आपणांस एक वर्षाच्या आंत खात्रीनें स्वराज्य मिळेल."

असहकारितेचा वरील कार्यक्रम लक्षपूर्वक वाचिल्यास त्यांत आपणांस विधायक व विध्वंसक अशीं दोन अंगें स्पष्ट दिसून येतात



आणि आपल्या असहकारानें प्रस्थापित राज्यतंत्र बंद पाडण्याच्या आधीं आपलें स्वतंत्र राज्ययंत्र स्वार्थत्यागानें, संघटनेनें आणि सहकार्यानें निर्माण केलें पाहिजे व जनतेवर राष्ट्रसभेचें नैतिक प्रभुत्व प्रस्थापित केलें पाहिजे, अशी म० गांधींची कल्पना स्पष्ट दिसून येते. राजकीय व आर्थिक दास्य नष्ट करून आत्मबलानें स्वावलंबी राज्ययंत्र निर्माण करण्याचा व अखेरीस सरकारी नोकरांना नोकऱ्या सोडण्यास व शेतकऱ्यांना करबंदी करण्यास सांगण्याचा हा कार्यक्रम आहे. कायदेभंग व करबंदी हे या कार्यक्रमाच्या अखेरीस असून त्याचा प्रारंभ शाळा, कोर्टें व कायदेमंडळें यांच्यावरील बहिष्कारानें करावयाचा होता. कायदेमंडळाचे सभासद व कोर्टांतील वकील हे त्यावेळीं जनतेचे राजकीय पुढारी होते आणि शिक्षण संस्थांतील विद्यार्थी सरकारी शाळांतील विद्येच्या मोहिनीनें भारलेले होते. कायदेमंडळांतील कामानें स्वराज्य मिळतें व जनतेचीं गाऱ्हाणीं दूर करतां येतात, कोर्टांत गेल्यानें न्याय मिळतो आणि शिक्षण संस्थांत गेल्यानें ज्ञानामृत मिळतें, ही आशा सुशिक्षित वर्गांत नांदत होती व त्या वर्गाकडेच जनतेचें नेतृत्व होतें. ही माया नष्ट केल्यावाचून कायदेभंग व करबंदी हा प्रत्यक्ष प्रतिकाराचा मार्ग आक्रमण्यास जनता तयार होणार नाहीं, म्हणून कायदेमंडळांवर, कोर्टांवर व शिक्षण संस्थांवर बहिष्कार घालून समाजांतील प्रतिष्ठित व सुशिक्षित वर्गानें जनतेला असहकाराचें प्रत्यक्ष उदाहरण घालून द्यावें, म्हणजे जगता जागृत होऊन निःशस्त्र क्रांति करण्यास पुढें येईल असा हा कार्यक्रम होता. प्रजेनें राज्यकारभाराशीं कोणतेंहि सहकार्य केलें नाहीं व कायदेभंग आणि करबंदी यांचा आश्रय केला, तर कोणतेंहि राज्य चालूं शकणार नाहीं आणि अशी अवस्था प्राप्त झाल्यास ब्रिटिश लोक

हिंदी राष्ट्राचें स्वातंत्र्य मान्य करतील असा विश्वास या कार्यक्रमामागें आहे. म० गांधींचा ब्रिटिश राष्ट्राच्या वृत्तीसंबंधीचा सिद्धान्त पुढीलप्रमाणें आहे.

१ "ब्रिटिश राष्ट्रासंबंधी माझा विश्वास असा आहे कीं आपण पुरेसें निश्चयाचें बळ व्यक्त केलें, आणि पुरेसा स्वार्थत्याग केला तर ब्रिटिश लोक पूर्णपणे प्रतियोगी वृत्ति दाखवितील. माझें इतिहासाचें वाचन असें आहे कीं, ते केवळ न्याय देण्यासाठीं म्हणून नमत नाहींत. त्यांच्या व्यावहारिक बुद्धीला न्यायाचें अमूर्त तत्त्व आकलन होत नाहीं. पण या न्यायाच्या मागें जेव्हां शक्ति उभी असेल, तेव्हां त्याला मान देण्याइतकें दूरदर्शित्व त्यांच्यापाशीं असतें. मग ही शक्ति पाशवी शक्ति आहे, कीं आत्मबल आहे, याचा विचार ते करीत नाहींत."

म० गांधींनीं येथें केवळ ब्रिटिश स्वभावासंबंधींच ते आत्मबलापुढें नमतात असें जें विधान केलें आहे, तें त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवानें केलेलें आहे. तथापि तात्त्विक दृष्ट्या आपला हा विश्वास सर्व राज्यकर्त्यांना लागू पडतो असें ते मानतात. हिटलरसारखे हुकूमशहाहि प्रजेच्या संघटित आत्मबलापुढें नमतील अशी त्यांची श्रद्धा आहे व ती त्यांनीं अनेकवार व्यक्तहि केली आहे. हिटलर हाहि मनुष्य आहे व त्याच्याहि अंतःकरणांत मानवी सद्भावना आहेत. धार्मिक भाषेंत बोलावयाचें तर हा विश्वास हिटलरवरचा विश्वास नसून मानवाच्या अंतःकरणांतील परमेश्वरावरील तो विश्वास आहे, असें म० गांधी म्हणतात. हाच सिद्धान्त भौतिक शास्त्रदृष्टीनें मांडतांना रिचर्ड ग्रेग म्हणतात कीं, हिटलरसारख्या हुकूमशहांच्या डोक्यांतहि इतर मनुष्यांप्रमाणें थोरला

1 Young India Vol. I P. 727



मेंदू व धाकटा मेंदूहि असतो. फॅसिस्ट किंवा नाझी राज्यकर्ते हे कोणी अमानुष राक्षस नाहींत व ब्रिटिश राज्यकर्ते देव नाहींत. तात्पर्य म० गांधींचा आत्मबलाच्या प्रभावासंबंधीचा विश्वास केवळ ब्रिटिश राज्यकर्त्यांनाच लागू पडतो असें मानणें बरोबर नाहीं. गांधीवादांतील हा सिद्धान्त सर्व राज्यकर्त्यांना सामान्यपणें लागू पडतो अशीच गांधीवादाची श्रद्धा आहे. आपला पक्ष सत्पक्ष आहे असें केवळ युक्तिवादानें सिद्ध केलें असतां राज्यकर्ते, निदान ब्रिटिश राज्यकर्ते, आपलें म्हणणें मान्य करतील, हा सिद्धान्त प्रागतिक पक्षाच्या सनदशीर राजकारणाचा आधार आहे. शस्त्रबलावांचून सत्पक्षालाहि राजकारणांत यश येणार नाहीं या सिद्धान्तावर सशस्त्र क्रांतिवादाची उभारणी झाली आहे. तर गांधीवादाची उभारणी आत्मबलाच्या सिद्धान्तावर झालेली आहे. बुद्धिबल व शस्त्रबल यांहून आत्मबल श्रेष्ठ आहे आणि आत्मबलाचा आश्रय करून प्रजेनें संघटित असहकार व सविनिय कायदेभंग यांचा आश्रय केल्यास कोणतीहि राजसत्ता प्रजेपुढें नमेल असें गांधीवाद मानतो. यांत राजसत्तेची संघटित अडवणूक होत असली, तरी राज्यकर्त्यांच्या अंतःकरणांतील न्यायबुद्धि आणि दूरदृष्टि जागृत करण्याच्या धोरणालाहि महत्त्वाचें स्थान आहे. म्हणून राज्यकारभाराची अडवणूक करून प्रजेनें केवळ आपलें सामर्थ्य व्यक्त करून सत्याग्रह यशस्वी होणार नाहीं, तर आपला पक्ष सत्पक्ष आहे आणि या सत्पक्षाच्या विजयासाठीं आपण वाटेल ते क्लेश निर्वैरबुद्धीनें सहन करण्यास तयार आहों, अशीहि राज्यकर्त्यांची खात्री पटविण्याची जबाबदारी सत्याग्रही लोकनायकांनीं आपल्या अंगावर घेतली पाहिजे. तसेंच जनतेंतील वाटेल त्या भावना जागृत करून राज्यकारभाराला अडथळा करणें हें आपलें ध्येय न समजतां, अन्यायाशीं व असत्याशीं असह-

कार केल्यानें सरकारची अडवणूक झाली आणि अन्यायी राज्यकारभार बंद पडला, तरी समाजांत दंगाधोपा माजूं नये, अशी व्यवस्था सत्याग्रही नेत्यांनी केली पाहिजे. याचसाठीं खेड्यापाड्यांतील ग्रामोद्योगांची संघटना, हिंदूमुसलमानांचें ऐक्य आणि अस्पृश्यतानिवारण या विधायक कार्यक्रमाला आणि राष्ट्रसभेंतील कठोर लष्करी शिस्तीला म० गांधी नेहमीच अधिक महत्त्व देत असतात. देशांत अत्याचारी वातावरण माजल्यास राज्यकर्ते व प्रजाजन या दोघांचेंहि डोकें ठिकाणावर राहत नाहीं व सत्याग्रही क्रांति यशस्वी होत नाहीं. म्हणून करबंदी व कायदेभंग या चळवळी फारच दक्षतेनें केल्या पाहिजेत व त्या करण्यापूर्वी सभोंवार अनत्याचारी वातावरण निर्माण केलें पाहिजे.

**प्रत्यक्ष प्रतिकार आणि प्रातिनिधिक प्रतिकारः—**

सत्याग्रहाची चळवळ ही प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ आहे, म्हणजे जनतेनें आपणांवर झालेला अन्याय निवारण करण्यासाठी स्वतःच क्लेश भोगण्यास तयार व्हावयाचें आणि अन्यायी राज्यकर्त्यांशीं असहकार करावयाचा असें तिचें धोरण असतें. म० गांधींनीं हिंदुस्थानांत ही चळवळ सुरू केली त्याचवेळीं या देशांत प्रातिनिधिक कायदेमंडळांचा विस्तार करून त्यांना जबाबदार अशीं मंत्रिमंडळें स्थापन करण्याचा उपक्रम ब्रिटिश मुत्सद्यांनीं केला होता. प्रांतांत पोलिस व जमाबंदी यांसारखीं महत्त्वाचीं खातीं आपल्या हातीं ठेऊन घेऊन इतर खातीं कायदेमंडळांना जबाबदार अशा मंत्र्यांच्या हातीं देण्याचा फार्स मॉंटफोर्ड सुधारणांनीं निर्माण केला होता. या राज्यघटनेमुळें लोकनियुक्त मंत्र्यांच्या हातीं सत्ता, पैसा किंवा अधिकारी वर्गावर हुकमत यांपैकीं कांहींहि आलें नव्हतें. तेव्हां ही राज्यघटना फेटाळून देऊन दुसरी संपूर्ण स्वराज्याची घटना प्राप्त करून घेण्याचा लढा सुरू करण्याचें धोरण राष्ट्रसभेनें लो. टिळक, दे. बं. दासप्रभृति पुढाऱ्यांच्या नेतृत्वानें आधीच ठरविलें होतें. यासाठीं राष्ट्रसभेच्या शिस्तीनें कायदेमंडळांत काम करणारा व सरकारशीं कधी सहकारितेनें तर कधी असहकारितेनें वागणारा पक्ष निर्माण करण्यासाठींच लो. टिळकांनीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी—राष्ट्रसभानिष्ठ लोकशाही पक्ष—या नांवाचा पक्ष स्थापन केला होता. या पक्षानें मॉंटफोर्ड सुधारणा फेटाळून देण्याचें धोरण स्वीकारलें होतें व कायदेमंडळांत जाऊन नवी राज्यघटना मोडून टाकावी अथवा सरकारला सतत विरोध करून त्याची अडवणूक करावी, असें म्हणणारा एक पक्ष असहकारितेच्या कार्यक्रमांतील कायदेमंडळबहिष्काराला प्रथमपासून विरुद्ध होता. म० गांधींनीं या पक्षाला विरोध करून त्या पक्षानें आणलेली उपसूचना फेटाळून लाविली. श्री. बिपिनचंद्र पाल यांनीं ही उपसूचना मांडली होती व दे. बं. दास व राष्ट्रसभानिष्ठ लोकशाही पक्षाचे इतर प्रतिनिधि यांचा तिला पाठिंबा होता. या उपसूचनेच्या स्वरूपासंबंधीं म० गांधी १५ सप्टेंबर १९२० च्या यंग इंडियांत लिहितात :

" Babu Bipin chandra Pal proposed a mission to England to present our demands and in the meanwhile to establish national schools, form arbitation courts and not to boycott the councils. His resolution woul d have meant in effect seeking election to the councils and there probably adopting obstructive tactics. This meant a virtual postponement of the struggle to the next general elecdtion. "

बिपिन बाबूंच्या ठरावाचा थोडक्यांत आशय असा होता कीं राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय ग्रामपंचायती स्थापण्याचें कार्य

सुरू करावें पण कायदेमंडळावर बहिष्कार न घालतां आंत शिरून प्रातिनिधिक प्रतिकार अथवा घटनाभंग करण्याचें धोरण अवलंबावें. मध्यंतरी एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठवावें व कांहीं उपयोग होतो काय तें पहावें. या ठरावाचा परिणाम पुनः निवडणुकी करण्याची वेळ येईपर्यंत प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा लांबणीवर टाकण्यांत झाला असता असें म० गांधी म्हणतात. त्यावेळीं म० गांधी प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ करण्यास उतावीळ झाले होते. पंजाब व खिलाफत प्रकरणांमुळें हिंदुमुसलमान जनता अत्यंत प्रक्षुब्ध झाली होती व यावेळीं प्रत्यक्ष प्रतिकार लांबणीवर टाकणें योग्य झालें नसतें. शिवाय येथें घटनाभंग व विलायतेस शिष्टमंडळ या चळवळींपेक्षा प्रत्यक्ष प्रतिकाराची प्रचंड चळवळ करण्यांतच येथील सर्व शक्ति खर्च केल्यास विलायतेचें शिष्टमंडळ येथें येईल व येथील राज्यकारभार बंद पडून अधिक परिणामकारक घटनाभंग होईल, अशी म० गांधींची कल्पना होती. तसेंच जर शेकडा पन्नासाहून अधिक मतदारांनीं निवडणुकीवर बहिष्कार घातला तर सनदशीर म्हणविणारे प्रागतिकहि कायदेमंडळांत जाणार नाहींत अशीहि त्यांची अपेक्षा होती.

" Will a single moderate care to enter any council if more than half his electorate disapproved of his offering himself as a candidate at all ? I hold that it would be unconstitutional for him to do so, because he will not represent his constituecy. "

या बाबतींत म० गांधींची प्रागतिक पक्षानें संपूर्ण निराशा केली, तरीहि १९२० सप्टेंबरपासून १९२२ जानेवारी – फेब्रुवारीपर्यंत देशांत प्रत्यक्ष प्रतिकाराची प्रचंड चळवळ झाली व तिच्यामुळें राष्ट्रसभेचें सामर्थ्य सरकारला व लोकांना इतकें दिसून आलें कीं, सत्याग्रहानेंच



आपणांस स्वराज्य मिळवितां येईल हा विश्वास जनतेच्या मनांत कायमचा रुजला. प्रातिनिधिक प्रतिकारानें हें कार्य होणार नाहीं अशीही लोकांची खात्री झाली व कायदेमंडळें, कोर्टें व सरकारी शिक्षणसंस्था यांची त्रिविध माया नष्ट झाली. वकील वर्गाहून निराळा असा एक स्वतंत्र लोकनायक, लोकसेवक व लोकसंघटक वर्ग निर्माण झाला आणि खादी, अस्पृश्यता निवारण, राष्ट्रीयशिक्षण, हिंदु–मुसलमान ऐक्य इत्यादि विधायक लोकसंघटनेचें कार्य राष्ट्रसभेचें नित्य कर्म होऊन बसलें. देशसेवेला आजन्म वाहून घेणारे, वाटेल तेव्हां तुरुंगांत जाणारे, दारिद्र्यांत आनंद मानणारे आणि आपल्या सेवेनें लोकांचे नेतृत्व करणारे राष्ट्रभक्त पुढें आल्यामुळें वकिली किंवा व्यापार करून फावल्या वेळीं नेतृत्व करणारे व सरकारच्या कायद्यांत राहून राजकारण करणारे लोक मागें पडले. अर्थात् दे०बं०दास, पं० मोतीलाल नेहरू, बाबू राजेंद्रप्रसाद किंवा सरदार वल्लभभाई पटेल यांच्याप्रमाणें वकिली सोडून देशासाठीं फकिरी घेणारे लोक सर्वांत श्रेष्ठ ठरले हें योग्यच आहे.

म० गांधींनीं १९२२ सालच्या जानेवारींत चौरी–चोऱ्यास दंगा झाल्यामुळें प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ मागें घेतली व मार्चमध्यें त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. यानंतर दे.बं. दास हे सुटून आल्यावर त्यांनीं व पं. मोतीलाल नेहरू यांनीं आता प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ होणें शक्य नाहीं असें पाहून कायदेमंडळांतील अडवणुकीचें अथवा प्रातिनिधिक प्रतिकाराचें धोरण अमलांत आणण्यासाठीं स्वराज्य पक्ष स्थापन केला. १९२४ सालीं म० गांधी सुटून येण्यापूर्वीच राष्ट्रसभेनें स्वराज्य पक्षाला कौन्सिलांत जाण्याची परवानगी दिली होती. या वेळेपासून आतांपर्यंत राष्ट्रसभेनें प्रत्यक्ष प्रतिकार व प्रातिनिधिक प्रतिकार अथवा घटनाभंग या धोरणांचा परिस्थितीनुसार

पुरस्कार केलेला आहे. ज्यावेळीं प्रत्यक्ष प्रतिकार सुरू होतो त्या वेळीं प्रातिनिधिक प्रतिकाराचें कार्य बंद पडतें व जेव्हां प्रातिनिधिक प्रतिकारानें कार्य होत नाहीं तेव्हां म० गांधींच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालीं प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा सुरू होतो. ज्या वेळीं सत्याग्रहाचा प्रत्यक्ष लढा सुरू नसेल तेव्हां म० गांधींचे शुद्ध अहिंसावादी अनुयायी विधायक लोकसंघटनेवर विशेष भर देतात व प्रातिनिधिक प्रतिकारवादी कायदेमंडळांत व मंत्रिमंडळांतहि कामें करतात. पुनः जेव्हां सत्याग्रहयुद्ध सुरू होतें तेव्हां हे दोघेहि तुरुंगांत जाण्यास तयार होतात व आपण नेमिलेल्या सर्वाधिकाऱ्याची आज्ञा शिरसावंद्य मानून लष्करी शिस्तीचें पालन करतात. हें तंत्र केवळ गांधी वादांतूनच विकास पावले आहे असें नाहीं, तर गांधीवादाकडे नेतृत्व जाण्यापूर्वीं लो. टिळक, दासप्रभृति जे जहाल राष्ट्रवादी पुढारी होते त्यांचे प्रातिनिधिक प्रतिकाराचें धोरण, आणि म० गांधींचे प्रत्यक्ष प्रतिकाराचें सत्याग्रही धोरण या दोहोंच्या सामन्वयांतून हें क्रांति तंत्र विकास पावलेलें आहे.

## राष्ट्रसभेंतील राष्ट्रवाद, समाजवाद व गांधीवाद

गेलीं वीस वर्षें राष्ट्रसभेचें अंतिम नेतृत्व म० गांधींच्याकडे असलें तरी राष्ट्रसभेंत केवळ गांधीवादी पक्षच आहे असें समजणें चुकीचें आहे. १९२३ पासून १९३० पर्यंत गांधीवादी पक्ष आणि स्वराज्य पक्ष असे दोन पक्ष राष्ट्रसभेंत होते. १९२४ सालीं दे. बं. दास व पं० मोतीलाल नेहरू यांनीं म. गांधींना असें सांगितलें कीं आम्ही कायदेमंडळांत काम करीत असलों तरी जेव्हां तेथील प्रतिकारानें सरकारवर कांहीं परिणाम होत नाहीं असा अनुभव येईल, तेव्हां आम्ही कायदेमंडळांचा त्याग करूं आणि तुमच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रह



करण्यास तयार होऊं. १९३० सालीं याप्रमाणें स्वराज्य पक्ष सत्याग्रहांत सामील झाला. मध्यंतरीच्या काळांत गांधीवादी लोक विधायक कार्यक्रम करीत होते, तेहि सत्याग्रहांत गेले. हा सत्याग्रहाचा लढा १९३४ पर्यंत चालला. मध्यंतरीच्या काळांत तीन गोलमेज परिषदा होऊन नव्या सुधारणांचा कच्चा कायदा तयार झाला. सत्याग्रह तहकूब करण्यांत येऊन राष्ट्रसभेनें पुनः कायदेमंडळांतील प्रातिनिधिक प्रतिकार आणि ग्रामोद्योग हरिजन सेवा इत्यादि विधायक कार्यक्रम सुरू केला. या वेळेपासून राष्ट्रसभेंत एक समाजवादी पक्षहि स्थापन झालेला आहे. आज राष्ट्रसभेंत ( १ ) राष्ट्रवादी ( २ ) समाजवादी व ( ३ ) गांधीवादी असे तीन उपपक्ष किंवा विचारप्रवृत्ति आहेत. स्थूल अर्थानें ते तिघेहि सत्याग्रही आहेत; कारण हिंदी स्वातंत्र्याची प्राप्ति निःशस्त्र क्रांतीच्या आणि सत्याग्रही मार्गानेंच होईल असें या सर्वांचे निश्चित मत असून सत्याग्रहाचा लढा चालविण्यास म० गांधींच्याइतका अधिकारी पुरुष दुसरा कोणीहि नाहीं, असें या तिघांनाहि वाटतें. आजपर्यंत या दोन प्रश्नांवर या तीनहि प्रवृत्तींच्या उपपक्षांत फारसा मतभेद कधींहि झालेला नाहीं. तथापि राजकीय अहिंसेच्या आजच्या मर्यादासंबंधीं या तिघांच्या कल्पना भिन्न आहेत. दोन अडीच वर्षें प्रांतिक स्वराज्याचा कारभार राष्ट्रसभेनें केला व नंतर महायुद्ध सुरू झाल्यानंतर मंत्रिमंडळांचे राजीनामे देऊन घटनाभंग केला व युद्धाशीं असहकाराचें व सत्याग्रहाचे धोरण राष्ट्रसभेनें आखलें. या काळांत या तीन उपपक्षांचे मतभेद लोकांपुढें विशद रीतीनें आले.

पहिले जे राष्ट्रवादी, त्यांच्या मतें हिंदुस्थानांत स्वराज्य स्थापन करणें हेंच सत्याग्रहाचें कार्य असून हें स्वराज्य स्थापन झाल्यानंतर त्या सरकारला अंतर्गत शांतता रक्षण व परचक्र निवारण या कामीं इतर राष्ट्रांतील सरकारांप्रमाणें हिंसा करावी लागेल. राजधर्मांतील

ही अपरिहार्य हिंसा मान्य करून राष्ट्रसभेनें आपल्या हातीं सत्ता घ्यावी व ही हिंसा होईल तितकी कमी करण्याचे प्रयत्न करावेत. या वृत्तीच्या लोकांची स्वराज्याची कल्पना सामान्यतः ब्रिटिश लोकशाही पद्धतीचें राज्ययंत्र आणि उदार धनिकशाही आर्थिक घटना असें आहे. म० गांधींचें ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र कांहीं प्रमाणांत त्यांना मान्य असलें तरी यांत्रिक उत्पादन व मोठी कारखानदारी यांचा त्याग करतां येणार नाहीं व तिचे योग्य नियंत्रण केल्यास वर्गयुद्ध माजणार नाहीं असें त्यांना वाटतें. म. गांधींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाची छाप या पक्षावर पडली नसती तर तो कदाचित् फॅसिस्ट धोरणाचाहि पुरस्कर्ता झाला असता, पण हिंदुस्थानचें राजकीय पारतंत्र्य आणि तें नष्ट करण्यासाठीं करावा लागणारा सत्याग्रही अहिंसात्मक क्रांतीचा आश्रय, यामुळें या हिंदी राष्ट्रवादी वर्गांत फॅसिस्ट वृत्ति वाढण्याचा संभव उरला नाहीं. तथापि समाजवादीपक्षाचें एकवर्ग समाजाचें ध्येय त्याला मान्य नाहीं.

दुसरा समाजवादी पक्ष, हा आज अगदी अल्पसंख्य असला तरी पं० नेहरू सारख्या एका जगप्रसिद्ध पुढाऱ्याकडे या पक्षाचें नेतृत्व आज उद्या जाण्याचा संभव आहे. शिवाय राष्ट्रसभा आज एका राष्ट्रीय लढ्यांत गुंतली असल्यानें राष्ट्रवादी पक्षाचेंच प्राबल्य तींत असणें साहजिक आहे. हा लढा सत्याग्रहानें यशस्वी झाल्यास राष्ट्रवादी पक्षाकडील राष्ट्रसभेचें नेतृत्व समाजवादी पक्षाकडे जाणें अशक्य नाहीं. समाजवादी पक्षहि सत्याग्रहाकडे केवळ क्रांतिशास्त्र या दृष्टीनेंच पाहतों, तथापि त्याची क्रांतीची कल्पना राष्ट्रवादी पक्षाच्या क्रांतीच्या कल्पनेहून अधिक व्यापक व अधिक सर्वांगीण आहे. ब्रिटिश लोकशाही ही धनिकशाही असल्यानें त्या लोकशाहीला समाजसत्ताक स्वरूप दिलें पाहिजे असें या पक्षाचें मत आहे. ब्रिटिश



राष्ट्रांतील राजसत्ता हिंदुस्थानांत आली व येथें ब्रिटनसारख्या लोकशाही संस्था स्थापन झाल्या, तरी येथील सामान्य जनतेच्या पोटापाण्याचा व स्वातंत्र्याचा प्रश्न सुटूं शकत नाहीं. यासाठीं भांडवलशाही संस्कृति नष्ट केली पाहिजे व ती नष्ट होईल तर साम्राज्यशाही व लष्करशाही यांचाहि अंत होईल अशी यांची विचारसरणी आहे. यासाठीं वर्गयुद्धहि करावें लागेल, तथापि हें वर्गयुद्ध सत्याग्रहानें यशस्वी होऊं शकेल. जर हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सत्याग्रहानें सुटला तर हा अंतर्गत क्रांतीचा प्रश्नहि सत्याग्रहानें कां सुटणार नाहीं असें पं० नेहरू विचारतात. जगांतील एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील आणि एका वर्गाचें दुसऱ्या वर्गावरील प्रभुत्व नष्ट होईल तेव्हांच अहिंसेच्या पायावर समाजरचना होईल व युद्ध संस्थाहि नष्ट होईल, असें राष्ट्रसभेच्या युद्धविरोधी सत्याग्रहाच्या ठरावांत म्हटलें आहे. हे शब्द म० गांधी व पं० नेहरू या दोघांनाहि मान्य होणारे आहेत. जगांतील युद्धसंस्था नष्ट करणें आणि हिंसात्मक समाजरचना आमूलाग्र बदलून टाकणें हें आजच्या जगांतील व्यावहारिक आंतरराष्ट्रीय राजकारण बनलें आहे. या दृष्टीकोणानें हे दोघेहि भारतीय नेते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहूं शकतात. या बाबतींत समाजवादी दृष्टिकोण गांधीवादी दृष्टीकोणाशी अधिक सदृश आहे आणि त्याचा युद्धविरोधहि राष्ट्रवादी पक्षाच्या युद्धविरोधाहून अधिक मूलगामी आहे. म० गांधी म्हणतात त्याप्रमाणें कोणतेंहि युद्ध आम्ही लढणार नाहीं असें ते म्हणत नसले, तरी राष्ट्रीय सरकारनें चालविलेल्या कोणत्याहि युद्धास आम्ही साहाय्य करूं असेंहि ते म्हणणार नाहींत. ज्या युद्धामुळें साम्राज्यशाही व भांडवलशाही सुस्थिर व सुदृढ बनतील असें युद्ध राष्ट्रीय सरकारनें चालविलें तरी त्याच्याशीं समाजवादी सहकार्य करणार नाहींत. तात्पर्य युद्धसंस्था नष्ट होण्यापूर्वी भांडवलशाही

समाजरचना नष्ट झाली पाहिजे असें त्यांचें मत असून भांडवल-शाहीविरुद्ध क्रांति करण्यास सत्याग्रहाचा उपयोग करावा लागेल असें या पक्षाला वाटतें. अशा रीतीनें जगांत राजकीय अहिंसा प्रस्थापित व्हावयाची, तर एका वर्गावरील दुसऱ्या वर्गाचें व एका राष्ट्रावरील दुसऱ्या राष्ट्राचें वर्चस्व नष्ट झालें पाहिजे. राष्ट्रसभेनें हें कार्य स्वराज्य प्राप्तीनंतरहि अंगावर घेतलें पाहिजे असें मुंबईस ऑल इंडिया-काँग्रेस कमिटीनें युद्धविरोधी प्रचाराबद्दल जो सत्याग्रहाचा ठराव केला, त्यांत म्हटलें आहे. तथापि राजधर्मांत हिंसा अंतर्भूत होत आहे, तोंपर्यंत राष्ट्रसभेनें अधिकार स्वीकारच करूं नये, अथवा राष्ट्रसभेनें अधिकार स्वीकार केल्यास राष्ट्ररक्षणार्थ किंवा शांतताप्रस्थापनार्थ तिला राजधर्मातील अपरिहार्य हिंसा करावी लागणार नाहीं, असें समाजवादी म्हणत नाहींत व म्हणणार नाहींत. ज्याप्रमाणें सत्याग्रही राष्ट्रवादी हा सत्याग्रहानें राष्ट्रीय लोकशाही स्थापन करण्याचें ध्येय मान्य करील तथापि लोकशाही सरकारची रक्षणार्थ हिंसा अपरिहार्य मानील, त्याचप्रमाणें सत्याग्रही समाजवादी हा सत्याग्रहानें समाजसत्ताक लोकशाही स्थापन करतां येईल असें मान्य करील पण त्या समाजवादी सरकारला संरक्षणार्थ मुळींच हिंसा करावी लागणार नाहीं हें मान्य करणार नाहीं.

गांधीवादी हे या बाबतींत तत्त्वतः राष्ट्रवादी व समाजवादी या दोघांच्याहि पुढें जाऊं इच्छितात. जोंपर्यंत राजधर्मांत हिंसेचा आश्रय करावा लागत आहे, तोंपर्यंत सत्याग्रही पक्षानें मुळींच अधिकारस्वीकार करूं नये असा त्यांच्या तत्त्वांचा तार्किक निष्कर्ष आहे. प्रांतिक स्वराज्याच्या वेळीं गांधीवादी पक्षानें अधिकारवादी पक्षाशीं जें सहकार्य केलें तें या दृष्टीनें या निष्कर्षाशीं विसंगत दिसतें. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांना शांततारक्षणासाठीं कांहीं ठिकाणीं गोळी-



बारहि करावा लागला. तेव्हां म. गांधींनीं आपला हा प्रयोग अयशस्वी झाला असें मान्य केलें; तरीहि राष्ट्रसभेनें त्यासाठीं अधिकारत्याग केला नाहीं. महायुद्धाच्या प्रारंभापासून युद्धाशीं सहकार्य करण्याचें धोरण सत्याग्रही राष्ट्रसभेनें स्वीकारूं नये असें म. गांधी म्हणत आहेत. तरीहि राष्ट्रसभेतील राष्ट्रवादी व समाजवादी पक्षांना तें अहिंसेच्या दृष्टीनें मान्य नाहीं. आजचें युद्ध हें परकीय सरकारनें लादलेलें आहे व त्यांतून स्वातंत्र्य प्राप्तीची निश्चिती नाहीं, म्हणून राष्ट्रवादी युद्धविरोधी सत्याग्रह करीत आहेत. तसेंच आजचें युद्ध हें साम्राज्यशाही व भांडवलशाही संस्कृति टिकविण्यासाठीं आहे म्हणून समाजवादी त्याच्याविरुद्ध सत्याग्रह करीत आहेत. राजाज्ञा व मनोदेवतेची आज्ञा यांत विरोध आला असतां राजाज्ञेचा भंग करून मनोदेवतेची आज्ञा पाळावी व तसें करतांना पूर्ण अनत्याचारी वृत्ति धारण करावी हें सत्याग्रही क्रांतितत्व या सर्वांना मान्य आहे. राज्यक्रांति करण्याचें तंत्र या दृष्टीनें या तीनहि पक्षांनीं सत्याग्रह मान्य केला असला, तरी राजधर्मातील संपूर्ण हिंसा नष्ट होईपर्यंत राष्ट्रसभेनें अधिकार स्वीकारच करूं नये हें तत्त्व त्यांपैकीं राष्ट्रवादी व समाजवादी सत्याग्रहींना मान्य नाहीं. तसेंच मानव समाजाची रचना सत्य व अहिंसा या तत्त्वांवर करण्याचें अंतिम ध्येय सर्वांना मान्य असलें, तरी स्वराज्यप्राप्तीनंतर आपल्या समाजाची आर्थिक व सांस्कृतिक रचना कोणत्या धोरणानें करावी यासंबंधीं या तीन पक्षांत मतभेद आहेत. गांधीवादाची यासंबंधीं काय भूमिका आहे व ती राष्ट्रवादी व समाजवादी कल्पनांहून कितपत भिन्न आहे त्याचा विचार पुढील प्रकरणांत करावयाचा आहे.

## गांधीवाद, कौन्सिलवाद आणि अधिकारग्रहण

गांधीवाद हा कौन्सिल-प्रवेश किंवा अधिकारग्रहण यांच्याशीं

तत्त्वतःच विरुद्ध आहे अशी कांहीं लोकांची समजूत आहे, पण ती बरोबर नाहीं. ज्यावेळीं असहकार व कायदेभंग हें धोरण अवलंबावयाचें असेल, त्यावेळीं जनतेचे नेते या नात्यानें मंत्रिमंडळांत व कायदेमंडळांत काम करणारांनीं असहकारांत व सत्याग्रहांत आधीं सामील व्हावें, असें म. गांधी म्हणतात. ज्यावेळीं असा प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा करावयाचा नसेल, तेव्हां लोकांची विधायक संघटना व लोकसेवा करण्यासाठीं कायदेमंडळांत किंवा मंत्रिमंडळांत जाऊं नये किंवा त्यांचें साहाय्य घेऊं नये असें म. गांधींचें मत नाहीं. तसेंच प्रस्थापित राजसत्तेशीं असहकार करावयाचा किंवा कायदेभंग करावयाचा, म्हणजे सरकारशीं कोणतेंच सहकार्य करावयाचें नाहीं किंवा त्यानें केलेल्या कोणत्याहि गोष्टीचा उपयोग करावयाचा नाहीं. असा त्यांचा अर्थ नाहीं. हा असहकार किंवा कायदेभंग विशिष्ट गोष्टींत प्रथम करून मग त्याची व्याप्ति क्रमाक्रमानें वाढवीत न्यावयाची असते. अर्थात् तुम्ही असहकार केला, तर सरकारचीं नाणीं कां वापरतां ? पोस्टाचीं तिकिटें कां घेतां ? असले प्रश्न विचारून असहकारांतील विसंगति दाखविणें योग्य नाहीं.

कायदेमंडळावर बहिष्कार घालण्याच्या बाबतींत राष्ट्रसभेनें आज जें धोरण स्वीकारलें आहे, तें जुन्या धोरणाहून भिन्न आहे. निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचें जुनें धोरण होतें. आतां निवडणुकी जिंकून मग बहिष्कार घालण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. प्रचंड बहुसंख्य मतदारांनीं निवडणुकीवर बहिष्कार घातल्यास कोणताहि पक्ष, आपण जनतेचा प्रतिनिधि म्हणून कायदेमंडळांत जाणार नाहीं ही म. गांधींची आशा फोल ठरल्यामुळें कौन्सिलवाद हा आतां कायमचा आला (Parleamentary mentality has come to stay) असे उद्गार म. गांधींनीं १९३४ मध्यें काढिले होते.



याचा अर्थ असहकार किंवा कायदेभंग हा सत्याग्रही कार्यक्रम कायमचा सोडला असा नव्हता. आज असहकार व कायदेभंग हें धोरण अवलंबितांनाहि कायदे मंडळांतील सभासदत्व कायम ठेवून तो अवलंबिला जात आहे. या सत्याग्रहास प्रातिनिधिक सत्याग्रह असें नांव मिळालें आहे. प्रातिनिधिक प्रतिकार—कायदेमंडळांतील विरोध अथवा अडवणूक—यासारखाच प्रातिनिधिक सत्याग्रह हें एक नवेंच तंत्र आजच्या लढ्यांत तूर्त अवलंबिण्यांत येत आहे. यावरून सार्वत्रिक सत्याग्रह हा आतां कायमचा मागें पडला असें कांहीं लोक म्हणत आहेत, पण तेंहि खरें नाहीं. हा प्रातिनिधिक वैयक्तिक सत्याग्रह युद्धकालापुरता असून युद्धान्तीं जगाची जी पुनर्घटना होणार आहे त्यावेळीं स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय यांची प्राप्ति न झाल्यास राष्ट्रसभा सार्वत्रिक सत्याग्रहहि करणार नाहीं असे नाहीं. फक्त आजच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितींत तसें करूं नये, असें म० गांधींचें मत आहे व तें राष्ट्रसभेनें मान्य केलें आहे. अर्थात् ही गोष्ट प्रतिपक्षाच्या वृत्तीवरहि अवलंबून आहे. देशांतील प्रस्थापित राजसत्ता बाह्य आघातानें खिळखिळी होण्याचा संभव असतां देशांत सार्वत्रिक सत्याग्रह आपण होऊन करूं नये, येवढेंच हें धोरण आहे.

## अहिंसा धर्मांतील अधिकार भेद

सत्य व अहिंसा हे नित्य धर्म असले तरी त्यांचे संपूर्ण आचरण करणें अपूर्ण मनुष्यास प्रायः अशक्यप्रायच आहे. हें जाणून प्रत्येक व्यक्तीनें व समाजानें आपापल्या अधिकारानुरूप अधिकांत अधिक सत्य व अहिंसा यांचें आचरण करण्याचा सतत प्रयत्न करीत असलें पाहिजे. आजचा समाज अपूर्ण असल्यानें त्यांतील व्यक्तीहि संपूर्ण सत्याचें व अहिंसेचें आचरण करूं शकत नाहींत याची जाणीव म. गांधींना

आहे व ती प्रत्येक गांधीवाद्यानेंहि ठेविली पाहिजे. गांधीवादाच्या दृष्टीनें हिंसा ही त्याज्य असली, तरी सर्वच हिंसा सारखीच निंद्य आहे, असें म्हणण्याचा अविवेक गांधीवादी करीत नाहींत. स्वतःच्या न्याय्यहक्कांच्या संरक्षणासाठीं करण्यांत येणारी हिंसा आणि इतरांच्या न्याय्य हक्कांवर आक्रमण करण्यासाठीं करण्यांत येणारी हिंसा या दोन्ही एकाच कोटींत पडतात असें केव्हांहि म्हणतां येणार नाहीं. ज्यांना स्वतःच्या न्याय्य हक्कांचें संरक्षण अहिंसेनें करतां येत नाहीं त्यांनीं हिंसेनें त्यांचें संरक्षण करणें हें त्यांचें सापेक्ष कर्तव्यच आहे. त्यांची अहिंसा ही निरपेक्ष वस्तू नसून ती सापेक्ष असते. बहुजन समाज अद्यापि निरपेक्ष अहिंसेचें आचरण करूं शकत नाहीं, म्हणूनच त्याला राज्यसंस्थेमार्फत होणाऱ्या शांतता रक्षणार्थ हिंसेची आवश्यकता भासत असते. स्वतःच्या न्याय्य हक्कांच्या रक्षणार्थ करावी लागणारी ही हिंसा प्रत्येक व्यक्तीनें न करतां ती लोकांना जबाबदार असणाऱ्या न्यायी सरकारमार्फत व्हावी अशी व्यवस्था लोकशाही राज्यांत होत असते. लोकशाही राज्यांतील सरकारी हिंसा न्यायांकित बनविण्याचा प्रयत्न केलेला असतो. सामान्य लोक अहिंसेनें आपल्या हक्कांचें संरक्षण करूं शकतील, तर या न्यायांकित सरकारी हिंसेचीहि आवश्यकता उरणार नाहीं, पण आज ती गोष्ट केवळ कल्पनेनेंच आकलन करावी लागते. तथापि युद्धांतील हिंसा ही अशी न्यायांकित हिंसाहि नाहीं. सर्व जगाचें एक सार्वभौम राज्य होईल व निरनिराळीं राष्ट्रें शस्त्र-संन्यास करून या सार्वभौम राज्याच्या हातीं केवळ शांततारक्षणापुरतें न्यायांकित सैन्यबल किंवा संरक्षक शस्त्रबल राहील, तेव्हांच सर्व राजकीय हिंसा ही न्यायांकित हिंसा बनेल. पण असें झालें तरी या सार्वभौम राज्यांत प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक वर्गाला व प्रत्येक राष्ट्राला आपल्या न्याय्य हक्कांचें संरक्षण अहिंसेनें करतां येणें अवश्य आहे.



जनतेला हें शिक्षण देऊन अहिंसा धर्माच्या आचरणाचा अधिकार प्रत्येक व्यक्तींत, वर्गांत व राष्ट्रांत आणणें हें सत्याग्रहाचें ध्येय आहे. हा अधिकार जितका जितका वाढत जाईल तितकी तितकी राजकीय हिंसा नष्ट होत जाईल. ज्यांच्यापाशी तो अधिकार नाहीं, त्यांनीं आपणास न झेपणारी उडी मारण्याचा प्रयत्न करूं नये. यासाठीं अहिंसेचें आचरण व प्रचार करणारांनीं कोणत्याहि व्यक्तींत, समाजांत व स्वतः मध्ये अहिंसाबल किती निर्माण झालें आहे, याचें अंतर्मुख दृष्टीनें निरीक्षण करून त्या त्या व्यक्तीला वा समाजाला अहिंसेचा मार्ग उपदेशिला पाहिजे. अहिंसाबलाच्या अभावीं आत्मरक्षणार्थ हिंसा करणें ही साक्षेप नीति बनते, तशीच इतरांच्याहि न्याय्य हितरक्षणार्थ हिंसा करणें हें, ज्यांनीं आत्मरक्षणार्थहि हिंसा न करण्याचें व्रत घेतलें नसेल, त्यांचें कर्तव्य बनतें.

याच तत्त्वास अनुसरून मागील महायुद्धाच्या वेळीं ब्रिटिश साम्राज्यांत राहून आपली राजकीय उन्नति करूं इच्छिणारांनीं शस्त्रबलानें त्याचें रक्षण केलें पाहिजे असें म० गांधी म्हणत होते. हें त्यांचें धोरण अनेक अहिंसावाद्यांना विशेषतः ख्रिस्ती धर्मांतील निरपेक्ष अहिंसावाद्यांना विसंगत वाटत होतें. पण ज्यांना अहिंसेनें हक्क रक्षण करणें शक्य नाहीं, त्यांनीं हिंसेनें तसें करणें हें योग्य व न्याय्य आहे हें गांधीवादी तत्त्व त्यांनीं समजून घेतलें असतें, तर त्यांना त्यांत विसंगति दिसली नसती. त्यावेळीं शस्त्रवाद्यांनीं प्रस्थापित राज्याच्या रक्षणार्थ लढावें असें म० गांधी म्हणत असले, तरी ते जेव्हां साम्राज्य-सरकारशी असहकारवादी बनले तेव्हां त्या सरकारवर बाहेरचें आक्रमण आलें तरीहि याच्याशीं सहकार्य करणें योग्य नाहीं, असें म्हणूं लागले. अर्थात् जालीयनवाला बागेंतील कत्तलीनंतर त्यांच्या वृत्तींत

ब्रिटिश साम्राज्यासंबंधीं जो फरक पडला त्याचें द्योतक असें हें धोरण होतें.

आज त्यांची युद्धविषयक भूमिका याहून भिन्न आहे. गेल्या वीस वर्षांत आपला व आपल्या राष्ट्राचा अहिंसाचरणाचा अधिकार अधिक वाढला आहे आणि राष्ट्ररक्षण व लोकशाहीरक्षण यासाठीं हिंसामार्ग निरुपयोगी ठरत असल्याची जाणीव जगांतील सामान्य जनतेंतहि वाढली आहे, असें म० गांधींचें मत बनलें आहे. शिवाय जगांतील दोनचार राष्ट्रें वगळल्यास इतर राष्ट्रांना शस्त्रबलानें आपलें रक्षण करणें व्यवहारतः अशक्य झालें असून लोकसत्ताक व समाजसत्ताक क्रांत्या शस्त्रबलानें यशस्वी होऊं शकत नाहींत याचीहि प्रतीति येत आहे. यामुळें निःशस्त्र क्रांतीचा व निःशस्त्र राष्ट्ररक्षणाचा सत्याग्रही मार्ग व्यवहार्य राजकारणांतील राष्ट्रनेत्यांना व क्रांतिकारकांना अनुकरणीय वाटूं लागला आहे.* तथापि हा मार्ग हिंदुस्थानाइतका



मोठ्या प्रमाणावर अद्यापि कोणीहि यशस्वी किंवा प्रभावी करून दाखविला नाहीं. लोकसत्ता व सम्राज्यसत्ता हीं प्रजाधर्मांतून निर्माण झालेलीं ध्येयें असून त्यांची संस्थापना करण्यास

---

* The conquest of Violence: By Bart Deligh या पुस्तकांतील पुढील उतारे या संबंधी वाचनीय आहेत. जर हॉलंडवर हिटलरनें स्वारी केलीतर त्यानें आपलें रक्षण कसें करावें या संबंधी ग्रंथकार लिहितात:

"What sense would there be, anyhow, in this minute country entering into armed conflict with a great nation endowed with a most formidable war equipment? ...

"We have another conceptron of national defence. If Hitler dares, let him come and occupy the country right up to the north sea. What could he do finding before him a people of obstinate tenacity, knowing what they want and doggedly applying the nonviolent methods of struggle against his military regime ?" 247-8

याच विचारसरणीस अनुसरून स्पेनमधील क्रांतिकारकांनीं सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करून जनरल फ्रँकोचा पराभव करावयास हवा होता असें या ग्रंथकारानें म्हटलें आहे.

"The best way to fight Franco would, no doubt, have been for the Spanish people to allow him to occupy all of Spain temporarily and then to let loose a great movement of nonviolent resistence (boycott, noncooperation and so on) against him. But our tactics also include, and far more than modern military tactics do, an effective international collaboration......In this case also, from the very beginning, a parallel movement of noncooperation from the outside should have been organized to support that of the inside, in an endeavour to prevent Franco and his friends from getting the materials for war or, at least, to keep these down to the mimimum." 199-200

या पुस्तकांत ग्रंथकारानें आधुनिक युरोपांतील क्रांतिकारकांना सत्याग्रही क्रांतिशास्त्राचें महत्त्व व्यवहारदृष्ट्या कसें पटूं लागलें आहे व सत्याग्रहानें समाजवादी क्रांति करणें व युद्ध बंद करणें, कसें शक्य आहे याची बरीच माहिती दिली आहे. हा ग्रंथकार स्वतः डच होता.

जी क्रांति करावी लागणार ती शांततेच्या मार्गानींच यशस्वी होईल, राजधर्मांतील हिंसावाद या कामीं उपयोगी पडण्याचा काळ आज उरला नाहीं व जेथें तो मार्ग यशस्वी होतो तेथेंहि या क्रांत्या विकृत बनून क्रॉमवेल, नेपोलियन यांच्यासारखी लष्करशाही किंवा स्टॅलिन-शाही सारखी एकपक्ष अनियंत्रित सत्ता निर्माण होते. यामुळें समाजांतील आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमतेंतून निर्माण होणारी अन्यायाची हिंसा नष्ट करण्यास सत्याग्रही क्रांतितंत्र अनेकांना अनुरूप वाटूं लागलें आहे. तसेंच हिटलरशाहीचा पाडाव करण्यास लोकशाही राष्ट्रांनीं सशस्त्र युद्धाचा मार्ग अवलंबिल्यास त्या लोकशाही राष्ट्रांतहि सवाई हिटलरशाही माजेल अशी भीति वाटूं लागली आहे. या सर्व परिस्थितीमुळें सशस्त्र युद्ध व सशस्त्र क्रांति यांना निःशस्त्र पर्याय शोधून काढणें व प्रजाजनांना आपलें आत्मबल संघटित करण्याचें व तें प्रभावी बनविण्याचें सप्रयोग शिक्षण देणें जागतिक राजकारणांत व्यवहारदृष्ट्या फार महत्त्वाचें बनत आहे. या कार्यांतून सत्याग्रही प्रजाधर्माचें एक नवें युग निर्माण होत आहे. त्याचे आद्य प्रणेते म्हणून म. गांधी व गांधीवाद यांची गणना जगांतील तत्त्वचिंतक करीत असतात.

म. गांधींना असें वाटतें कीं, राष्ट्रसभेनें याच कार्यास आपणांस वाहून घ्यावें आणि राजधर्मांतील हिंसा नष्ट होण्याचा काळ प्राप्त होईपर्यंत राजधर्माचें अनुसरणच करूं नये. म्हणजे स्वातंत्र्य मिळालें तरीहि तोंपर्यंत अधिकार स्वीकार करूं नये, पण सर्व राष्ट्रसभा हें धोरण स्वीकारील किंवा नाहीं, याची शंका आहे.

राष्ट्रसभेंत राष्ट्रवादी व समाजवादी असे जे दोन पक्ष आहेत ते आपल्या ध्येयांस पोषक होत असेल तेव्हां अधिकारस्वीकार करावा व राजधर्मांतील अपरिहार्य हिंसा निरुपाय म्हणून करावी, असें मानणारे आहेत. तरीहि ते सत्याग्रही क्रांतितंत्राचा स्वीकार करतात व स्वतःस सत्याग्रहीहि म्हणवितात. म० गांधी त्यांच्याशीं सहकार्यहि करतात व राष्ट्रसभेचें धोरण बहुमतानुसार चालावें असें म्हणतात. तथापि राजधर्मांतील हिंसेंतहि युद्ध व शांततारक्षण यांत भेद करून पहिली न्यायांकित नसते, व दुसरी न्यायांकित राहूं शकते, हा भेद लक्षांत घेतल्यास शांतता कालांतील अधिकार स्वीकार व युद्धकालीन अधिकार स्वीकार असाहि भेद गांधीवादांत करतां येईल. युद्धकालीन अधिकार स्वीकाराचें धोरण राष्ट्रसभेनें स्वीकारल्यास आपण राष्ट्रसभेंतून बाहेर जाऊं असें गांधी म्हणतात, पण युद्धोत्तर कालांत अधिकार स्वीकार केल्यास गांधीवादी राष्ट्रसभेंतून बाहेर पडतील असें वाटत नाहीं.



शांतता रक्षणासाठीं करावी लागणारी हिंसा कमी होण्यास प्रजेचें आत्मबल संघटित झालें पाहिजे. म्हणून तें करण्यांत गांधीवादी गुंतून राहतील व अधिकारी वर्गाला गोळीबार करावा लागेल असे प्रसंगच निर्माण होऊं नयेत असे प्रयत्न करतील. जाति, धर्म व वर्ग यांमुळें उत्पन्न होणारे भेद, विषमता व अन्याय यांतून दंगे होतात. तेव्हां समाजरचनेंतील ही हिंसा नष्ट करण्यास सतत झटत राहणें हें गांधीवाद्यांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य ते करीत राहतील त्या मानानें समाजांत क्रांति होऊन अन्याय व दंगे बंद पडतील व अर्थात् राजधर्मांतील हिंसाहि कमी होईल.

ज्या मानानें अ-हिंसात्मक राष्ट्ररचना होत जाईल, त्या मानानें जगांतील युद्धेंहि बंद पडतील व शस्त्रसंन्यासाचें ध्येय व्यवहार्य क्षेत्रांत येऊं लागेल. पण तसें होणें न होणें हें सत्याग्रहाच्या संघटनेवर अवलंबून आहे. ही संघटना वाढविणें हाच राजकीय हिंसा नष्ट करण्याचा खरा मार्ग आहे. ती संघटना वाढली नाहीं तोंपर्यंत राजधर्मांतून हिंसा नष्ट होणार नाहीं. अर्थात् राजकीय अहिंसेचें आचरण किती

प्रमाणांत केव्हां होईल तें आत्मबलाचा अधिकार प्रजेच्या अंगीं असण्यावर अवलंबून आहे. सत्याग्रही नेत्यांनें, व्यक्तींनीं किंवा संस्थांनीं आपला व आपल्या समाजाचा हा अधिकार वाढविला पाहिजे. हें अहिंसेचें सामर्थ्य अंगीं नसतांना राजधर्मांतील हिंसा नष्ट करण्याचा दुराग्रह धरून चालणार नाहीं. जोंपर्यंत अहिंसेनें शांततारक्षण करण्याचें सामर्थ्य सत्याग्रहींनीं निर्माण केलें नाहीं तोंपर्यंत राजधर्माचें आचरण करणारांनीं न्याय संस्थापनेसाठीं किमान अपरिहार्य हिंसा केली तर त्यांना दोष देतां येणार नाहीं. तसेंच जोंपर्यंत राष्ट्ररक्षण अहिंसेनें करण्याची संघटना आपण केलेली नाहीं व पुरेसें आत्मबल राष्ट्रांत निर्माण झालें नाहीं, तोंपर्यंत राष्ट्ररक्षणाच्या युद्धांची अडवणूक करणें हेंहि सत्याग्रहींचें धोरण होऊं शकत नाहीं. तथापि त्या युद्धांत सहकार्यहि ते करूं शकत नाहीं. ते तसे करतील तर आपलें व राष्ट्राचें आत्मबल संवर्धन करण्याचें आपलें कार्य ते करूं शकणार नाहींत. म्हणून त्यांनीं आपलें हें कार्य करीत असतां अहिंसावादाचें मिष करून युद्ध करण्याचें कर्तव्य टाळणाऱ्यांना आपल्या पक्षांत घेतां कामा नये. याच दृष्टीनें ज्यांचा अहिंसेनें राष्ट्ररक्षण करतां येईल असा विश्वास नसेल त्यांनीं सैनिक बनावें असा उपदेश म. गांधी करीत असत. आजहि हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापन झालें व स्वातंत्र्याचें आश्वासन मिळालें, तर ते तसें म्हणतील. पण प्रजेला आत्मबलानें राष्ट्ररक्षण करण्याचें शिक्षण देण्याचें आपलें कार्य ते चालू ठेवतील, सशस्त्र युद्धाचे दुष्परिणाम समजून सांगतील आणि शुद्ध अहिंसावाद्यांचें सत्याग्रही सैन्य निर्माण करतील. राष्ट्रसभेनें याच कार्यांत आपलें सर्व सामर्थ्य खर्च करावें व इतर पक्ष शस्त्रबलानें राष्ट्ररक्षण करूं शकले नाहींत तरीहि स्वातंत्र्याचा व लोकशाही संरक्षणाचा लढा अखेरपर्यंत कसा लढावा तें दाखवून द्यावें, असें म० गांधी म्हणतील. अर्थात् यासाठीं राष्ट्रसभेनें निदान युद्धकालांत तरी अधिकार स्वीकार करूं नये, स्वतंत्र होतांच युद्ध बंद करून जगांतील युद्धें बंद करण्याचें धोरण स्वीकारावें व आपण शांतता घडवून आणणारें तटस्थ राष्ट्र आहों असें शक्य तितक्या लवकर जाहीर करावें, असें ते म्हणतील. आपल्या राष्ट्राचें संरक्षण करण्याच्या व्यवहार्य दृष्टीनेंहि हें धोरण आजच्या ब्रिटिश सरकारच्या अथवा युद्धसहकार्यवादी इतर पक्षांच्या धोरणाहून अधिक योग्य आहे असें त्यांना वाटतें. शांततावादी तटस्थ राष्ट्रावर आज धोका येण्याचा जितका संभव आहे त्याहून ब्रिटिश साम्राज्याचा घटक, व युध्यमान घटक, राहण्यांत अधिक धोका आहे अशी ही दृष्टि आहे. साम्राज्यशाही ही हिंसक संस्था असल्यानें ती प्रतिपक्षाचीहि हिंसावृत्ति वाढविते. याच्या उलट ब्रिटिशांनीं साम्राज्यशाहीचा लोभ सोडला व आपल्या घटकांना संपूर्ण स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय दिला तर युद्ध थांबून जगांत शांतता स्थापन होईल व साम्राज्यशाहीचें अत्यंत हिंसक स्वरूप अशी जी हिटलरशाही तीहि नष्ट होईल असें म. गांधींना वाटतें.

यामुळें आज बिनशर्त युद्धसहकार्य करणें म्हणजे, बंद होऊं शकणारी अथवा अपरिहार्य हिंसा वाढविण्याचें पाप करण्यासारखें आहे. याच्या उलट आपण जर सत्याग्रहानें व असहकारानें ब्रिटिशांना साम्राज्यांतील घटकांना स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय देण्यास भाग पाडलें तर नव्या जगाची निर्मिती करण्यांत आपणांस भाग घेतां येईल. आज आपणापाशीं व राष्ट्रसभेपाशीं ही गोष्ट घडविण्याइतकें संघटित आत्मबल आहे असें म. गांधींना वाटत आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळीं हा आत्मविश्वास त्यांना वाटत नव्हता. अहिंसाधर्माच्या आचरणांत आज आपला व आपल्या राष्ट्राचा अधिकार वाढलेला आहे व

तदनुसार त्यानें आतां पुढें गेलें पाहिजे. फक्त आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य मिळालें म्हणजे आपण कृतार्थ झालों असें मानून आतां स्वस्थ बसूं नका तर आपल्या अधिकारानुसार आत्मविश्वास धारण करून जागतिक शांतता निर्माण करण्याचें, नव्या जगाची निर्मिती करण्याचें महत्कार्य करण्यास धैर्यानें पुढें चला, असें म. गांधी भरतखंडाला व भारतीय राष्ट्रसभेला सांगत आहेत. वीस वर्षांतील अखंड प्रयत्नांनीं त्यांचा उत्साह कमी झाला नसून तो एकसारखा वाढत आहे. हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुटत आला आहे. आतां अहिंसक राष्ट्ररचना करण्याचा व जागतिक शांतता स्थापण्याचा प्रश्न हातीं घ्या. त्यानेंच तुमचा अधिकार वाढेल व नव्या जगांत भरतखंडाला बहुमानाचें स्थान मिळेल. म. गांधींच्या चारित्र्याचा असा अखंड विकास होत आहे व भरतखंडाच्या आत्मबलाच्या विकासाचेंच तें एक गमक अहे. म. गांधींचा विकास हा भारताचा आत्मविकासच आहे. म. गांधींचें ध्येय भरतखंडाचेंहि ध्येय आहे व कालान्तरानें तें समग्र मानवतेचेंहि ध्येय बनणार आहे, किंबहुना आजहि बनूं लागलें आहे. पण म. गांधींच्या सेवेनें भरतखंडाला आज जो अहिंसाचरणांत अधिकार प्राप्त झाला आहे तो अद्यापि इतरांना झालेला नाहीं. हेंच भारताचें भाग्य व हाच म. गांधींचा मोठेपणा असें गांधीवादाचें म्हणणें आहे.

---

## अहिंसात्मक राष्ट्ररचना : : ४

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर आपण कोणता प्रश्न हातीं घ्याल, अशा अर्थाचा एक प्रश्न म० गांधींना विचारला असतां ' अहिंसात्मक



राष्ट्ररचना कशी करावी ' हें दाखवून देण्याचें कार्य मी हातीं घेईन असें उत्तर त्यांनीं दिलें. या उत्तरावरून गांधीवादांत रचनात्मक अथवा विधायक कार्यक्रमाला किती महत्त्व आहे त्याची बरोबर कल्पना येऊं शकते. गांधीवादाचें आजचें स्वरूप परकीय साम्राज्यांतून आपल्या राष्ट्रास मुक्त करण्याच्या प्रयत्नांचेंच दिसतें. राष्ट्रभक्ति आणि राष्ट्राभिमान हेच गांधीवाद्यांच्या अंगचे गुण विशेषत्वानें आज प्रकट होत असतात. यावरून युरोपांतील राष्ट्रवादी संप्रदायाशीं गांधीवादाची तुलना करण्यांत येत असते, पण तें खरें नाहीं युरोपांतील राष्ट्रवाद आणि गांधीवाद यांच्यांत मुळीच साम्य नाहीं. आपल्या राष्ट्रापलीकडे कोणतेंहि श्रेष्ठ दैवत नाहीं आणि राष्ट्रभक्तिसाठीं वाटेल ती अनीति आचरण्यास हरकत नाहीं, असें या राष्ट्रवादाचें आजचें स्वरूप आहे. वैयक्तिक स्वार्थांतून मुक्त झालेल्या मनुष्यानें राष्ट्रभक्तीनें प्रेरित होऊन कोणतेंहि दुष्कर्म केलें तरी तें समर्थनीय आहे, व्यक्तीच्या नीतिअनीतीची कसोटी राष्ट्रांना लावतां येणार नाहीं आणि राष्ट्रनिष्ठा हाच सर्वश्रेष्ठ सद्गुण आहे असें गांधीवाद मानत नाहीं. याच्या उलट व्यक्तीला जशी नीति आहे, तशीच राष्ट्रांनाहि नीति आहे आणि या नीतीच्या अवलंबनानेंच व्यक्तीप्रमाणें राष्ट्राचेंहि खरें हित होत असतें. गांधीवादाची सत्याग्रह नीति सत्य व अहिंसा या तत्त्वांवर अधिष्ठित झालेली असून आंतरराष्ट्रीय व्यवहारांतील हिंसा नष्ट करण्यासाठींच आज गांधीवाद ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध शांततेचा लढा चालवीत आहे. पण साम्राज्यशाहीचा अंत होऊन हिंदुस्थान राष्ट्र स्वतंत्र बनलें, म्हणजे आपलें अंतिम साध्य प्रातप झालें असें त्याचें मत नाहीं. याच्या उलट हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतरच आपल्या खऱ्या कार्यास प्रारंभ होणार आहे असें गांधीवादाचें मत आहे.

युरोपीय राष्ट्रांत राष्ट्रधर्माची वाढ झाली असली तरी त्याला हिंसक स्वरूप प्राप्त झालें आहे. हा हिंसक राष्ट्रधर्म म्हणजेच साम्राज्यवाद होय आणि या साम्राज्यवादाचें अतिरेकी स्वरूप म्हणजे आजची हिटलरशाही होय. अर्थात् हिटलरशाहीचें निर्मूलन करावयाचें तर राष्ट्रधर्माचें हिंसक स्वरूप आधीं नष्ट केलें पाहिजे. राष्ट्रधर्माचें हिंसक स्वरूप नष्ट करावयाचें तर परतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र बनण्याचें अहिंसात्मक साधन उपलब्ध झालें पाहिजे. म० गांधींनीं हिंदी स्वातंत्र्याचा लढा सत्याग्रहाच्या मार्गानें चालवून दाखवून हेंच कार्य केलें आहे, पण हें करीत असतां आपलें राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर हिंसक बनूं नये यासंबंधींहि त्यांनीं दक्षता घेतली आहे. राष्ट्राच्या जीवनांत हिंसा जितकी अधिक मुरलेली असेल तितकें तें राष्ट्र अधिक हिंसक बनेल व केवळ इतर राष्ट्रांवरच तें हिंसा करील असें नाहीं तर त्या राष्ट्रांतील सामान्य जनतेवरहि त्या राष्ट्राकडून हिंसा केली जाईल. यासाठी राष्ट्रीय जीवनांतील हिंसावृत्तीचें निर्मूलन करण्याचा आणि अहिंसावृत्तीचा आविष्कार राष्ट्रांतील सर्व व्यवहारांतून कसा होत राहील तें शोधून काढण्याचा प्रयत्न गांधीवाद्यांनीं करीत असलें पाहिजे. आजच्या राष्ट्रधर्मांत हिंसा शिरण्याचें मुख्य कारण युरोपीय कारखानदार पद्धतिच होय असें गांधीवादाचें मत आहे. आपल्या राष्ट्रांत त्या राष्ट्रांतल्याप्रमाणें प्रचंड कारखानदारी निर्माण झाल्यास हें राष्ट्रहि हिंसावादी बनेल अशी भीति गांधीवादाला वाटते व म्हणूनच गांधीवाद कारखानदारी पद्धतीच्या विरुद्ध आहे. ही कारखानदारी उत्पादनपद्धति राष्ट्रीय मालकीची बनविल्यानेंहि तिच्यांतील सर्व दोष व हिंसा नष्ट होऊं शकत नाहींत, म्हणून शक्य तों प्रत्येक खेडें आपल्या औद्योगिक गरजांच्या बाबतींत स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनावें अशी गांधीवादाची औद्योगिक योजना आहे. या ध्येयास अनुसरूनच



म० गांधींनी स्वदेशी चळवळीला ग्रामोद्योग संघटनेचें स्वरूप दिलेलें आहे व या सर्व ग्रामोद्योगांत खादीला केंद्रस्थान देण्यांत आलें आहे. ग्रहमालेंत ज्याप्रमाणें सूर्य त्याप्रमाणें सर्व ग्रामोद्योगांत खादी असें म० गांधी मानतात.

## स्वदेशी, खादी आणि ग्रामोद्योगः—

स्वदेशी चळवळ म० गांधी हिंदुस्थानांत येण्यापूर्वी पुष्कळ वर्षें सुरू झालेली होती. ब्रिटिश राज्याचें धोरण आपल्या उद्योगधंद्यांना मारक होत आहे याची जाणीव होणारांनीं प्रथमतः ही चळवळ सुरू केली. तिचा प्रारंभ प्रथमतः महाराष्ट्रांत झाला व नंतर वंगभंगाच्या चळवळीच्या वेळीं तिला राजकीय गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं ब्रिटिश मालावर घालण्यांत येणाऱ्या बहिष्काराची जोड देण्यांत आली. म० गांधींनीं हिंदुस्थानांत आल्यापासून स्वदेशी चळवळीचा जोरानें पुरस्कार करण्यास प्रारंभ केला, पण त्यांनीं या चळवळीला आर्थिक अहिंसावादाचें व्यापक स्वरूप दिलें. पूर्वीची स्वदेशीची चळवळ युरोपअमेरिकेप्रमाणें आपलें राष्ट्र संपन्न व्हावें या राष्ट्रीय भावनेवर अधिष्ठित झाली होती. तिचें ध्येय युरोपीय राष्ट्रांप्रमाणें आपल्या देशांत कारखानदारी निर्माण करावी हें होतें, एकंदर युरोपीय संस्कृतीचें अनुकरण करण्याची जी प्रवृत्ति आपल्या देशांत निर्माण झाली होती तिचेंच तें एक अंग होतें. आपल्या राष्ट्राचें अर्थशास्त्र अथवा आपल्या राष्ट्राची आर्थिक घटना युरोपीय राष्ट्रांच्या घटनेहून भिन्न झाली पाहिजे, असे अस्फुट विचार स्वदेशी चळवळ करणारांत मधून मधून दिसून आले तरी त्याचा अर्थ इतकाच होता कीं आपलें राष्ट्र मागासलेलें असल्यानें त्याच्या सरकारानें खुल्या व्यापारासारखें पुढारलेल्या राष्ट्रांना फायदेशीर होणारें पण मागासलेल्या राष्ट्रांना मारक

घोरण न अवलंबितां आपल्या देशांत यांत्रिक उत्पादनाचे कारखाने स्थापन होण्यास अनुरूप असें संरक्षक जकातीचें घोरण अवलंबावें. न्या. मू. रानडे यांनीं या आर्थिक धोरणाचा पुरस्कार प्रथम केला आणि ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाचें अंधानुकरण न करतां जर्मनीप्रभृति मागासलेल्या राष्ट्रांतील राष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञांनीं पुरस्कारिलेल्या धोरणाप्रमाणें आपलें राष्ट्रीय अर्थशास्त्र भिन्न बनविलें पाहिजे असें प्रतिपादन केलें. तथापि याचा अर्थ ब्रिटिशांच्या व्यक्तिस्वांतत्र्यवादी अर्थशास्त्रीय विचारांत आमूलाग्र क्रांति करून अगदी भिन्न सिद्धान्तांवर आपल्या आर्थिक घटनेचा पाया घातला पाहिजे असा कोणीहि केला नाहीं. त्यांच्या प्रतिपादनांतील संरक्षक जकातीचें धोरण आपल्या परिस्थितीस अधिक अनुरूप आहे येवढा निष्कर्ष मात्र बहुतेक हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं मान्य केला होता. पण न्या. मू. रानडे यांचें हिंदी अर्थशास्त्राचें विवेचन अधिक व्यापक व अधिक क्रांतिकारक विचारांचें निदर्शक होतें. Indian Political Economy या आपल्या सुप्रसिद्ध लेखांत न्या. मू. रानडे म्हणतात:—

"Modern thought is veering to the conclusion that the individual and his interests are not the centre round which the theory should revolve, that the true centre is the body politic of which that Individual is a member, and that collective defence and wellbeing, social education and discipline, and the duties and not merely the interests, of men, must be taken into account, if the theory is not to be merely utopian."*

* Essays on Indian Economics Pt. 20-21.



व्यक्ति आणि त्याचा स्वार्थ यांच्यावर आर्थिक घटनेचा पाया न घालतां, राष्ट्र व त्या संबंधीचें व्यक्तींचें कर्तव्य हा राष्ट्रीय आर्थिक घटनेचा आधारभूत पाया बनविला पाहिजे आणि राष्ट्रहितासाठीं शिस्त पाळण्याचें व त्याग करण्याचें शिक्षण व्यक्तींना देण्यांत आलें पाहिजे,असा वरील उद्गारांचा मथितार्थ आहे. ब्रिटिश अर्थशास्त्राचा आधार व्यक्तिस्वार्थ हा होता, तो बदलून व्यक्तीची राष्ट्रनिष्ठा व सामाजिक कर्तव्यभावना यांच्या आधारावर नवें भारतीय अर्थशास्त्र निर्माण करावें,असा न्या. मू. रानडे यांचा आशय होता,पण तो मूर्त स्वरूपास येऊं शकला नाहीं. म० गांधीनीं स्वदेशी चळवळीस जी दिशा लाविली तिच्यामुळें ग्रामोद्योगांचें एक नवें अर्थशास्त्र निर्माण झालें. या अर्थशास्त्राचा आधार व्यक्तींची स्वार्थभावना नसून कर्तव्यभावना ही आहे,तरी ही कर्तव्यभावना केवळ राष्ट्रनिष्ठेनें मर्यादित झालेली नसून ती मानवधर्मांत अंतर्भूत होणाऱ्या अहिंसावृत्ती इतकी व्यापक व खोल बनलेली आहे. एकदां स्वार्थाचा आधार सुटला, म्हणजे मनुष्याची कर्तव्यभावना केवळ राष्ट्रनिष्ठेनें मर्यादित राहूं शकत नाहीं, तिला मानवजातीच्या प्रेमाचें व न्यायाचें अधिष्ठान घ्यावें लागतें. म० गांधीनीं ग्रामोद्योगांच्या उद्धाराचें धोरण स्वदेशी भावनेला लावून दिल्यापासून अर्थशास्त्र व आर्थिक व्यवहार यांकडे भूतदया व न्यायनिष्ठा या भावनांनीं पाहण्याची नवी पारमार्थिक दृष्टि, लोकांना प्राप्त झाली. या दृष्टींतून एक नवें पारमार्थिक अर्थशास्त्र निर्माण होत आहे व तें जर्मनी प्रभृति राष्ट्रांत निर्माण झालेल्या राष्ट्रवादी आणि रशियांत मान्यता पावलेल्या समाजवादी अर्थशास्त्रांहून भिन्न आहे. या अर्थशास्त्राचा उगम जॉन रस्किनच्या ग्रंथांत आढळतो. क्रोपोटकिन्, टॉलस्टॉय प्रभृति रशियांतील भौतिक व आध्यात्मिक अराजकवाद्यांच्या ग्रंथांत त्याचा अधिक विस्तार केलेला दृष्टीस पडतो. तथापि त्याला व्यावहारिक प्रयोगावस्थेंत

आणण्याचें श्रेय म० गांधींना व त्यांच्या ग्रामोद्योगांच्या संघटनेलाच द्यावें लागेल.

### आर्थिक व्यवहार व पारमार्थिक दृष्टि—

आर्थिक व्यवहारांत सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति यांचें पालन करणें याचाच अर्थ पारमार्थिक दृष्टीनें अर्थव्यवहार करणें होय. स्वदेशी व्रतानें राष्ट्रीय दृष्टीनें आर्थिकव्यवहार करण्याचें शिक्षण लोकांना दिलेंच होतें. त्यामुळें स्वार्थबुद्धींतून निघून भारतीय अर्थशास्त्राचा कर्तव्यबुद्धींत प्रवेश झाला होता. कर्तव्य भावनेचें शुद्ध स्वरूप केवळ राष्ट्रनिष्ठा हें नसून सत्यनिष्ठा व अहिंसावृत्ति हें आहे असें नवें शिक्षण गांधीवाद देत आहे. मनुष्यानें आपली आर्थिक उन्नति करूं नये, कारण अर्थ हा अनर्थावह आहे, असें गांधीवाद प्रतिपादीत नाहीं. हा कर्मसंन्यासी परमार्थ गांधीवादाला मान्य नाहीं. गांधीवाद हा अनासक्त कर्मयोग आहे आणि प्रत्येकानें सत्यानें व अहिंसेनें आपली आर्थिक उन्नति करून घेतली असतां सर्व मानवजातीचें हित होईल असें त्याचें मत आहे. गांधीवादी अर्थशास्त्रांतील आर्थिक उन्नतीचें सूत्र पुढील सुभाषिताच्या रूपानें सांगतां येईल.

अकृत्वा परसंतापमगत्वा खलनम्रताम् ।
अनुत्सृज्य सतां वर्त्म यत्स्वल्प मपि तद्बहु ॥

दुसऱ्यांना त्रास न देतां, दुष्टांपुढें नम्र न होतां आणि संतांचा मार्ग न सोडतां जें थोडें मिळेल तेंच वस्तुतः विपुल होय. मनुष्यानें संपत्तीचा उपभोग घेऊं नये किंवा आर्थिक उन्नतीची इच्छा धरूं नये हा परमार्थ खरा नाहीं, आणि सर्व भौतिक संपत्ति ही माया आहे अथवा ती विपत्तीलाच कारण होते, असेंहि नाहीं. अन्यायार्जित संपत्ति ही मात्र विपत्तीला कारण होते, म्हणून आपल्या आर्थिक व्यवहारांत



न्यायनिष्ठेनें, म्हणजेच सत्यनिष्ठेनें व अहिंसेनें, वागण्याचा प्रयत्न करीत असतां जें अल्प धन मिळेल तीच खरी संपत्ति मानावी व त्यांतच सुख व समाधान मानावें हा पारमार्थिक अर्थशास्त्राचा—गांधीवादी अर्थ-शास्त्राचा—आधार आहे. संपत्ती ही मूलतः अनर्थावह नसली तरी तिची आसक्ति मनुष्याच्या बुद्धीला मोह पाडते व अन्यायाकडे मनुष्याची प्रवृत्ति बनविते. या मोहांतून मुक्त होऊन सर्व आर्थिक व्यवहार करण्याचें शिक्षण समाजाला दिलें पाहिजे. हें शिक्षण सत्पुरुषांच्या उदाहरणानें व राजसत्तेच्या निर्बंधांनीं देतां येतें. आपलें आर्थिक व्यवहार करीत असतां प्रत्येक व्यक्तीनें त्या व्यवहारांचे परिणाम समाजावर काय होत आहेत इकडे लक्ष दिलें पाहिजे. जर त्या व्यवहारांमुळें समाजांतील बेकारी व दारिद्य यांची वाढ होत असेल, जनतेला दुष्टांचें दास्य करावें लागत असेल, अथवा समाजांत अस-त्याची व हिंसेची प्रवृत्ति वाढत असेल, तर तो आर्थिक व्यवहार व्यक्तीनें करूं नये.

हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यांत गेल्यापासून या देशांत जे आर्थिक व्यवहार चालू झाले त्यांमुळें देशांतील जनतेची बेकारी व दारिद्य यांची वाढ होत आहे. स्वतंत्र धंदेवाले शेतकरी व कारागीर, कारखान-दारजमीनदारांच्या दास्यांत जात आहेत आणि स्पर्धाप्रधान अनिर्बंध व्यक्तिवादामुळें असत्य व हिंसा यांचीं प्रवृत्ति समाजांत वाढत आहे. ही प्रवृत्ति नष्ट करण्यास भांडवलशाही संस्कृति उपयोगी पडणार नाहीं व म्हणून तिचा स्वीकार करून जगाचा आर्थिक प्रश्न सुटूं शकणार नाहीं, हा संदेश भारतीय जनतेला प्रथम गांधीवादानें दिला. समाजवादाचेंहि असेंच मत असलें तरी तें भारतीय जनतेला प्रथम समाजवादानें शिकविलें नसून गांदीवादानेंच तें शिकविलें आहे. शिवाय आजच्या परिस्थितींत कारखानदारी पद्धति देशांतील बेकारी

व दारिद्र्य यांची वाढ थांबवूं शकत नाहीं व तें थांबविण्याचा तात्कालिक मार्ग ग्रामोद्योगांची संघटना हाच आहे, ही गोष्टहि समाजवादाला नाकारतां येत नाहीं. परंतु ग्रामोद्योगांची संघटना करूनहि तो माल फार महाग पडत असल्यानें लोक घेत नाहींत, म्हणून त्या उपायानेंहि खेड्यांतील वाढत्या बेकारीचा व दारिद्र्याचा प्रश्न सुटूं शकत नाहीं असें समाजवाद्यांना वाटतें. याच्या उलट कारखानदारी पद्धतीनें उत्पादनाचें केंद्रीकरण होतें व ते कारखाने राष्ट्रीय मालकीचे बनविले, तरीहि अन्यायाचें व पारतंत्र्याचें निवारण होऊं शकत नाहीं असें गांधीवादी म्हणतात. तथापि दोघांनाहि भांडवलशाही समाजरचना अनर्थावह वाटत आहे व आपलें अर्थशास्त्र व्यक्तिस्वार्थावर अधिष्ठित न करतां सेवाबुद्धि व कर्तव्यभावनेवर अधिष्ठित केलें पाहिजे, हें तत्त्व दोघांनाहि मान्य आहे. या भावना जागृत करण्याचें शिक्षण देण्यास आज ग्रामोद्योगांचें अर्थशास्त्रच उपयोगी पडत आहे हें कोणासहि नाकारतां येणार नाहीं. तसेच केंद्रीभूत कारखानदारीपेक्षां उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण किंवा प्रत्येक भौगोलिक घटक शक्य तों स्वावलंबी करण्याचें गांधीवादी तत्त्वहि समाजवादाला मान्य करणें भाग आहे. त्यांचा मुख्य मतभेद यांत्रिक उत्पादनासंबंधी आहे.

## गांधीवाद आणि यांत्रिक उत्पादन

गांधीवादाचा विरोध यांत्रिक उत्पादनाला नसून औद्योगिक केंद्रीकरणाला आणि कारखानदारी पद्धतींतून निर्माण होणाऱ्या आर्थिक विषमतेला आणि दास्याला आहे. राष्ट्राला लागणारा माल केवळ कमींत कमी श्रमानें निर्माण केल्यानें राष्ट्राचा अभ्युदय होत नसून त्या मालाची योग्य वाटणी झाली पाहिजे, सर्व लोकांना उद्योग मिळाला पाहिजे आणि आर्थिक विषमता व दास्य



यांची वाढ होतां कामा नये, तरच राष्ट्राची सर्वांगीण उन्नति होऊं शकते. यांत्रिक उत्पादन सुरू करतांना या सर्व जबाबदाऱ्या अंगावर घेऊन मगच ते सुरू केलें पाहिजे. तसेंच या जबाबदाऱ्या अंगावर घेऊन यांत्रिक उत्पादन करावयाचें म्हटलें व त्यासाठीं उत्पादनांचीं साधनें सार्वजनिक मालकीची बनविलीं, तरी राष्ट्रांतील सर्व विभागांतील स्थानिक गरजा भागविणें, प्रत्येक ठिकाणच्या कच्च्या मालाचा अधिकांत अधिक उपयोग करून घेणें आणि स्थानिक बेकारी व दारिद्र्य यांच्या निवारणाची जबाबदारी योग्यप्रकारें पार पाडणें या दृष्टींनीं विचार केल्यास प्रत्येक गांव नसलें तरी प्रत्येक तालुका म्हणजे एक दहाबारा हजारांचें छोटें शहर आणि त्याच्या सभोंवारची पन्नास साठ खेडीं येवढा विभाग, औद्योगिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व स्वावलंबी करणें इष्ट होणार आहे. असें व्हावयाचें तर जीं यंत्रें उत्पादनकार्यांत उपयोगांत यावयाचीं तीं आजच्या प्रचंड कारखान्यांतील यंत्राहून भिन्न प्रकारचीं असावी लागतील. तसेंच हिंदुस्थान हा शेती व उद्योगधंदे या दोहोंचाहि देश राहिला पाहिजे हें मान्य करणें सर्वांसच भाग असल्यानें खेड्यांतील लोक औद्योगिक शहरांत नेणाऱ्या कारखानदारी पद्धतीपेक्षां शहरांतील यांत्रिक साधनें अथवा यांत्रिक उत्पादन खेड्यांत नेणें हेंच आवश्यक दिसतें. कांहीं देशांनी केवळ शेती करून कच्चा माल बनवावा आणि कांहींनी केवळ कच्च्या मालाचा पक्का माल बनवावा, हें साम्राज्यशाही अर्थशास्त्र जसें टाकावू ठरलें आहे, त्याचप्रमाणें खेड्यांतील कच्चा माल शेकडो मैलांवर असणाऱ्या शहरांत न्यावा व तेथें पक्का बनून तो पुनः खेडोपाडीं विकला जावा ही पद्धति अनैसर्गिक आणि आर्थिकदृष्ट्या अधिक खर्चाची ठरणार आहे. आज ग्रामोद्योगांना यंत्रकलेचें, भौतिक संशोधनाचें व राजसत्तेचें

पाठबळ नाहीं आणि कारखानदारी पद्धतीला या सर्वांचा आश्रय आहे. यामुळें ग्रामोद्योग अगदींच नष्ट झाले आहेत. तरीहि ग्रामोद्योग संघटनेनें त्यांना हातांशीं धरल्यापासून खादी, हातकागद, कमावलेलीं कातडी व हाडें यांपासून होणारे जिन्नस, गूळ व साखर, साबण, हातसडीचे तांदूळ वगैरे अनेक ग्रामोद्योगांचा उद्धार करणें शक्य व इष्ट वाटूं लागलें आहे. अशाच प्रकारचें आणखी संशोधन झालें, यंत्रकला, भौतिक विद्या आणि सरकारचें पाठबळ यांचा उपयोग त्यांना करतां येऊं लागला, तर हिंदुस्थानांतील खेड्यांतील जीवनांत एक प्रचंड क्रांति घडून येईल. यांत्रिक उत्पादन आणि ग्रामोद्योग यांच्यांत विरोध नसून त्यांचा समन्वय होण्यांतच अहिंसक राष्ट्राचा आर्थिक पाया निर्माण करण्याचें सामर्थ्य आहे असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे व तें गांधीवादी तत्वज्ञान्यांना मान्य होत आहे. *

* श्री. किशोरीलाल मश्रुवाला यांनीं प्रस्तुत लेखकास लिहिलेल्या एका पत्रांत या विषयासंबंधी पुढील विचार प्रकट केले आहेत:—

"क्रोपोटकिनचें अर्थशास्त्र पुष्कळसें गांधीवाद्यांना मान्य आहे, जरी त्याचा अभ्यास फारसा झाला नाहीं. यांत्रिक सुधारणेच्या बाबतींत माझें मत येवढेंच आहे कीं, प्रत्येक उद्योगांत किती यंत्रीकरण करावें किंवा नवीन शोध दाखल करावेत हें त्याचा बेकारीवर, उत्पत्तीवर, वाटणीवर व अहिंसक स्टेटवर काय परिणाम होईल याचा विचार करून केलें पाहिजे. यांत्रिक प्रगति हेंच ध्येय न व्हावें, पण समाजाची घडी वाईट न होतां आस्ते आस्ते आवश्यकतानुसार सुधारणा करीत जावी."

तसेंच आर्थिक स्वयंपूर्णतेसंबंधी ते लिहितात : "मला या वेळेस असें वाटत आहे कीं, ग्राम हे घटक नसावें पण तहशील—म्हणजे एक लहानसें शहर ( १०–१५ ह. वस्तीचें ) व त्याच्या भोवतीं असलेलीं गांवें—हे घटक ठेवावे लागतील. तहशीलपेक्षां लहान घटक बरोबर होणार नाहीं. स्वयंपूर्णतेचा सिद्धान्त प्रत्येक गांवाला लागू करतां येणार नाहीं."



यावरून गांधीवादाचा विरोध यांत्रिक उत्पादनाला नसून औद्योगिक केंद्रीकरण, आर्थिक दास्य, वर्गकलह आणि आर्थिक विषमता यांना आहे. म० गांधींच्या विधायक कार्यक्रमांत आर्थिक समतेला आद्यस्थान देण्यांत आलें आहे व तोच अहिंसात्मक राष्ट्ररचनेचा पाया आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ता. १८ ऑगस्ट १९४० च्या हरिजनांतील "Implications of Constructive programme" या लेखांत ते लिहितातः—

The whole of this programme will however, be a structure on sand if it is not built on the solid foundation of economic equality."

अर्थः—"जर ही सर्व रचना आर्थिक समतेच्या भरभक्कम पायावर उभारण्यांत आली नाहीं, तर ती एक वाळूंतील पायावर बांधलेली इमारतच ठरेल."

## आर्थिक समतेची एक मूर्त योजनाः—

"सुखी समाजकी अर्थव्यवस्था" या मथळ्याचा एक लेख श्री. किशोरलाल मश्रुवाला यांनीं एप्रिल १९४१ च्या 'सर्वोदय' मासिकांत लिहिला आहे. त्यांत सुखी समाजाची आर्थिक रचना कशी असावी यासंबंधीं पुढील विचार प्रदर्शित केले आहेत.

( १ ) (क) प्रत्येक कुटुंबाचा निर्वाह योग्य प्रकारें चालला पाहिजे.

(ख) कुटुंबांतील आठ वर्षांच्या खालील सर्व मुलांचें व साठ वर्षांवरील सर्व वृद्धांचें पालन पूर्णपणें आणि आठपासून सोळा वर्षांवरील मुलांचें पालन अंशतः त्या कुटुंबास करतां आलें पाहिजे. तसेंच रुग्ण, पंगू व पाळीव जनावरें यांचेंहि पालन त्यांस करतां आलें पाहिजे.

(ग) पुरुषांना सरासरी साडेसहा तास व स्त्रियांना सरासरी चार तास उत्पादक काम करावयास लागावें. पण सुट्यांचे दिवस वजा जातां पुरुषाने आठ तास व स्त्रीनें पांच तास उत्पादक काम करावें. आठ वर्षांपासून सोळा वर्षांपर्यंतच्या मुलानें रोज एक तास उत्पादक काम करावें.

(घ) ज्या प्रकारचा कौटुंबिक भार आजच्या प्रौढ स्त्रीपुरुषांना उचलावा लागतो त्याचप्रकारचा भार मुलांना उद्या उचलावा लागणार आहे या दृष्टीनें मुलांना शारिरिक, मानसिक व बौद्धिक शिक्षण देण्यांत यावें.

(च) समाजाला आवश्यक असणाऱ्या सार्वजनिक कामाला प्रत्येकानें हातभार लावला पाहिजे.

(२) योग्य प्रकारचा निर्वाह चालण्यास पुढील गोष्टी आवश्यक समजाव्या

(क) पोटभर अन्न, थोडें दूध, तूप, मीठ, तेल, मसाले, कांहीं फळें, शरीररक्षणास आवश्यक कपडे, पलंग, बिछाना, कांबळे, जरूर तर मच्छरदाणी, साबण, दिवाबत्ती, फुटकळ सामान, भांडी, वर्तमानपत्र, पुस्तकें. पाहुणचार, यात्रा, आजार, विवाह, मृत्यु इत्यादिसाठी कांहीं बचत.

(ख) घर व गोठा.

(३) जोंपर्यंत प्रत्येक कुटुंबाला इतकी संपत्ति किंवा निर्वाहाची साधनें प्राप्त झालीं नाहींत तोंपर्यंत केवळ शोभा किंवा चैन करणें हा संपत्तीचा अपव्यय आहे.

(४) ही परिस्थिति कुटुंबाला प्राप्त होण्यास पांच मनुष्यांच्या कुटुंबास दरमहा ३७॥ रु. प्राप्ति लागेल. यांत पुरुषाचे २१॥ रु. स्त्रीचे १३॥ रु. आणि मुलाचे २॥ रु. असतील.



५. या हिशेबाप्रमाणें प्रत्येक कुटुंबास कमींत कमी ४५० रु. वार्षिक उत्पन्न मिळालें पाहिजे.

६. समाजांतील जास्तींत जास्त सधन कुटुंबास ६७५० रु. वार्षिक उत्पन्न मिळावें.

७. किमान मर्यादेवरील कुटुंबास जितकें वार्षिक उत्पन्न असेल त्याच्या पंधरा पटीहून अधिक उत्पन्न कोणासहि मिळूं नये व किमान मर्यादेवरील कुटुंबाची जी मालमत्ता असेल त्याच्या बारा पटीहून अधिक मालमत्ता कोणत्याहि कुटुंबापाशीं असूं नये. याहून अधिक मालमत्ता हा समाजाचा निधि समजावा. किमानमर्यादेखालील उत्पन्नावर समाजानें कोणतेहि कर लादूं नयेत किंवा त्या लोकांकडून समाजासाठीं कामहि करवून घेऊं नये.

८. समाजांतील उत्पादनसाधनांची व्यवस्था अशी असावी कीं प्रत्येक व्यक्तीस रोज दोन तास काम करून स्वतःचीं निर्वाह-साधनें मिळवितां यावींत व इतर काळ केलेल्या श्रमांतून त्याला आपल्या परिवाराचा निर्वाह करतां येऊन सामाजिक संपत्तींतहि भर घालतां यावी.

वरील योजनेंत समाजांतील आर्थिक विषमता नष्ट करण्यास समाजांतील कुटुंबांची मिळकत व मालमत्ता यांना किमान व कमाल मर्यादा घालण्याचें जें तत्व सुचविण्यांत आलें आहे, तेंच धोरण समाजवाद्यांनाहि एकवर्ग समाज निर्माण करतांना स्वीकारावें लागतें किंवा लागणार आहे.

समाजांतील प्रत्येक कुटुंबाच्या मिळकतीला व मालमत्तेला अशी कमाल व किमान मर्यादा कायद्यानें घालून त्यांच्यामधील अंतर क्रमा-क्रमानें कमी करीत नेणें हाच आर्थिक समता स्थापण्याचा अथवा

आर्थिक विषमतेंतून निर्माण होणाऱ्या हिंसेचें व अन्यायाचें निवारण करण्याचा व्यवहार्य मार्ग आहे. श्री. किशोरलालजी यांनी कुटुंबाच्या किमान मिळकतीची व मालमत्तेची जी आर्थिक मर्यादा वर्णिली आहे ती प्राप्त करून घ्यावयाची तरी आमचें सरासरी वार्षिक उत्पन्न आठ-दहापट वाढलें पाहिजे. ही वाढ होण्याच्या दृष्टीनें विचार केला किंवा व्यक्तीला स्वतःचा निर्वाह रोज दोन तास काम करून करतां आला पाहिजे हें ध्येय गांठावयाचें म्हटलें, तरी ग्रामोद्योगांना यांत्रिक उत्पादनाचें सहाय्य घ्यावें लागेल हें उघड आहे.

श्री. मश्रूवाला यांनी सुखी समाजाच्या आर्थिक जीवनाची जी योजना वर्णिलीं आहे ती अमलांत आली तरी तेवढ्यानें तो समाज सुखी होईलच असें नाहीं. कारण मनुष्याचें श्रेष्ठ सुख त्याच्या सांपत्तिक परिस्थितीवरच अवलंबून नसतें. त्यासाठीं समाजांतील संस्कृतीची ही पुनर्घटना झाली पाहिजे. खादी, ग्रामोद्योग इत्यादि आर्थिक कार्यक्रमाहून इतर जो विधायक कार्यक्रम म. गांधींनीं पुरस्कारिला आहे त्याचें ध्येय ही सामाजिक व सांस्कृतिक पुनर्घटना करणें हेंच आहे.

**गांधीवाद व समाजवाद—**

आज राष्ट्रसभेंत राष्ट्रवादी, गांधीवादी व समाजवादी अशा तीन वृत्ती दिसून येतात. गांधीवाद आज राष्ट्रवादाशीं विशेष सहकार्य करीत असल्याचें दिसलें, तरी हिंदी राजकारणांत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याला अग्रस्थान देण्याची परिस्थिति आज असल्यामुळें हें दृश्य दिसत आहे. राष्ट्रीय मध्यसरकार अस्तित्वांत आल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाचें लक्ष आपल्या राष्ट्राचें संरक्षण करण्यासाठीं त्याला प्रबल कसें बनवावें या प्रश्नाकडे लागेल व देशांतील भौतिक संपत्तीच्या वाढीकडेहि त्याला विशेष लक्ष द्यावें लागेल. पण या वेळीं



गांधीवादाला राष्ट्रवाद्यांपेक्षां समाजवाद्यांशी अधिक सहकार्य करावें लागेल, कारण जगांतील लष्करशाही व धनिकशाही नष्ट करून अहिंसक राष्ट्रनिर्मिति व आंतरराष्ट्रीय शांतता स्थापन करण्याचें पुढील कार्य या दोघांना अत्यंत आवश्यक वाटत आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा लाभ सर्वांस समानतेनें होण्यासाठीं कोणता कार्यक्रम अंगिकारावा, यासंबंधीं भाई जयप्रकाश नारायण या समाजवादी पक्षाच्या नेत्यानें १९४० च्या राष्ट्रसभेपूर्वीं रामगड येथील अधिवेशनापुढें ठेवण्यासाठीं एक ठराव म० गांधीच्यापाशीं दिला होता. तो ठराव राष्ट्रसभेपुढें मांडण्यांत आला नाहीं तरीहि म० गांधींनी बड्या संस्थानिकांसंबंधींची फक्त एक सूचना वगळून त्या कार्यक्रमास आपली संमति २० एप्रिल १९४० च्या हरिजनांत स्वतः लेख लिहून दिली आहे. गांधीवादाचा समाजवादी राष्ट्ररचनेसंबंधीं कोणता दृष्टीकोण आहे, तें या ठरावासंबंधीं म० गांधींनीं जे विचार प्रकट केले, त्यावरून कळून येणें शक्य आहे. या ठरावांतील महत्त्वाचा भाग व त्यावरील म० गांधींचे विचार पुढें दिलें आहेत:

"एक प्रचंड राष्ट्रीय आंदोलन होण्याच्या कालांत हें राष्ट्र व राष्ट्रसभा आज आहेत. स्वातंत्र्याचा अंतिम संग्राम लवकरच लढला जाणार आहे. सर्व जगांत परिवर्तन घडवून आणणाऱ्या प्रचंड शक्ति संचार करीत असतांना हें घडून येणार आहे. युरोपीय महायुद्धाच्या महान् आपत्तींतून एका नव्या जगाची निर्मिति करण्याचा विचार विवेकी मनांत उद्भूत होत आहे—राष्ट्राराष्ट्रांतील, मनुष्यामनुष्यांतील सहकार्य व प्रेम या भावनांवर अधिष्ठित झालेलें नवें जग (निर्माण केलें पाहिजे). अशा प्रसंगीं ज्या स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं आपण लढत आहों आणि ज्यासाठीं हिंदी जनतेला आत्यंतिक क्लेश

सहन करण्यास आपण, आवाहन देणार आहो, त्या ध्येयांची निश्चित कल्पना जनतेला देणें राष्ट्रसभेला अवश्य वाटतें.

" स्वतंत्र हिंदुस्थान राष्ट्राराष्ट्रांत शांतता स्थापन व्हावी आणि संपूर्ण शस्त्रसंन्यास अमलांत यावा, यासंबंधीं प्रयत्न करीत राहील. तसेंच राष्ट्राराष्ट्रांतील तंटे एखाद्या आंतरराष्ट्रीय अधिकारी राजकीय संस्थेमार्फत शांततेनें मिटविले जावेत व ही राजकीय संस्था स्वतंत्रतेनें निर्माण व्हावी, असाहि प्रयत्न राष्ट्रसभा करील. विशेषतः लहान-थोर शेजारी राष्ट्राशीं अत्यंत स्नेहभावनेनें राहावें आणि कोणत्याहि परराष्ट्रीय भूमीवर लोभी नजर ठेवूं नये, असें धोरण अमलांत आणण्याचा प्रयत्न राष्ट्रसभा करील.

" राष्ट्रांतील कायदे जनतेनें स्वतंत्रपणें व्यक्त केलेल्या मतावर अधिष्ठित झालेले असतील. राष्ट्रांतील सुव्यवस्थेचा अंतिम आधार लोकमताचें ऐक्य व त्याची शक्ति हाच असेल.

"भारतीय स्वतंत्र स्वराज्य प्रत्येक राष्ट्रिकास संपूर्ण राष्ट्रिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक व धार्मिक स्वातंत्र्य यांची हमी देईल. मात्र हिंदी जनतेनें घटनापरिषदेमार्फत बनविलेली राज्यघटना अत्याचारानें उलथून पाडण्याचें स्वातंत्र्य कोणासहि मिळणार नाहीं.

" राष्ट्रिकाराष्ट्रिकांमध्यें सरकार कोणताहि भेदाभेद करणार नाहीं. प्रत्येक राष्ट्रिकास समान हक्काची शाश्वति देण्यांत येईल. जन्मजात भेदाभेद व सवलती सर्व नष्ट करण्यांत येतील, वंशपरंपरेनें मिळणाऱ्या किंवा सरकारनें दिलेल्या कोणत्याहि पदव्या कोणास मिळणार नाहींत.

" सामाजिक न्याय व आर्थिक समता यांच्या आधारावर स्वराज्याची आर्थिक व राजकीय घटना बनविण्यांत येईल. ही घटना समाजांतील सर्व व्यक्तींच्या गरजा भागविण्याचा शक्यतो प्रयत्न करील,



तरीहि भौतिक सुख हें एकच तिचें ध्येय असणार नाहीं. आरोग्यदायक राहणी आणि व्यक्तींची बौद्धिक व नैतिक उन्नति हें तिचें साध्य राहील. यासाठीं सामाजिक न्यायसंस्थापना करावी म्हणून लहान प्रमाणावर चालणाऱ्या वैयक्तिक उत्पादनाला व सर्वांच्या समान हितासाठीं चाललेल्या सहकारी उत्पादनाला सरकार साहाय्य करील. मोठ्या प्रमाणावर चाललेलें सर्व सामुदायिक उत्पादन अंतीं सामुदायिक मालकीखालीं व नियंत्रणाखालीं आणण्यांत येईल. याचा उपक्रम करतांना दळणवळणाचीं प्रचंड साधनें, जहाजें, खाणी आणि जड धातूंचे कारखाने यांचें राष्ट्रीकरण प्रथम करण्यांत येईल. कापडाच्या धंद्याचें क्रमाक्रमानें विकेंद्रीकरण करण्यांत येईल.

" ग्रामजीवनाची पुनर्घटना करण्यांत येऊन ग्रामीण स्वराज्य स्थापन केलें जाईल. खेडीं शक्य तितकीं स्वयंपूर्ण बनविण्यांत येतील. देशांतील जमिनीसंबंधींच्या कायद्यांत आमूलाग्र सुधारणा करण्यांत येऊन प्रत्यक्ष शेत कसणाऱ्याचीच मालकी शेत जमिनीवर असावी, हें धोरण स्वीकारण्यांत येईल. तसेंच आपल्या कुटुंबाचा निर्वाह बऱ्या प्रकारें चालेल इतक्याहून अधिक जमीन कोणाहि शेतकऱ्याला मिळणार नाहीं. या धोरणामुळें जमीनदारीच्या निरनिराळ्या पद्धति व भूदास्याचे निरनिराळे प्रकार नष्ट होतील.

" समाजांतील निरनिराळ्या वर्गांचें हितरक्षण सरकार करील परंतु जेव्हां दरिद्री व दलित वर्गाच्या हिताशीं वरिष्ठ वर्गाच्या हिताचा विरोध येईल, तेव्हां पहिल्या वर्गाचें हितरक्षण करून सामाजिक न्यायदानाचा ताजवा समतोल बनविण्यांत येईल.

" सरकारी मालकीखालीं व व्यवस्थेखालीं चालणाऱ्या सर्व उद्योगधंद्यांतील व्यवस्थाकार्यांत कामगारांना प्रतिनिधित्व देण्यांत येईल.

आणि सरकारनियुक्त प्रतिनिधींच्या बरोबरीची सत्ता कामगारनियुक्त प्रतिनिधींनाहि राहील.

"हिंदी संस्थानांत पूर्ण लोकसत्ताक राज्यपद्धति अस्तित्वांत येईल. सामाजिक भेदाभेद नष्ट करून राष्ट्रिकांत समता स्थापन करण्याच्या दृष्टीनें राजे, नबाब वगैरे कोणीहि राज्याधीश राहणार नाहींत.

"असें जग राष्ट्रसभेच्या मनश्चक्षूंपुढें आहे, व त्याची स्थापना करण्यासाठीं ती प्रयत्न करीत राहील. या जगांत सर्व वंशांच्या, जातींच्या व धर्मांच्या लोकांना सुख, संपत्ति व स्वातंत्र्य यांची प्राप्ति होईल व या सर्वांच्या प्रयत्नांनीं या पायावर एक प्रचंड वैभवशाली राष्ट्र निर्माण होईल, असा राष्ट्रसभेचा विश्वास आहे."

या ठरावाला आपला पाठिंबा देतांना म. गांधी लिहितात:—

"(या ठरावासंबंधीं) मी केलेल्या प्रयत्नाचें काय झालें तें मी श्री. जयप्रकाश यांना कळविलें, तेव्हां त्यांनीं उत्तर धाडलें कीं, आपण त्या ठरावाला पूर्ण किंवा शक्य तितका पाठिंबा देऊन तो प्रसिद्ध केला तरी माझें समाधान होईल.

"श्री. जयप्रकाश यांच्या इच्छेला मान देण्यांत मला कोणतीहि अडचण नाहीं. हिंदुस्थान स्वतंत्र होतांच शक्य तितक्या लवकर अमलांत आणण्याचें ध्येय, या दृष्टीनें श्री. जयप्रकाश यांनीं प्रतिपादलेल्या सिद्धांतांपैकीं फक्त एक वगळून मी सर्वांना सर्वसामान्य मान्यता देतों.

"आज हिंदुस्थानांत जे समाजवादी आहेत त्यांनीं आपलें ध्येय जाहीर करण्यापूर्वींच मी समाजवादी झालों होतो असा माझा दावा आहे. पण माझा हा समाजवाद कोणत्याहि पुस्तकांतून मी घेतलेला नसून तो माझ्या नैसर्गिक वृत्तींतूनच निर्माण झालेला होता. अहिंसेवरील माझ्या अचल निष्ठेंतून त्याचा उगम झाला आहे. जो मनुष्य



कोणत्याहि सामाजिक अन्याया-विरुद्ध-मग तो अन्याय कोठेंहि असो बंड करून उठूं शकत नाहीं तो सक्रिय अहिंसावादी होऊंच शकत नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें समाजवादी सिद्धान्ताची स्थापना करण्यासाठीं अत्याचाराची आवश्यकता आहे असा पाश्चात्य समाजवाद्यांचा विश्वास आहे हें दुर्दैव होय.

"माझा असा नित्य विश्वास आहे कीं अत्यंत अवनत व हीन गणलेल्यांनाहि सामाजिक न्याय मिळावयाचा तर तो शस्त्रबलानें मिळूंच शकणार नाहीं. तसाच माझा असाहि विश्वास आहे कीं अत्यंत अवनत लोकांनाहि अनत्याचारी मार्गाचें शिक्षण दिल्यास आपणांवर होणाऱ्या अन्यायांचें निवारण त्यांना करता येईल. याचेंच नांव अनत्याचारी असहकार. सहकार हा जसा एक धर्म आहे तसाच असकार हाहि विशिष्ट परिस्थितींत धर्म बनत असतो. आपल्या नाशाशीं किंवा गुलामगिरीशीं सहकार्य करण्यास कोणीहि बांधलेला नाहीं.

"म्हणून त्यांच्या ठरावावरून आपणांस अभिप्रेत असणारें जग अनत्याचारी मार्गानें निर्माण होईल याला त्यांनीं मान्यता दिली आहे असें मला दिसतें, हें पाहून माझ्या अंतःकरणास आनंद होत आहे. माझी अशी खात्री आहे कीं अनत्याचारी असहकारानें जें प्राप्त होऊं शकतें तें अत्याचारानें कधींहि प्राप्त होत नाहीं व तेंहि अन्याय करणारांचें हृदय परिवर्तन होऊन घडून येतें. अनत्याचाराला द्यावी तितकी संधीच आपण अद्यापि हिंदुस्थानांत दिलेली नाहीं. इतकें असूनहि त्यापासून आपला इतका लाभ झाला आहे हें आश्चर्य आहे.

"श्री. जयप्रकाश यांचे जमिनीसंबंधीचे सिद्धान्त भयंकर भासूं शकतील; पण वस्तुतः ते तेस नाहींत. कोणत्याहि मनुष्यापाशी त्याच्या प्रतिष्ठित निर्वाहास आवश्यक असणाऱ्या जमिनीहून अधिक

जमीन असूं नये. आपली स्वतःची अशी जमीन नसल्यामुळेंच जनतेला दीन दारिद्य भोगावें लागत आहे ही वस्तुस्थिति कोण नाकारूं शकेल ?

× × ×

" म्हणून श्री. जयप्रकाश यांच्या सिद्धान्तांना अनत्याचारी दृष्टीनें सर्व सामान्य पाठिंबा देण्यास मला अडचण वाटत नसली, तरी संस्थानिकांसंबंधींच्या त्यांच्या सिद्धान्ताला मी पाठिंबा देऊं शकत नाहीं. अनत्याचारी मार्गांनी आम्हांस स्वातंत्र्य मिळालें—व श्री. जयप्रकाश यांच्या योजनेंत तसेंच गृहीत केलेलें आहे—तर ज्या योजनेंतून संस्थानिक स्वेच्छेनें नाहींसे झाले आहेत अशी योजना माझ्या कल्पनेंत येऊं शकत नाहीं. त्यांच्याशीं कांहींहि समेट झाला तरी तो राष्ट्राला पूर्णपणें पाळावा लागेल. म्हणून अशीच तडजोड माझ्या कल्पनेंत येऊं शकतें कीं जींत मोठ्या संस्थानिकांना आपला दर्जा कायम ठेवितां येईल. एका दृष्टीनें हा दर्जा आजच्या पेक्षाहि श्रेष्ठ असेल पण दुसऱ्या दृष्टीनें तो मर्यादित झालेला असेल, कारण हिंदुस्थानांतील इतर प्रांतांतील लोकांना जे स्वराज्याचे हक्क उपभोगितां येतील ते सर्व हक्क त्यांना आपल्या प्रजेलाहि द्यावे लागतील........कदाचित् श्री. जयप्रकाश यांना असा विश्वास नसेल कीं हे संस्थानिक आपण होऊन आपली अनियंत्रित सत्ता सोडण्यास तयार होणार नाहींत पण माझा तसा विश्वास आहे. "

गेलीं वीस वर्षे राष्ट्रापुढें राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्ति व राष्ट्रीय सरकार हेच प्रश्न प्रामुख्यानें असल्यानें गांधीवादाला राष्ट्रवाद्यांशीं सहकार्य करणें भाग होतें. यापुढील वीस वर्षांतील हिंदी राजकारणाचा विचार करूं लागल्यास अहिंसात्मक राष्ट्ररचना व आंतरराष्ट्रीय शांतता या गोष्टींना महत्त्व येणार आहे, या कार्यांत गांधीवाद व समाजवाद यांना



सहकार्यानें काम करावें लागणार आहे. गांधीवाद्यांना अभिप्रेत असणारें ' रामराज्य ' हें राष्ट्राचें निकटवर्ती ध्येय होऊं शकत नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचें अहिंसात्मक निकटवर्ति ध्येय या दृष्टीनें श्री. जयप्रकाश यांच्या वरील ठरावांत दिग्दर्शित केलेलें जगच गांधीवादी व समाजवादी या दोघांना थोड्याफार फरकानें मान्य करावें लागेल व त्याच्या प्राप्तीचें साधन अनत्याचारी असहकार किंवा सत्याग्रह असें निश्चित करावें लागेल. यालाच आम्ही सत्याग्रही समाजवाद म्हणतों व तो युद्धोत्तर काळांत राष्ट्रसभेला स्वीकारावा लागेल असें आमचें मत आहे. श्री. मश्रूवाल्यांच्यासारखे गांधीवादी व श्री. जयप्रकाश यांच्यासारखे समाजवादी यांनीं एकत्र बसून राष्ट्रसभेचें स्वातंत्र्याचें चित्र निश्चित करण्याचा काळ आतां प्राप्त झाला आहे.

## जातिभेद, वंशभेद व तज्जन्य हिंसाः—

जातिसंस्थेचा मूळ उद्देश जातीय विषमता व सामाजिक दास्य निर्माण करण्याचा नसून औद्योगिक श्रमविभाग व परंपरागत संस्कृतिरक्षण हा होता. पण या भेदामुळें आज सामाजिक विषमता व दास्य यांचा उद्भव झाला आहे आणि मूळचा उद्देश विकृत वा विपर्यस्त झाला आहे. जातीजातींतील विषमता अथवा उच्चनीच भाव यांतून सामाजिक अन्यायाचा म्हणजेच हिंसेचा उद्भव होतो आणि राष्ट्र छिन्नभिन्न बनतें. ही विषमता कायम राखण्यास कायद्याचा अथवा रूढीचा आधार घेतला म्हणजे राजसत्तेचा पाठिंबा या हिंसेला मिळतो. अशा प्रकारच्या सामाजिक अन्यायाचें आत्यंतिक उदाहरण म्हणजे हिंदू समाजांतील हरिजनांची जन्मजात अस्पृश्यता हेंच होय. गांधीवादाच्या मतें ही जन्मजात अस्पृश्यता हा हिंदूधर्मावरील कलंक आहे व तो धुवून टाकिल्यावांचून अहिंसात्मक राष्ट्ररचना करतां

येणार नाहीं. अस्पृश्यता निवारणानें हिंदू समाजांतील सर्व सामाजिक विषमतेचा अंत होणार आहे व जातिभेदहि नष्ट होणार आहे. अस्पृश्य गणलेल्या हरिजनांना समानतेनें वागविण्याची बुद्धि सर्वत्र केल्याखेरीज खरें स्वराज्य किंवा खरें स्वतंत्र राष्ट्र निर्माण झालें असें म्हणतां येणार नाहीं. ही सुधारणा जर आपण करून दाखविली तर जे युरोपीय लोक वर्णाचा अभिमान बाळगून गौरेतर वंशांतील मनुष्यांना हीन लेखतात, त्यांना मानव संस्कृतीचा एक नवा धडा आपण शिकविला असें होईल. रेड इंडियन लोकांना कापून काढणाऱ्या गोऱ्या अमेरिकन लोकांच्या हिंसात्मक लोकशाहीपेक्षा अधिक श्रेष्ठ लोकशाही संस्कृति भरतखंडांत निर्माण व्हावयाची असेल तर धर्माच्या नांवानें होत असलेल्या हरिजनांवरील अन्यायाचें परिमार्जन उच्चवर्णीय म्हणवून घेणाऱ्या हिंदूंनीं केलें पाहिजे.

### भाषाभेद, प्रांतभेद व तज्जन्य हिंसा:—

हिंदुस्थान हें एक अनेक प्रांत व अनेक भाषा यांनीं युक्त असें खंड-राष्ट्र आहे. हिंदुस्थानांतील एकेक भाषा बोलणारे प्रांत म्हणजे युरोपांतील एकेक राष्ट्र आहे. एकेकाळीं हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे किंवा नाहीं,यासंबंधीं वाद होत असे व आजहि हिंदु व मुसलमान अशीं दोन राष्ट्रें येथें नांदत आहेत असें म्हणणारे कांहीं लोक आहेत तथापि हिंदुस्थानांत जितक्या भाषा किंवा जितके प्रांत आहेत तितकीं राष्ट्रें येथें नांदत आहेत किंवा तितकीं राष्ट्रें येथें निर्माण करावींत असें कोणीहि म्हणत नाहीं. शिवाय हिंदू व मुसलमान हीं दोन राष्ट्रें आहेत असें म्हणणारे लोकहि या दोन राष्ट्रांचें एक संयुक्त राज्य बनावें असें म्हणतातच. अर्थात् गांधीवादाला ही धर्मविशिष्ट भिन्न राष्ट्राची कल्पना मुळींच मान्य नाहीं. आधुनिक राष्ट्राची कल्पना



युरोपांत निर्माण झाली व ती प्रायः एकभाषी देशांनाच लावण्यांत येत असते. तथापि हिंदुस्थान हें बहुभाषी राष्ट्र आहे. यांत अनेक प्रांतभाषा आहेत व त्याला एक राष्ट्रभाषाहि आहे. हिंदुस्थानी ही त्याची राष्ट्रभाषा असून तिच्यांत फारशी शब्दांचें प्राचुर्य असल्यास उर्दू व संस्कृत शब्दांचें प्राचुर्य असल्यास हिंदी असें म्हणतात. गांधीवादांत राष्ट्रभाषा व प्रांतभाषा या दोहोंचाहि अभिमान अभिप्रेत आहे. राष्ट्रभाषा ही हिंदुस्थानांतील बहुसंख्य जनतेची बोलण्याची भाषा असावी व ती प्रत्येक प्रांतांतील बहुजन समाजाला सहज समजेल अशी असली पाहिजे. राष्ट्रभाषा ही आंतरप्रांतीय व्यवहारांत उपयोगी पडली पाहिजे व अखिल भारतीय कामें त्यांत होत राहिलीं पाहिजेत. प्रांतभाषा ही मातृभाषा असून मनुष्याच्या मनावर बाळपणापासून होणारे सर्व संस्कार तीच करूं शकते आणि त्याच्या विचारांचें आद्य माध्यम तीच होऊं शकते. मातृभाषेच्या अभिमानाचें स्थान राष्ट्रभाषा घेऊं शकणार नाहीं अथवा मातृभाषेचा अभिमान हा राष्ट्रभाषेचा अभिमानहि होऊं शकणार नाहीं.

प्रांतभाषेचा अभिमान राष्ट्रभाषेच्या अभिमानाच्या आड येऊं देतां कामा नये, नाहींतर हिंदुस्थानांत जितक्या भाषा तितकीं राष्ट्रें बनून तीं एकमेकांशीं नित्य लढत राहण्याची आपत्ति ओढवेल. युरोपांतील राष्ट्रभावना एकभाषेवरच आधारलेली आहे. त्यामुळें त्यांची संघटना लवकर झाली तरी आज ही राष्ट्रभावना संकुचित बनून युरोपखंडांत यादवी माजविण्यास व युरोपांतील राष्ट्रीय वैरांतून उद्भवलेलीं महायुद्धें जगभर पसरविण्यास कारण होत आहे. युरोपखंडाचें एक संयुक्त राज्य बनेल व हिंदुस्थानांतील प्रांतांप्रमाणें तेथील राष्ट्रें या खंडराष्ट्राचे प्रांत बनतील तेव्हांच युरोपांत व जगांत खरी शांतता नांदू शकेल. अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांचें एक

खंडराष्ट्र कसें बनवावें ही कला भरतखंडापासून युरोपखंडाला शिकावी लागेल. युरोपचें अंधानुकरण करून प्रत्येक प्रांतभाषेला राष्ट्रभाषेचें व प्रत्येक प्रांताला राष्ट्राचें स्थान देण्याचा दुराग्रह धरल्यास हिंदुस्थानचे तुकडे पडण्यास व सर्वांनाच कायमचें दास्य प्राप्त होण्यास प्रत्यवाय नाहीं. म्हणून प्रांतभाषा व प्रांताभिमान यांना राष्ट्रभाषा व राष्ट्राभिमान यांचें स्थान देण्याची भावना हिंदी राष्ट्रांत हिंसावृत्ति निर्माण करील व सर्वांचा नाश करील या वृत्तीनें राष्ट्रनिर्मिती करण्याचे प्रयत्न गांधीवादी करीत असतात. प्रांतभाषा व मातृभाषा यांचें योग्य स्थान व योग्य अभिमान प्रत्येक राष्ट्रिकाच्या अंतःकरणांत बाणविणें ही गांधीवादी विधायक कार्यक्रमांतील एक महत्त्वाची बाब आहे.

## आरोग्य रक्षण आणि व्यसननिवृत्ति—

म. गांधींच्या विधायक कार्यक्रमांत गांवसफाई आणि मद्यबंदी यांना फार महत्त्वाचें स्थान आहे. सार्वजनिक आरोग्य रक्षणाच्या दृष्टीनें गांवसफाईला विशेष महत्त्व असून हिंदू समजांतील सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्यानें हें सफाईचें भंगी-काम करण्यांत आनंद मानिला पाहिजे असें म. गांधी मानतात. निरनिराळ्या जातींत निरनिराळी कामें वाटून देण्याच्या पद्धतीमुळें समाजाचें हित झालेलें असलें तरी कांहीं जाती आपणांस श्रेष्ठ मानूं लागल्या आणि सार्वजनिक आरोग्यास अवश्य परंतु अस्वच्छ वाटणारीं कामें करणाऱ्या जातींना हीन लेखूं लागल्या.समाजाला अवश्य असणारीं सर्व कामें सारख्याच दर्जाचीं असून त्यांतील अस्वच्छ वाटणारीं कामें करण्यांत मनुष्याला मोठेपणा वाटला पाहिजे. शक्य तों स्वतःचीं स्वतःच हीं कामें करणें हें प्रत्येकानें आपलें कर्तव्य समजावें. तसेंच सार्वजनिक स्थळें व रस्ते स्वच्छ ठेवण्याचें शिक्षण



समाजाला दिल्यावांचून राष्ट्रबुद्धीचा विकास होणार नाहीं व सार्वजनिक आरोग्यहि टिकणार नाहीं. सार्वजनिक आरोग्य शास्त्राची वाढ इतकी झाली पाहिजे कीं समाजांत डॉक्टरवैद्यांची व रुग्णालयांची आवश्यकताच पडूं नये. ही आवश्यकता जितकी अधिक लागेल तितकें सामाजिक जीवन आरोग्यदृष्ट्या अशास्त्रीय चाललें आहे असें समजलें पाहिजे.

निरोगी जीवनाच्या दृष्टीनें आहार शास्त्राचीहि पुष्कळ वाढ झाली पाहिजे आणि आहाराचें नियंत्रण केवळ जिव्हालोलुपतेनें करण्याची पशुवृत्ति समाजांतून नष्ट झाली पाहिजे. आरोग्यदायक आहारांत रुचि वाटली पाहिजे आणि केवळ जिभेचे चोचले भागविण्यासाठीं हानिकारक आहार करण्याची प्रथा बंद झाली पाहिजे. आहार-शास्त्राची वाढ अद्यापि फारशी झालेली नाहीं. साधे, सात्त्विक व पौष्टिक अन्न खाण्याची सवय समाजाला लागली पाहिजे.

आहाराप्रमाणें सर्वच भौतिक भोगांत संयम आणि शास्त्रीयता यांचा प्रवेश झाला पाहिजे. मद्यपानासारखीं व्यसनें बंद झालीं पाहिजेत आणि त्यासाठीं कायद्याचेंहि साहाय्य घ्यावें लागेल. परकीय साम्राज्य-शाही सरकारनें हिंदुस्थानांत मद्याचें व्यसन वाढविलें आहे आणि ब्रिटिश भांडवलशाहीनें आपल्या सरकारच्या आश्रयानें चिनी लोकांत अफूच्या व्यवसाचा फैलाव केला. यावरून भांडवलशाही व साम्राज्य-शाही नीति ही समाजाच्या नैतिक ऱ्हासास कशी कारण होते तें दिसून येतें. दरिद्री व दास बनलेल्या लोकांत नैतिक बल निर्माण करून त्यांचा उद्धार करण्याचा मार्ग सत्याग्रहानें दाखवून दिला असल्यानें त्यांत व्यसन निवृत्तीच्या चळवळीला महत्त्वाचें स्थान मिळणें अगदीं साहजिक आहे. आपलें दारिद्र्य व दास्य नष्ट करून स्वातंत्र्य

प्राप्त करून घेणाऱ्या राष्ट्रांनीं व वर्गांनीं व्यसन निवृत्तीच्या नैतिक व आत्मिक उन्नतीच्या चळवळी केल्या पाहिजेत आणि आपल्या नैतिक अवनतीचा फायदा घेऊन आपणास लुबाडणाऱ्या व गुलाम बनविणाऱ्या संस्थाविरुद्ध लढण्याचें आपलें नैतिक बल जागृत व संघटित केलें पाहिजे. भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या कार्यांत मद्यबंदीला महत्त्वाचें स्थान देण्याची प्रथा म. गांधींच्यापूर्वीं लो. टिळक, दादाभाई नौरोजी वगैरे पुढाऱ्यांनीं पाडिली होती, तिला म. गांधींनीं जोराची चालना दिली. सत्याग्रहाच्या चळवळींत तिला अग्रस्थान देण्यांत आलें होतें. पुढें सत्याग्रह बंद होऊन प्रांतिक स्वराज्य चालविण्याचें धोरण कांहीं काळ स्वीकारलें तेव्हांहि म. गांधींनीं तीन वर्षांत संपूर्ण मद्यबंदीची घोषणा केली आणि या मुद्यावर १९३५ च्या घटनेचा भंग करण्यासहि त्यांनीं माघार घेतली नसती. महायुद्ध उपस्थित झालें नसतें तर मद्यबंदीच्या प्रश्नावर घटनाभंग व अ. भा. पेचप्रसंग निर्माण होण्याचा संभव होता. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांतहि अशा प्रकारें मद्यबंदीच्या नैतिक उद्धाराच्या कार्याला महत्त्व देण्यांत येत असतें. कामकरी वर्गाच्या उन्नतीच्या दृष्टीनें व सुखाच्या दृष्टीनेंहि याच चळवळीला गांधीवादी महत्त्व देतात. या बाबतींत समाजवाद्यांचाहि त्यांना पाठिंबा आहे. तथापि समाजवाद्यांची दृष्टि भौतिक, आर्थिक व राजकीय असते तर गांधीवाद्यांची दृष्टि नैतिक व आध्यात्मिक असते. आत्मसंयमानें व्यसननिवृत्त होणारा वर्ग आपलें राजकीय व आर्थिक दास्यहि नष्ट करण्यास अधिक लायक बनतो व त्याच्या जीवनांत सुख व शांति यांचा प्रादुर्भाव होतो या दृष्टीनें गांधीवादी या प्रश्नाकडे पाहतात. यामुळें मद्यबंदी केल्यानें सरकारचें उत्पन्न कमी होईल, इतर सुधारणा थांबतील किंवा राज्ययंत्र बंद पडेल हे युक्तिवाद गांधीवाद्यांना केव्हांहि समर्थनीय वाटत नाहींत. मद्यप्रसार



करून मिळणाऱ्या उत्पन्नांतून शिक्षणप्रसारादि राष्ट्रवर्धक कामें करणें हें पाप आहे असें गांधीवादाचें स्पष्ट मत आहे.

## सर्व-धर्म-समन्वय आणि अहिंसक राष्ट्रनिर्मिति

भरतखंडाचें राष्ट्र निर्माण करण्याच्या मार्गांत सर्वांत मोठी अडचण धर्मभेदाची आहे, पण या देशांत अनेक धर्मांचे लोक हजारों वर्षें एकत्र नांदत असल्यामुळें धर्मसहिष्णुता आणि सर्वधर्मसमन्वय या भावनाहि येथें फार पुरातन काळापासून रुजलेल्या आहेत. हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती, जैन, बौद्ध या सर्व धर्मांचें अंतिम उद्दिष्ट एकच आहे व तें म्हणजे मनुष्याला सत्यनिष्ठ अथवा न्यायनिष्ठ आणि अहिंसक अथवा प्रेममय बनविणें हें होय असें गांधीवाद समजतो; इतकेंच नाहीं तर म. गांधींनीं आपल्या चारित्र्यानें व तपश्चर्येनें आपलें हें मत अनेक धर्मशील मुसलमान व ख्रिस्ती लोकांना पटविलें आहे. मुसलमान समाजांत राष्ट्रबुद्धी जागृत करण्याचें कार्य म० गांधींच्याइतकें कोणत्याहि पुढाऱ्यानें केलेलें नव्हतें आणि या देशांत हिंदू राष्ट्र व मुसलमान राष्ट्र अशीं दोन राष्ट्रें नांदत आहेत हा भ्रम जोरानें पसरविणारे पक्ष पुढें आले असले, तरी हिंदू-मुसलमान धर्मांची सामान्य जनता ही धर्मविशिष्ट अनेकराष्ट्र भावना त्याज्य ठरवील व एक राष्ट्रभावनेचाच स्वीकार करील असा विश्वास गांधीवाद्यांना वाटतो. ही एकराष्ट्रभावना केवळ हिंदूंचें संघटन करून मुसलमान समाजावर शस्त्रबलानें लादणें किंवा त्यासाठीं ब्रिटिश साम्राज्याचें साहाय्य घेणें, हें गांधीवादाला तत्त्वतःच मान्य नसून मुसलमान समाजांतील बहुजन समाजाला आत्मबलिदानानें व युक्तिवादानेंच एकराष्ट्र भावनेचें सत्यत्व आपण पटवूं असा म. गांधींना विश्वास आहे.

प्रत्येक धर्मांत तार्किक मीमांसक आणि साधुसंत असे धर्मनिष्ठांचे दोन वर्ग असतात. याशिवाय सत्तेच्या व संपत्तीच्या पाठीमागे लागून आपल्या स्वार्थासाठीं लोकांच्या धर्मभावनेचा उपयोग करून घेणारेहि पुष्कळ लोक असतात. या देशांत निवडणुकींत मतें मिळविण्यासाठीं व राजकीय पक्षाला अनुयायी मिळवून नेतृत्व सिद्ध करण्यासाठीं जनतेच्या धर्मभेद भावनेचा उपयोग करून घेण्याचा प्रघात पडला आहे. ब्रिटिश राज्यकर्ते भेदनीतीनें साम्राज्यसत्ता खंबीर करण्यासाठींहि धर्मभेदांचा उपयोग करीत असतात. यामुळें अनेक धर्मांच्या लोकांत राष्ट्रैक्याची भावना दृढ करणें हें फार दुर्घट कार्य झालें आहे, पण धर्माचें नांव घेऊन वावरणारे व व्यवहार करणारे वर जे अनेक वर्ग सांगितले, त्यांपैकीं धर्माचें खरें रहस्य व अंतरंग केवळ प्रत्येक धर्मांतील साधुसंतांनाच समजतें व समाजांत संतप्रवृत्ति फैलावून त्याच्या धारणेस साहाय्य करणें हेंच प्रत्येक धर्माचें ध्येय आहे असें म० गांधी मानतात. या संतवृत्तीच्या लोकांनाच सर्व धर्मांचें ऐक्य अंतःकरणांत अनुभवितां येतें व धर्माधर्मांतील भेद हे बाह्यांगाचे व औपाधिक भेद आहेत, असें त्यांच्या प्रतीतीस येतें. म. गांधी हे संत राजकीय नेते असल्यानें अनेक धर्मांच्या लोकांतील धर्मप्रवृत्तीला चालना देऊनहि त्यांचें ऐक्य ते साधू शकतात. सर्वांनीं आपापल्या धर्माला विसरावें व इतर धर्मीयांशीं ऐक्य करावें असें ते सांगत नाहींत, तर सर्वांनीं आपापल्या धर्माचें शुद्ध स्वरूप जाणून घ्यावें आणि इतर धर्मांचा आदरपूर्वक अभ्यास करावा, म्हणजे सर्व धर्मांचें अंतरंग एकच आहे असा अनुभव येईल असें म. गांधी सांगतात. समाजवाद्यांना आध्यत्मिक प्रवृत्तींचें महत्व समजलें नसल्यानें धर्म व अध्यात्म यांचा त्याग केल्यावांचून व केवळ भौतिक उन्नतीच्या मार्गी लागल्यावाचून धर्मभेदांतून निर्माण होणारी हिंसा नष्ट होणार नाहीं



असें वाटतें. या बाबतींत समाजवादाला गांधीवादाचें रहस्य समजण्यापूर्वी भौतिकदृष्टि हीच शास्त्रीय व सर्वश्रेष्ठ दृष्टि आहे हा भ्रम त्याला सोडावा लागेल.

हिंदु धर्म व मुसलमान धर्म हे दोन धर्म भिन्न आहेत म्हणून हीं दोन भिन्न राष्ट्रें आहेत असें मानणें म्हणजे भरतखंडांत धर्मकलहाचा अग्नि सतत चेतवीत ठेवणेंच होय व हा सर्वांत मोठा अधर्म, सर्वांत मोठें असत्य अथवा सर्वांत भयंकर हिंसा आहे असें गांधीवादी मानतात. सर्व धर्मसमभाव ही गांधीवादाची मूलभूत निष्ठा असून धर्मांच्या आध्यात्मिक स्वरूपाच्या ज्ञानावर ती आधारलेली आहे. ही निष्ठा जागृत होण्यास प्रत्येक धर्माची शुद्धि झाली पाहिजे व ती त्या त्या धर्मांतील साधुसंतांनी केली पाहिजे. सत्याग्रही तत्त्वज्ञानांत या संतप्रवृत्तीला प्राधान्य देण्यांत येत असल्यानें राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं चालू असलेल्या सत्याग्रहसंग्रामानें व विधायक कार्यक्रमानें ही सर्वधर्म-समबुद्धि सर्व धर्मांच्या सत्याग्रहींत जागृत होत आहे. यामुळेंच अखेरीस भरतखंडाचें एक राष्ट्र निर्माण होईल व धर्मभेद विसरून भारतीय जनता आपल्या भौतिक व आत्मिक उन्नतीचा मार्ग चोखाळूं लागेल.

**राष्ट्रीय शिक्षणः**—अहिंसात्मक राष्ट्रनिर्मितीच्या कार्यांत राष्ट्रीय शिक्षणाला फार मोठें स्थान आहे. गांधीवादाची राष्ट्रीय शिक्षणाची योजना वर्धाशिक्षण या नांवानें प्रसिद्ध असून अहिंसक राष्ट्रनिर्मितीच्या वरील सर्व तत्त्वांवरच ती आधारलेली आहे. शिक्षणशास्त्राच्या दृष्टीनें हस्तव्यवसायाच्या आधारें मुलांच्या शारीरिक, बौद्धिक व आत्मिक शक्तींचा विकास करणें हें मुख्य तत्त्व त्यांत ग्रथित झालेलें आहे. बुद्धि ही कर्मानुसारिणी असते, व्यवहारांतून ज्ञानाची उत्पत्ति

होते, पुस्तकी ज्ञानापेक्षां अनुभवाचें ज्ञान श्रेष्ठ आहे, दुसऱ्यापासून ज्ञान शिकण्याचा हेतु दात्य संशोधन करून ज्ञानांत भर घालणें हा असला पाहिजे, आपण खातो त्याबद्दल श्रम करण्याचा भार आपण उचलला पाहिजे, निसर्गाच्या व समाजाच्या सहकार्यावांचून आपलें जीवन चालणार नाहीं, या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं समाज-जीवनांत आपलें जीवन विलीन केलें पाहिजे आणि सर्वांच्या अविरोधानें व सहकार्यानें, सेवाभावानें व नम्रत्वानें, स्वावलंबनानें व स्वातंत्र्यानें जगण्यास शिकविलें पाहिजे, हें वर्धा शिक्षणाचें ध्येय आहे. अहिंसक राष्ट्रनिर्मिती करावयाची तर सत्यनिष्ठा व अहिंसक वृत्ति यांच्यावर आधारलेलें राष्ट्रीय शिक्षण स्थापन झालें पाहिजे. या शिक्षणामुळें सर्वांना आपला निर्वाह करण्यास उपयोगी असा समाजोपयोगी धंदा आला पाहिजे, या धंद्याच्या ज्ञानाबरोबर आपल्या बौद्धिक शक्तीचा विकास करतां येऊन सत्यसंशोधनाचें सामर्थ्य बुद्धींत आलें पाहिजे आणि आपला निर्वाह करीत असतां, अथवा इतर वेळीं, आपण इतरांना पीडा देत नाहीं इतकेंच नाहीं तर इतरांच्या सुखांची वृद्धीच करीत आहों, या भावनेनें वागण्याचें शिक्षण प्रत्येक राष्ट्रीकास मिळालें पाहिजे. त्याचबरोबर स्वावलंबी जीवनाचें महत्त्वहि त्यास पटलें पाहिजे.

मानव संस्कृतीचा इतिहास म्हणजे राजांचा व साम्राज्यांचा युद्धांचा व धर्मकलहांचा, जुलमाचा व क्रांतीचा इतिहास येवढीच एक दृष्टी न स्वीकारतां मानव संस्कृतीचा इतिहास हा सहकारी जीवनाचा, श्रमाजीवनाचा, सत्यसंशोधनाचा, न्याय प्रस्थापनेचा आणि वाढत्या प्रेमभावनेचा इतिहास आहे, असें शिक्षण मुलांना मिळालें पाहिजे. त्याच बरोबर अहिंसाबलाचा प्रभाव आणि प्रेमानेंच न्याय-संस्थापना करण्याची शक्यता, त्यांच्या मनावर बिंबविलीं गेलीं पाहिजेत.



## राष्ट्रीय अहिंसावाद आणि मानव संस्कृतिः—

अहिंसा हा व्यक्तीचा धर्म आहे, पण राष्ट्राचा नाहीं, हें मत गांधीवादाला मान्य नाहीं. ज्याप्रमाणें जातिभेद, धर्मभेद आणि वर्गभेद हे राष्ट्रांत यादवीची हिंसा वाढवून मानवसंस्कृतीचा नाश करीत आहेत त्याचप्रमाणें राष्ट्रभेदहि जगांतील हिंसा वाढविण्यास व संस्कृतीचा विनाश करण्यास आज कारण होत आहेत. राष्ट्रनिष्ठा हा सद्गुणच नव्हे, असें म्हणण्यापर्यंत आज कित्येक तत्त्ववेत्ते गेले आहेत, पण गांधीवादाला तसें वाटत नाहीं. राष्ट्रनिष्ठा हा एक थोर सद्गुण असून गुलामगिरींतील राष्ट्रांना स्वतंत्र बनविण्यास आणि अंतर्गत विरोधांतून निर्माण होणारी यादवी अथवा वर्गयुद्ध थांबवून शांतता राखण्यास राष्ट्रनिष्ठेचा उपयोग होत असतो, हें गांधीवादाला मान्य आहे. पण राष्ट्रनिष्ठा ही सत्यनिष्ठेहून श्रेष्ठ नाहीं, असें गांधीवादाचें मत आहे. तसेंच राष्ट्रांत ही सत्यनिष्ठा टिकावयाची तर व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि अहिंसावृत्ति यांची वाढ झाली पाहिजे. वर्गभेद जातिभेद आणि धर्मभेद यांच्या अहंकारांतून मुक्त होऊन न्यायसंशोधन करण्याची वृत्ति समाजांत वाढली पाहिजे, त्याचप्रमाणें राष्ट्रीय अहंकाराच्याहि पलीकडे जाऊन शुद्ध मानवहिताच्या दृष्टीनें न्याय अन्यायाचा निर्णय करण्याची बुद्धि समाजांत जागृत राहिली पाहिजे. हें बुद्धिस्वातंत्र्य अथवा ही सत्यनिष्ठा हाच लोकशाही संस्कृतीचा आधार आहे. लोकशाही संस्कृति सत्यनिष्ठेवर व राष्ट्रांतर्गत अहिंसावृत्तीवर अवलंबून आहे हें सर्वमान्य झालें आहे. ही संस्कृति सत्याग्रही तत्त्वज्ञानाला त्यामुळेच मान्य आहे. वर्गयुद्ध टाळण्यास व शांततेनें प्रगति करण्यास लोकशाही राज्यपद्धति हाच एक उपाय आहे; पण लोकशाही संस्कृति जगांत टिकवयाची तर आंतरराष्ट्रीय

युद्धें आणि राष्ट्रांतर्गत क्रांत्या या रूपांत होणारी हिंसा न करतां, न्याय व शांतता यांची स्थापन करण्याचें साधन शोधून काढिलें पाहिजे. हें साधन सत्याग्रहाच्या रूपानें गांधीवादानें जगापुढें ठेविलें आहे. जातिभेद, वर्गभेद, धर्मभेद आणि राष्ट्रभेद यांतून निर्माण होणारीं विषमता, अन्याय आणि हिंसा यांचें शमन करून न्याय व शांतता यांची स्थापना करण्यास या साधनाचाच उपयोग जगाला होईल, ही गांधीवादाची निष्ठा आहे. या सर्व भेदभावनांच्या पलीकडे जाऊन निरहंकार व निर्मम वृत्तीनें सत्याचें संशोधन करीत राहावें, अहिंसेनें अन्यायाचें निवारण करण्यासाठीं नित्य लढत राहावें आणि तसें करण्यास इतरांस शिकवावें, हाच अहिंसात्मक राष्ट्रनिर्मिति करण्याचा आणि आंतरराष्ट्रीय शांतता स्थापन करण्याचा मार्ग आहे. राष्ट्रीय स्वार्थ, राष्ट्रीयहित, राष्ट्रीय अहंकार हेंच परमश्रेष्ठ कर्तव्य ही भावना उल्लंघून आपल्या राष्ट्रानें केलेल्या अन्यायांचाहि सक्रिय निषेध करणारे, अन्यायनिवारणासाठी प्रसंगी कायद्यांचा भंग करणारे पण अत्याचार न करणारे, जनतेतील न्यायबुद्धि जागृत व संघटित करून तिला सर्व प्रकारच्या अन्यायांशीं अनत्याचारी असहकार करण्यास शिकविणारे, दुष्टांचाहि द्वेष न करणारे पण दुष्टाव्याशीं सहकार्य न करणारे, कोणताहि आपपर भाव मनांत न ठेवितां अन्यायाच्या निवारणास धावून जाणारे पण क्रोधाला व सूडभावनेला वश न होणारे असे सत्यनिष्ठ लोकनायक हेच खरे राष्ट्रभक्त व हीच खरी राष्ट्रभक्ति असें गांधीवादाचें मत आहे. ही राष्ट्रभक्ति अहिंसक राष्ट्रनिर्मिती करील आणि आपलें स्वातंत्र्य रक्षण करून इतरांनाहि स्वातंत्र्य रक्षणाचा मार्ग दाखवून देईल. या सत्याग्रहनिष्ठेची दीक्षा घेतलेले लोकनायक प्रत्येक राष्ट्रांत निर्माण होऊन ते आपल्या राष्ट्रांतील सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अन्यायायांची हिंसा अनत्याचारी असहकारानें नष्ट करतील, तेव्हांच



अहिंसात्मक मानव संस्कृतीचें नवें जग निर्माण होईल. हें नवें जग निर्माण होण्यास किती काळ लागेल हें कोणासहि सांगतां येणार नाहीं, पण तें निर्माण करण्यासाठीं आपल्या हातून होईल तितका यत्न करण्याचा दृढ निश्चय करण्यास एका क्षणाचाहि विलंब लागण्याची आवश्यकता नाहीं. या पुण्यकार्यास अथवा परमश्रेष्ठ धर्मकार्यास आपलें जीवित अर्पण करण्याची बुद्धि आणि धृति जागृत झाली म्हणजे प्रत्येकास या कार्याला हातभार लावल्याचें अंतःसमाधान लाभणार आहे व ज्याच्या हातून जितकें अधिक आचरण या निष्ठेनें होईल, तितकें जगदुद्धाराचें श्रेय त्याच्या पदरीं पडेल.

---

## व्यक्तिधर्म आणि समाजधर्म : : ५

"I am impatient to realise myself, to attain Moksha in this very existence. My national service is part of my training for freeing my soul from the bondage of flesh.... I am striving for the kingdom of Heaven which is Moksha. To attain my end it is not necessary for me to seek the shelter of a Cave...For me the road to salvation lies through incessant toil in the service of my country and therethrough of humanity. I want to identify myself with everything that lives...So my patriotism is for me a stage, in my journey to the land of

eternal freedom and peace. Thus it will be seen that for me there are no politics devoid of religion. They subserve religion. Politics bereft of religion are a death trap because they kill the soul, "

Mahatma Gandhi.
Young India vol I
ph. 1417-8

" The virtue of an ideal consists in its boundlessness. But although religious ideals must thus, from their very nature, remain unattainable by imperfect human beings, although by virtue of their boundlessness, they may seem ever to recede farther and farther away from us, the nearer we go to them, still they are closer to us than our very hands and feet, because we are more certain of their reality and truth than even our own physical being. This faith in one's ideals constitutes true life, in fact it is man's all in all. " Young India
22-11-28

" The goal ever recedes from us. The greater the progress the greater the recognition of our unworthiness. Satisfaction lies in the effort, not in the attainment. Full effort is full victory. " Y. I. 9-3-22

" Perfect nonviolence, whilest you are inhabiting the body, is only a theory like Euclid's point or straight line, but we have to endeavour every moment of our life. "

Harijan July 21-1941



" The nearest approch to purest anarchy would be a democracy based on nonviolence. The European democracies are to my mind a negation of democracy. "

Hariian July 21-1940

## गांधीवादी जीवननिष्ठा

गांधीवाद ही एक अशी जीवननिष्ठा आहे की, तींत वैयक्तिक मोक्ष आणि सामाजिक उद्धार या दोन्ही ध्येयांचा समन्वय झालेला आहे. परमेश्वरी साक्षात्कारासाठीं अथवा आत्मानुभूतीसाठीं तळमळणारा मुमुक्षु आणि लोकोद्धारासाठीं सर्वस्वाचा त्याग करणारा समाजसेवक, ' देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगाच्या तुटी ॥ " अशा वृत्तीनें सर्व सांसारिक पाश तोडून टाकणारा संत आणि राजकीय, सामाजिक व धार्मिक सर्व बंधनांच्या पलीकडे जाऊन नवी समाजरचना करणारा क्रांतिकारक, अथवा आपल्या अंतःकरणांतील आसुरी वृत्तीशीं सतत झगडणारा आध्यात्मिक वीर आणि प्रतिपक्षाच्या अंतःकरणाचा भेद करून त्याला आत्मवश करूं इच्छिणारा राजकीय संत या दोनहि कोटींतील असामान्य गुण अंगीं बाणविण्याचें ध्येय गांधीवादांत अभिप्रेत आहे.

हीं ध्येयें परस्पर विरूद्ध आहेत, आत्मोन्नतीच्या मागें लागणारांच्या हातून समाजसेवा होणार नाहीं आणि समाजसेवा करणारांना मोक्ष प्राप्ति होणार नाहीं, असें मानणारे अनेक लोक आहेत. विशेषतः राजकीय नेतृत्व आणि आत्मोद्धार, राजकारण आणि सत्यनिष्ठा किंवा राजकीय क्रांति आणि अहिंसावृत्ति या दोहोंची एकत्र स्थिति कधींहि शक्य नाहीं असें बरेच लोक समजतात. पण हा भ्रम आहे असें भगवद्गीतेनें प्रतिपादन केलें

आहे. सर्व धर्मग्रंथांत भगवद्गीतेचें हें वैशिष्ट्य आहे कीं, तिनें लोकसंग्रह आणि मोक्ष या दोहोंचा समन्वय साधण्याचा प्रथम प्रयत्न केला आणि लोकसंग्रहांतून मोक्षाचा मार्ग दाखवून दिला. मोक्ष प्राप्तीसाठीं सामाजिक कर्तव्यांचा त्याग करावयास नको, तर तीं सामाजिक कर्तव्यें निष्काम, निर्वैर आणि अनासक्त बुद्धीनें करीत राहण्यांतच व्यक्तीची मोक्षसिद्धी व समाजाची उन्नति आहे, हें भगवद्गीतेचें रहस्य आहे. म० गांधींनीं हें रहस्य आत्मसात् केलें आहे आणि या संदेशाचा आजच्या परिस्थितीस अनुसरून अधिक विकासहि केलेला आहे.

भगवद्गीतेनें अनासक्त राजधर्माची अंतिम सीमा गाठण्याचा प्रयत्न केला आहे. समाजधारणेसाठीं धर्मयुद्ध करणाऱ्या क्षत्रियानें निर्वैर, निर्मम आणि निष्काम बनून युद्ध चालवावें, असा उपदेश श्रीकृष्णांनीं अर्जुनास केला आहे, पण आज याच्या पुढें जाण्यावाचून लोकसंग्रह होण्याचा संभव दिसत नाहीं. युद्धसंस्था आणि अंतीं राजधर्मांतील हिंसा यांचा अंत कसा करावा या प्रश्नांना राजकारणांत अग्रस्थान प्राप्त झालें आहे. आणि युद्धें, रक्तपाती क्रांत्या, यांना अहिंसात्मक पर्याय शोधून काढिल्यावांचून मानव संस्कृतीची धारणा आणि उन्नति होऊं शकत नाहीं, असें सर्व विचारी लोकांना उघड दिसूं लागलें आहे. विचारी लोकांची ही जिज्ञासा, जागतिक हिंसेचें भीषण दृश्य पाहून तळमळणाऱ्या संतांना लागलेली अहिंसेची तृष्णा, आणि शस्त्रबलानें सामान्य जनतेचा उद्धार होणें अशक्य बनल्यानें निःशस्त्र क्रांतीचा शोध करण्याचा क्रांतिकारकांना लागलेला ध्यास, या सर्वांना संतोष देणारा असा सत्याग्रह हा सशस्त्र युद्धाचा व सशस्त्र क्रांतीचा एक अहिंसात्मक पर्याय आहे. जनतेचें आत्मबल जागृत करून राजधर्मांतील व राजकारणांतील हिंसा नष्ट



करण्याचा यत्न करणारी आणि शुद्ध आत्मबलानें समाजधारणा करण्याचें अंतिम ध्येय पुढें ठेवून आजच्या मानवसंस्कृतींत आंतरबाह्य क्रांति घडवून आणणारी गांधीवाद ही एक सर्वजीवनव्यापी निष्ठा आहे.

## राजकीय हिंसेच्या प्रतिकाराचे मार्ग

राजधर्मांतील हिंसा ही प्रजाधर्मांतील विकृतींचें प्रतिबिंब आहे आणि म्हणून प्रजाजनांतील हिंसा नष्ट करून राजकीय हिंसेशीं असहकार करण्याचें व तिच्या आत्मबलानें प्रतिकार करण्याचें शिक्षण प्रजेला देत राहणें, हाच जनतेचा उद्धार करण्याचा आणि राजकीय, आर्थिक व सामाजिक जुलमांतून समाजाला मुक्त करण्याचा एकमेव मार्ग आहे असें म. गांधी समजतात. राजकीय जुलमांतून समाजाला मुक्त करण्याचे आज पर्यंत जे मार्ग अनुसरण्यांत आले, त्यांचे (१) सुधारणावाद आणि (२) सशस्त्र क्रांतिवाद असे दोन वर्ग करतां येतात. हे दोनहि मार्ग अपेशी झाल्याचा अनुभव आल्यामुळें अनत्याचारी असहकार व कायदेभंग यांचा सत्याग्रही मार्ग आपण जनतेपुढें ठेविला आहे, असें म. गांधी म्हणतातः—

" 'Man is born free and yet' lamented Rousseau 'he is everywhere in chains.' this is the sad spectacle which to-day meets our sight on whatever side we turn....Democracy which at one time, it was hoped, would serve as a panecia for all social evils, has proved to be far worse, than the senseless feudal regime of the middle Ages. It has simply replaced the irratic plundering raids of the "crag-barons" of the medieval times, with a silent universal process of organised robbery of the modern

capitalist state, all the more dangerous, because it lulls the people into a false sense of security while vampirelike it seeks their life blood, all the more deadly because whereas, the "cragbaron" of the past times, could only enslave the body, the modern "bagbaron" with far bitter poison of his purse infects and destroys the soul as well".

"Now the methods so far tried to cure this evil might conveniently be discribed as:

(1) Those based on the principle of Reform.

(2) Those based on the principle of Violence.

"Both these methods fail because they deal with the superficial symptoms only and do not touch the root of the evil, the disease itself. Advocates of these methods think that, partially reforming the various institutions which constitute the state, they would be able to put an end to the sufferings of Society. They overlook the fact that state-evil is not the cause but the effect of social evil, just as the sea waves are the effect and not the cause of the storm. The only way of curing the disease is to remove the causes thereof. Let people purify themselves, let them cease to indirectly participate in the evil of the state and it will disappear by itself.

"Self purification, then, and not violence or reform is the real remedy. To purify oneself by withdrawing cooperation from the State. This is the great doctrine of noncooperation.



"...Thus noncooperation is a process of evolution it has most aptly been discribed as evolutionary Revolution."

Young India vol. I ph. 225-7

**अर्थः**—"मनुष्य जन्मतः स्वतंत्र जन्मतो पण आज तो सर्वत्र बंधनांत आहे," असा आक्रोश रूसो करीत होता. आज कोणीकडेहि दृष्टी वळविली तरी हेंच करुण दृश्य आपल्या प्रत्ययास येतें. सर्व सामाजिक आपत्तींवर रामबाण उपाय ठरेल अशी आशा ज्या लोकशाहीसंबंधीं एकेकाळीं वाटत होती, ती लोकशाही मध्ययुगीन सरंजामशाहीच्या बेकायदा अमदानीपेक्षांहि फार हीन ठरली आहे. डोंगरी क़िल्ल्यांतून मधूनमधून होणाऱ्या मध्ययुगीन सरदारांच्या लुटारू धाडींऐवजीं आधुनिक भांडवलशाहीची विश्वव्यापक संघटित लुटारूपद्धति तिनें निर्माण केली आहे. जळूप्रमाणें जनतेचें रक्तशोषण करीत असतां लोकांना शाश्वतीचा भ्रम निर्माण करीत असल्यानें ही अधिकच भयानक आहे. डोंगरी किल्ल्यांत राहणारे पूर्वींचे सरदार केवळ शरीरालाच गुलाम करीत, आजचे 'पेढ्यांत राहणारे' सरदार आपल्या ज़ालिम विषाचा प्रयोग आत्म्यावरहि करून त्याचा नाश करीत असल्यानें ही अवस्था अधिक मारक आहे."

"आजपर्यंत या आपत्तींचें निवारण करण्यास पुढील दोन मार्गांचा उपयोग करण्यांत आलेला आहेः—

(१) सुधारणा तत्त्वावर आधारलेले मार्ग.

(२) हिंसावादावर आधारलेले मार्ग.

"हे दोनहि मार्ग अयशस्वी होतात, कारण ते केवळ बाह्य लक्षणांवर उपचार करतात, पण या लक्षणांचें मूळ कारण असा जो रोग त्याला स्पर्शहि करीत नाहींत. यांच्या पुरस्कर्त्यांना असें वाटतें कीं राज्यसंस्थेंत

अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या संस्थांची अंशतः सुधारणा करून सामाजिक आपत्तींचा अंत आपणांस करतां येईल. सामाजिक आपत्तींचें मूळकारण राज्यसंस्थेंतून निर्माण होणाऱ्या आपत्ति नसून या राजकीय आपत्तींचें मूळ कारण सामाजिक दोषांत असतें. वादळाचें कारण समुद्रांतील लाटा नसून वादळ हें त्या लाटांचें कारण असतें त्याचप्रमाणें सामाजिक पापकर्में हीं राजकीय आपत्तींचीं मूळ कारणें असतात. या रोगाचें निवारण करण्याचा एकच मार्ग, हें मूळ कारण दूर करणें, हाच होय. समाजांतील लोकांनीं आत्मशुद्धि करावी आणि राजकीय अन्यायांशीं अप्रत्यक्ष सहकार्य करण्याचें बंद करावें, म्हणजे ते आपोआप नष्ट होतील.

"म्हणून आत्मशुद्धि हाच एक यावर खरा उपाय आहे, अत्याचार किंवा सुधारणावाद हा तो उपाय नव्हे.सरकारशीं होत असलेले सहकार्य बंद करून आत्मशुद्धि करणें, हेंच असहकाराचें महातत्त्व होय...."

"असहकार ही एक क्रमविकासी क्रिया आहे आणि क्रमविकासी क्रांति हेंच तिचें वर्णन यथार्थ आहे."

यांतील 'आत्मशुद्धि' आणि 'क्रमविकासी क्रांति' हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. समाजावर ओढवणारी राजकीय आपत्ति नष्ट करावयाची तर समाजाची आत्मशुद्धि झाली पाहिजे आणि ही आत्मशुद्धि करण्यासाठीं राजसत्तेशीं असहकार करण्याचें शिक्षण समाजाला दिलें पाहिजे. प्रस्थापित राजसत्तेचा उपयोग करून थोडथोड्या सुधारणा करीत जाण्याचा सुधारणावादी मार्ग आणि प्रस्थापित राजसत्तेला उलथून पाडून शस्त्रबलानें नवें राज्ययंत्र उभारण्याचा रक्तपाती मार्ग, या दोहोंतहि राजकीय हिंसेशीं सहकार्य करूनच अन्यायांचें निवारण करण्याचा प्रयत्न होत असतो पण ते प्रयत्न त्यामुळेंच विफल होतात.



यापेक्षां अहिंसात्मक क्रांतिमार्ग हा भिन्न असून राजसत्तेच्या हिंसेचा आधार घेऊन नव्हे, तर राजकीय हिंसेशीं असहकार करण्याचें व समाजांतील अहिंसाबल संघटित करण्याचें शिक्षण जनतेला देऊन सामाजिक आपत्तींचें निवारण करण्याचा प्रयत्न या मार्गांत करण्यांत येतो. अहिंसाबल हा या क्रांतीचा आधार असतो आणि समाजांतील आत्मशुद्धीबरोबर वाढत जाणारी ही अहिंसा आपल्या वाढीबरोबर समाजाच्या बाह्यांगांत किंवा राजकीय, आर्थिक व सामाजिक घटनेंत क्रांति घडवून आणीत असते. पाश्चात्य राष्ट्रांत उदय पावलेले लोकसत्ताक व समाजसत्ताक क्रांतिवाद हे समाजाच्या बाह्यांगांत क्रांति करणारे वाद आहेत व त्यांचीं साधनें कायदा, सक्ति व हिंसा हींच आहेत. सत्याग्रह हें समाजाच्या अंतरंगांतील क्रांतीच्या आधारें बाह्यांगांत क्रांति घडवून आणणारें शास्त्र आहे व म्हणून त्याच्या नेत्यांच्या अंगीं ही अंतःकरणांतील अंतरंग क्रांति घडून आलेली असावी लागते. आत्मबलानें मानवी अंतःकरणांत परिवर्तन घडवून आणतां येतें, भ्याड मनुष्य धीट व शूर बनूं शकतो, स्वार्थी मनुष्य न्यायी बनूं शकतो आणि जुलमी मनुष्य अन्यायापासून परावृत्त होऊं शकतो, यांवर सत्याग्रही नेत्यांची श्रद्धा असावी लागते. ही अंतरंग क्रांति किंवा हें हृदयपरिवर्तन घडून घेण्यास आत्मशुद्धि हें साधन असून न्यायनिष्ठेसाठीं भोगलेले क्लेश हे स्वतःची शुद्धि करून प्रतिपक्षाचीहि शुद्धि करतात, हा मनुष्य स्वभावासंबंधीचा सिद्धान्त सत्याग्रही क्रांतींत गृहीत धरलेला आहे.

## बाहुबल, बुद्धिबल आणि आत्मबल—

मनुष्यापाशीं पशूप्रमाणें शरीरबल आहेच पण बुद्धिबल व आत्म-

बल हीं दोन बळेंहि त्याच्यापाशीं आहेत, हा त्याचा विशेष होय. पण या विशेषानुसार मनुष्याचा धर्महि पशुधर्माहून भिन्न बनत असतो, हें समजून वागणारे लोक फार थोडे आढळतात. त्यांतून बुद्धिबलाला प्राधान्य देण्याची प्रथा आधुनिक युरोपांत जितकी पडली आहे तितकी आत्मबलाची महती त्या लोकांना वाटत नाहीं. आधुनिक काळांत भौतिक विद्येंत व यंत्रकलेंत झालेल्या प्रगतीमुळें मनुष्याचा बुद्धिबलावरील विश्वास वाढला आहे आणि याच बुद्धिबलाचा उपयोग करून वाढविलेल्या शस्त्रबलालाहि अलीकडे प्राधान्य मिळालें आहे. पण आत्मबलाचा एकसारखा लोप होत असून त्याच्या प्रभावावरील विश्वासहि मंद झालेला आहे. आधुनिक युरोपांत उगम पावलेल्या लोकशाही संस्कृतीचा सर्व भर बुद्धिबलानें न्यायप्रस्थापना करण्यावर होता. बुद्धिबलानें आपापलीं मतें इतरांना पटवून देण्याचें स्वातंत्र्य सर्व व्यक्तींना द्यावें आणि असें स्वातंत्र्य सर्वांस मिळालें असतां जें मत सर्वांस अथवा बहुजनसमाजास पटेल, त्या मतानुसार राज्यकारभार करावा हें लोकशाहीचें मुख्य तत्त्व आहे. तथापि लोकांना आपलीं मतें पटवून देण्यास केवळ बुद्धिबल पुरेसें पडत नाहीं असा अनुभव आल्यानें युरोपीय संस्कृति लोकशाहीचा आधार सोडून पुन: बाहुबलावर किंवा शस्त्रबलानें न्यायप्रस्थापना करण्याच्या मार्गावर आली आहे. राष्ट्राराष्ट्रांतील तंटे बुद्धिबलानें मिटत नाहींत म्हणून आंतरराष्ट्रीय युद्धें करावींत आणि वर्गावर्गांतील तंटे युक्तिवादानें, लोकशाहीच्या तत्वानुसार बहुमताच्या निर्णयानें अथवा बुद्धिबलानें मिटत नाहींत म्हणून वर्गयुद्ध करावें अशा निष्कर्षावर आधुनिक युरोप आलें. फॅसीझम्, नाझीझम् आणि कम्यूनिझम् हीं सर्व तत्त्वज्ञानें शस्त्रबलानें आपलें मत अथवा न्याय प्रस्थापित करण्याच्या कल्पनेवर आधारलेली आहेत आणि न्यायप्रस्थापना करण्यास



केवळ युक्तिवाद किंवा बुद्धिबल अपुरें पडतें, हें या सर्वांचें मत आहे. गांधीवादालाहि बुद्धिबलाचें हें अपुरेंपण मान्य आहे, पण बुद्धिबल अपुरें पडतें म्हणून बाहुबलाचा अथवा शस्त्रबलाचा आश्रय केल्यानें न्यायसंस्थापना करतां येईल अथवा नवें जग निर्माण करतां येईल असें मात्र त्याला वाटत नाहीं. हें नवें जग निर्माण करावयाचें तर मनुष्यानें आपलें केवळ बुद्धिवैभव प्रकट करून भागणार नाहीं, तर त्यानें आत्मवैभव प्रकट केलें पाहिजे.

बुद्धिबल हें लंगडें आहे, शस्त्रबल हें आंधळें आहे. इतकेंच नाहीं तर शस्त्रबलाच्या आश्रयानें मनुष्याची बुद्धिहि आंधळी बनते व तिला सत्यासत्याचा विवेक राहात नाहीं, असें गांधीवाद मानतो. शस्त्रबलानें न्यायप्रस्थापना करण्याचा प्रयत्न राजे व सरदार यांनीं केला. त्याचा कटु अनुभव आल्यानंतर शस्त्रबलानें क्रांति करण्याचे प्रयत्न लोकसत्तावाद्यांनीं व समाजसत्तावाद्यांनीं केले. या दोघांचाहि अनुभव न्यायप्रस्थापनेच्या दृष्टीनें अनुकूल आला नाहीं. तसेंच समाजांतील दलित वर्गाच्या उद्धारास राज्यकर्त्यांचें अथवा क्रांतिकारकांचें शस्त्रबलहि पूर्ण उपयोगी पडत नाहीं, म्हणून गांधीवादानें आत्मबलाच्या आश्रयानें अहिंसक क्रांति करण्याचा मार्ग जगापुढें ठेविला आहे.

मनुष्य आपलीं मतें बनवितांना स्वहित, स्वकीयहित, वर्गहित, राष्ट्रहित यांच्या मोहाला गुंतून बनवीत असतो आणि आपल्या, आपल्या वर्गाच्या अथवा आपल्या राष्ट्राच्या हितासाठीं इतरांच्या हितावर आक्रमण करीत असतो. इतकेंच नाहीं तर आपलें, आपल्या वर्गाचें अथवा आपल्या राष्ट्राचें हित तेंच सर्व मानवांचें हित असें मानीतहि असतो. यामुळें स्वार्थीस्वार्थाच्या लढ्यांत प्रतिपक्षाचें मत ऐकून घेऊन त्यांतील सत्यांश ग्रहण करण्यास लोक तयार होत नाहींत. इतकेंच नाहीं तर जी बुद्धि न्यायसंशोधन

आणि न्यायसंस्थापन या कामीं उपयोगांत यावयाची ती बुद्धि अन्यायाचें समर्थन आणि संरक्षण करण्याच्या कामीं उपयोगांत येत असते. अशी बुद्धि ही पांडित्यप्रचुर असली तरी ती सापाच्या फणेवरील रत्नाप्रमाणें भयानक असते. हें बुद्धिवैभव मानवसंस्कृतीला तारक नसून तें मारक बनतें. यासाठीं न्यायनिष्ठा अथवा सत्यनिष्ठा हें जें बुद्धीचें खरें वैभव तें प्रकट करणें अथवा त्याची निर्मिति करणें हें आज मानवसंस्कृतीच्या प्रगतीला अत्यंत अवश्य झालें आहे. कोणत्याहि पक्षाच्या अथवा अभिनिवेशाच्या आहारीं न जातां शुद्ध सत्याचें म्हणजे सर्व मानव जातीच्या हिताचें संशोधन करणारी निर्विकार, निर्मम आणि निष्काम बुद्धि समाजांत जागृत ठेवणाऱ्या आणि त्या बुद्धीला प्रतीत होणाऱ्या सत्याच्या प्रचारासाठीं, संस्थापनेसाठीं आणि असत्याच्या निवारणासाठीं व अन्यायाच्या निर्मूलनासाठीं आत्मक्लेश भोगण्याची वृत्ति मानवी अंतःकरणांत निर्माण करणें आज अवश्य झालें आहे.

ज्या पक्षाच्या बाजूस न्याय असेल त्या पक्षाला सशस्त्र मार्गांनीं विजय मिळवून दिला व अन्यायी पक्षाचा पाडाव केला म्हणजे न्यायाची व शांतीची संस्थापना होते, ही आशा मानवी इतिहासाच्या अनुभवानें खरी ठरलेली नाहीं. धर्मासाठीं युद्ध करणारे लोक एकदां युद्ध सुरू झाल्यावर अधर्मानें लढूं लागतात आणि विजयी झाल्यावरहि उन्मत्त बनतात. हिंसेच्या आश्रयाचें मनुष्याची बुद्धि सत्यापासून भ्रष्ट होते व म्हणून हिंसेनें सत्याची संस्थापना करण्याचा मार्ग फलद्रूप होत नाहीं. तरीहि भ्याडपणापेक्षा हिंसा बरी येवढें म्हणतां येते. जे सत्यासाठीं, स्वातंत्र्यासाठीं अथवा न्यायासाठीं लढतात ते असत्य, स्वातंत्र्यापहार व अन्याय यांसाठीं लढणाऱ्यापेक्षां श्रेष्ठ आहेत याबद्दल गांधीवादाला संशय नाहीं. याचमुळें सत्यासाठी,



स्वातंत्र्यासाठी व न्यायासाठी लढणाऱ्या वीरांचें तो कौतुकहि करतो पण जगांत सत्याची, स्वातंत्र्याची व न्यायाची संस्थापना करण्याचा हा मार्ग सर्वश्रेष्ठ मार्ग नव्हे व ऐतिहासिक काळांत त्याचा उपयोग झाला असला तरी यापुढें तरी तो होऊं शकणार नाहीं. सरंजामशाही व धनिकशाही संस्कृतींतील न्यायाचा अनुभव आल्यानंतर आतां याहून श्रेष्ठ मार्गाचें अनुसरण करण्याचा काल खास आला आहे. आजची आपली न्यायाची कल्पनाहि श्रेष्ठ बनली आहे व या श्रेष्ठ कल्पनेस अथवा ध्येयास अनुरूप असें न्यायप्रस्थापनेचें साधनहि आपणांस अधिक श्रेष्ठ शोधून काढणें अवश्य झालें आहे. साध्य जितकें श्रेष्ठ तितकें साधनहि अधिक श्रेष्ठच असलें पाहिजे, असा म० गांधींचा सिद्धान्त आहे. शस्त्रबलानें मिळणारा न्याय व आत्मबलानें मिळणारा न्याय, अत्याचारी क्रांतीनें निर्माण होणारी नवी सवाजरचना आणि अनत्याचारी क्रांतीनंतर निर्माण होणारी समाजरचना यांत मूलतःच भेद असून दुसरी समाजरचना हीच खरा न्याय प्रस्थापित करूं शकेल. कारण अत्याचारी क्रांति करीत असतां क्रांतिकारक पक्षाच्या अंतःकरणांतच परिवर्तन होत असतें. क्रांति यशस्वी करण्यासाठी जीं अनेक क्रूर कर्में करावीं लागतात, ज्या क्रूर निष्ठूर भावना जागृत कराव्या लागतात, जी सूडबुद्धी उद्दीपित करण्यांत येते त्या सर्वांमुळें क्रांतिकारक पक्ष तत्वभ्रष्ट व सत्य पराङ्मुख बनतो. यासाठीं समाजावरील राजकीय अन्याय दूर करण्यासाठी जी क्रांति करावयाची ती क्रांति करीत असतां आत्मशुद्धिच्या, अत्याचाराशीं असहकाराच्या आणि न्यायनिष्ठेसाठी आत्मक्लेश भोगण्याच्या वृत्ति जागृत करूनच ती केली पाहिजे. समाजांत या वृत्ति एकदा बाणल्या म्हणजे त्याच्यावर कोणाचा जुलूम चालूं शकणार नाहीं आणि सत्ताधारी कितीहि प्रबळ असले, तरी त्यांना या संघटित आत्मबलापुढें नमावें लागेल.

ही आत्मबलाची क्रांति केव्हांहि न संपणारी अशी अखंड क्रांति ( Permenant Revolution ) आहे आणि तिचें नेतृत्व करण्यास सत्याची अहिंसेनें प्रस्थापना करण्याची दीक्षा घेतलेले सत्याग्रही क्रांतिकारक प्रत्येक समाजांत व राष्ट्रांत निर्माण झाले पाहिजेत. त्यांनीं प्रथमतः आपल्या अंतःकरणांत क्रांति घडवून आणिली पाहिजे व ही क्रांति प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत घडवून आणण्याचें सामर्थ्य आपल्या अंगी येऊं शकेल, अशी गाढ श्रद्धा त्यांच्यापाशीं असली पाहिजे. याकामीं आपणांस अपयश आलें तर आत्मबलाचा हा सिद्धान्त चुकीचा नसून आपल्या अंगीं तितकें आत्मबल अद्यापि निर्माण झालेलें नाहीं या दृष्टीनें सत्याग्रही क्रांतिकारकानें त्याचा विचार केला पाहिजे. जगांतील अनासक्त सत्यनिष्ठा वाढविण्याचा हाच एक मार्ग असून ही अनासक्त सत्यनिष्ठा वाढल्यावाचून केवळ बाह्यांगांतील क्रांतीनें राजकीय बंधनांनीं अथवा कायद्यांनीं नवें जग निर्माण करण्याची आशा फोल आहे, अशी सत्याग्रही व्यक्तीची खात्री झालेली असली पाहिजे.

हा सत्याग्रही क्रांतिकारक वर्ग म्हणजे प्राचीन कालांत किंवा मध्य युगांत प्रतिष्ठा पावलेल्या यति वर्गासारखाच सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह व अस्तेय यांसारखीं व्रतें घेतलेला यतिवर्गच होय असें म्हणतां येईल, पण तो त्या यतिवर्गाप्रमाणें सामाजिक घडामोडींपासून अलिप्त राहणारा आणि समाजाच्या दानबुद्धीवर जगणारा अलग यतिवर्ग नव्हे. समाजांतील सर्व घडामोडींवर दक्षतेनें नजर ठेवणारा, समाजाच्या सर्व व्यवहारांतील अन्यायांचें दिग्दर्शन करून न्याय संस्थापनेचे मार्ग शोधून काढण्यांत नित्य गढून गेलेला, स्वतःच्या चरितार्थाचा भार स्वतःच्या श्रमानें उचलणारा आणि सामाजिक क्रांतीचें नेतृत्व स्वीकारून प्रस्थापित राजसत्तेविरुद्ध न्यायासाठी झगडणारा



असा हा वर्ग असला पाहिजे. तसेंच समाजाची अनासक्त बुद्धीनें हरएक प्रकारें सेवा करून त्याची आत्मशुद्ध करणाराहि तो वर्ग असला पाहिजे. सत्तेचा व संपत्तीचा लोभ त्यानें सोडिला पाहिजे आणि परोपकार, भूतदया, न्यायनिष्ठा यांपासून मिळणाऱ्या आनंदाचा उपभोग घेण्याचें शिक्षण त्याच्यापासून समाजाला मिळत राहिलें पाहिजे. सामान्य जनतेच्या अंतःकरणांतील सद्बुद्धीवर आणि सत्यनिष्ठेसाठी भोगाव्या-लागणारे क्लेश सहन करण्याच्या सामर्थ्यावर त्याचा विश्वास असला पाहिजे. सत्यनिष्ठा व प्रेमभावना या मानवाच्या अंतःकरणांतील सार्वत्रिक सद्भावना आहेत, त्या जागृत करणें शक्य आहे व तसें केलें तरच जगांत न्याय प्रस्थापना होऊं शकेल, हे सिद्धान्त केवळ बुद्धीनें ग्रहण करूनच न थांबतां, त्या कार्यास वाहून घेण्याचा निर्धार त्यानें केला पाहिजे. असे नेतेच समाजांत आमूलाग्र क्रांति घडवून आणून स्वातंत्र्याचें, समतेचें व बंधु भावनेचें नवें जग निर्माण करूं शकतील.

**गांधीवाद्यांचीं अकरा व्रतें:—**

अहिंसा, सत्य अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह ।  
शरीरश्रम, अस्वाद सर्वत्र भयवर्जन ॥ १ ॥  
सर्वधर्मीं समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना ।  
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥ २ ॥

वरील दोन श्लोकांत गांधीवाद्यांनीं आत्मशुद्धीसाठीं, आत्मोन्नतिसाठीं आणि सत्यसंस्थापनेसाठीं पाळावयाच्या अकरा व्रतांचा निर्देश सुप्रसिद्ध गांधीभक्त आचार्य विनोबा भावे यांनीं केलेला आहे. जगांतील सत्यज्ञानाची वृद्धि, सत्यनिष्ठेची प्रवृत्ति आणि सत्याचरणासाठीं स्वार्थत्याग करण्याची बुद्धि जितक्या प्रमाणांत वाढतील तितक्या प्रमाणांतच जगाची धारणा होऊन जगत्कल्याण होईल. हा गांधी-

वादाचा पहिला सिद्धांत असून ही सत्याची उपासना करणारांनीं हिंसा, परिग्रह, भीति, सुखासक्ति आणि स्तेयवृत्ति यांपासून अलिप्त राहण्याचा अहर्निश यत्न करीत राहिलें पाहिजे. या सर्व हीन प्रवृत्ति असून त्यांतूनच सर्व वैयक्तिक व सामाजिक पापांची उत्पत्ति होत असते. **या पाप प्रवृत्तींचें सामाजिक स्वरूप समजून घेणें आणि या सामाजिक पापकर्मांशीं असहकार करण्यास समाजाला शिकविणें हें गांधीवादाचें वैशिष्ट्य आहे.**

**अहिंसा**—जैन, बौद्ध, व ख्रिस्ती धर्मांनीं अहिंसेचा उपदेश केला तरीहि त्यांनीं राजकीय हिंसेचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला नाहीं. तसेंच यतिवर्गावरहि लोकसंग्रहाच्या कर्तव्याचा भार लादला नाहीं. गांधीवाद राजकीय हिंसेचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न करीत असून अहिंसक क्रांति, अहिंसक राष्ट्ररचना, युद्धाशी असहकार या मार्गांनीं अहिंसा व सत्य यांच्या अधिष्ठानावर नवी मानव संस्कृति निर्माण करीत आहे.

**सत्य**— सत्य संशोधन म्हणजे भौतिक, मानसिक व आध्यात्मिक सृष्टीच्या घटनेचें संशोधन. सत्यनिष्ठ राहण्यासाठीं करावी लागणारी तपश्चर्या हीच आत्मोन्नति व तींत प्रकट होणारें बल हेंच आत्मबल. इंद्रियलोलुपता, विकारवशता, सुखासक्ति हे सत्यनिष्ठेचें वाटमारे आहेत. बुद्धीचा शुद्ध धर्म सत्यनिष्ठा हा आहे व सर्वहितदक्ष बुद्धि हीच सामाजिक सत्य किंवा न्याय यांचें आकलन करूं शकते. स्वहित बुद्धि संकुचित बनून सत्याशीं व्यभिचारी बनते. अहंकार व ममत्व यांचीं वैयक्तिक, वर्गीय, जातीय, वंशीय, राष्ट्रीय अशीं विविध रूपें आहेत. यांतून मुक्त झालेली बुद्धीच सत्याशीं अव्यभिचारी असूं शकते. हिंसाकर्मानें ती अंध बनते. हिंसाबुद्धि



ही कोणत्या तरी आसक्तींतून उत्पन्न होते. पण पूर्ण अनासक्त सत्यनिष्ठ बुद्धी हीच जगत्कल्याण जाणूं शकते. न्यायसंशोधन व न्याय संस्थापन हें सत्याचें सामाजिक स्वरूप आहे व त्याची सिद्धि अहिंसेनेंच होऊं शकते.

**अस्तेय**—अस्तेय म्हणजे केवळ कायदेशीर चोरी न करणें येथढाच अर्थ नाहीं. आपण कष्ट न करतां समाजांतील संपत्तीचा उपभोग घेणें, आवश्यकतेपेक्षां अधिक धनोपभोग घेणें, धनसंग्रह करणें हीं सर्व स्तेयाचीच विविध स्वरूपें आहेत. अकष्टार्जित धनार्जन करण्याचे कायदेशीर मार्ग हेहि स्तेय मार्गच आहेत. अशा मार्गावर जगणारा वर्ग सामाजिक स्तेयावर जगत असतो. कष्टजीवी वर्गाच्या श्रमांतून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा हा अपहार अस्तेय व अहिंसा या व्रतांशीं विसंगत आहे. यासाठीं प्रत्येकानें समाजाच्या संपत्तींत भर घालण्यास अवश्य असणारे श्रम करून त्याच्या योग्य मोबदल्यावरच आणली उपजीविका केली पाहिजे. भांडवलशाही समाजांतील हिंसा या प्रकारच्या सामाजिक स्तेयांतूनच निर्माण होत असते. ग्रामोद्योगांची संघटना हा एक या स्तेयाशीं असहकार करण्याचा मार्ग आहे व भांडवलशाहींतून निर्माण होणाऱ्या हिंसेच्या निवारणाचाहि तो एक मार्ग आहे.

**ब्रह्मचर्य**--ब्रह्मचर्य या व्रताचा व्यापक अर्थ सर्व इंद्रियांचा संयम करून ब्रह्माची, सत्याची उपासना करण्यांत आनंद मानणें असा गांधीवादी करतात. शरीर रक्षणासाठीं अन्नादि विषयसेवन व जातिरक्षणासाठीं स्त्री-पुरुष संयोग हे नैसर्गिक आहेत असें गांधीवाद मानतो; तथापि सत्याग्रही मनुष्यानें पूर्ण ब्रह्मचर्य पालन करावें आणि विवाहित मनुष्यांनींहि संभोगापासून अलिप्त राहावें असें त्याचें मत आहे. सत्यसंशोधन व सत्यसंस्थापन या कार्यास लागणारें सामर्थ्य

ब्रह्मचर्यानेंच प्राप्त होऊं शकते, म्हणून सत्याग्रही मनुष्यानें ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली पाहिजे. परंतु हे ब्रम्हचर्य पालन करण्यासाठीं स्त्रीसहवास टाळून चालणार नाहीं. स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजांत व आश्रम संस्थांत ब्रह्मचर्याचें पालन करतां आलें पाहिजे, तरच तें खरें ब्रह्मचर्य होय. सत्य संशोधनाची गोडी लागणाऱ्या मनुष्याच्या विषय वासना सुटतात व ब्रह्मचर्य सुलभ होतें. सामान्य मनुष्यांना वाटतें तितकें हें व्रत अवघड नाहीं असें म. गांधी मानितात. तथापि सत्य अहिंसा यांच्याप्रमाणें ब्रह्मचर्यातहि पूर्णत्व प्राप्त होणें जवळजवळ अशक्य आहे हें त्यांना माहित आहे, तथापि मानव्याचा तोच आदर्श आहे असें गांधीवादाचें मत आहे.

**असंग्रह**—परिग्रहाच्या आसक्तीनें मनुष्य सत्याग्रहापासून भ्रष्ट होतो म्हणून अपरिग्रहाचें व्रत सत्याग्रहीनें स्वीकारलें पाहिजे. बोल्शेविझम् हा एक समाजाच्या आर्थिक घटनेला अपरिग्रहाचा सिद्धांत लागू करण्याचाच प्रयत्न आहे असें गांधीवादी मानतात. तथापि खासगी संपत्ति नष्ट करण्याची ही क्रांति सशस्त्र मार्गांनीं करण्याचा प्रयत्न सफल होणार नाहीं असें म० गांधींचें मत आहे. रशियांतील बोल्शिव्हिक क्रांति ही अगदींच विफल होईल असा त्याचा अर्थ नाहीं, कारण लेनिन्सारख्यांनीं शुद्धबुद्धीनें जो आत्मयज्ञ केला तो अगदींच निष्फल होणें सृष्टीच्या नियतीच्या विरुद्ध आहे. पण त्यांना अभिप्रेत असणारें हें तत्त्व पुढें अधिक शुद्ध स्वरूपांत अधिक शुद्ध मार्गांनीं समाजाच्या आर्थिक घटनेंत समाविष्ट होऊं शकेल असें म. गांधींनीं एका शंकितास उत्तर देतांना म्हटलें आहे.* निदान

*Question:-- What is your opinion about the social economics of Bolshevism and how far do



आजच्या समाजांत तरी परिग्रही मनुष्य सत्यनिष्ठ राहू शकत नाहीं असें गांधीवादाचें म्हणणें आहे. सधन मनुष्यानें आपली संपत्ति समाजाला दिली पाहिजे व स्वयंप्रेरणेनें दारिद्र्याचा अंगीकार केला पाहिजे. एकवेळ सुईच्या नेढ्यांतून उंट जाऊं शकेल पण श्रीमंत मनुष्याला स्वर्गाच्या साम्राज्यांत प्रवेश करतां येणार नाहीं, हें ख्रिस्ताचें मत गांधीवादाला मान्य आहे.

**शरीरश्रम**:—प्रत्येक व्यक्तीनें धनोत्पादनासाठीं कांहीं तरी श्रम केलेच पाहिजेत; इतकेंच नाहींतर समाजांत श्रमविभाग झाल्यामुळें जी विषमता निर्माण होते, तिचें निवारण करण्यासाठीं, व शरीर श्रम करणारे लोक हीन आहेत ही भावना अंतःकरणांत उद्भवूं नये म्हणून प्रत्येकानें रोज कांहीं उत्पादक शरीरश्रमहि केले पाहिजेत. आपल्या

you think they are fit to be copied by our country?

*Answer:-I must confess that I have not been able to understand the meaning of Bolshevism. All that I know is that it aims at the abolition of the inistitution of private property. This is only an application of the ethical ideal of nonpossession in the realm of Economics and if people adopted this ideal of their own accord or could be made to adopt it, by peaceful persuasion, there would be nothing like it. But from what I know of Bolshevism, it not only does not preclude the use of force but freely sanctions it for the expropriation of private property and maintaining the collective State-ownership. And if that is so I have no hesitation

देशांतील सुताच्या धंद्याचें महत्त्व लक्षांत घेऊन सूत कातण्याचें नित्य-कर्म हें गांधीवाद्यानीं यज्ञकर्म म्हणून ठरविलें आहे. त्यांत स्वावलंबनाचेंहि तत्त्व ग्रथित झालेलें आहे. समाजांतील श्रम-विभागानुसार एखादा धंदा करूनहि मनुष्यानें फुरसतीच्यावेळीं आपल्या श्रमाचा सदुपयोग करून स्वतःचीं कामें स्वतः करण्याची संवय ठेविली, तर समाजांतील उत्पादनशक्ति समाजाला अधिक उपयुक्त व आवश्यक अशा कामीं लागू शकेल. मनुष्यानें दररोज अर्धातास नियमानें सूत कांतलें तरी त्याला लागणाऱ्या कापडाचें सूत तो कातूं शकतो. असा नियम प्रत्येकानें केल्यास समाजांतील या धंद्याला स्वावलंबनाचें स्वरूप प्राप्त होईल. यालाच वस्त्र-स्वावलंबन असें गांधीवादी म्हणतात. या व्रतांत शरीरश्रम, सामाजिक समता, आणि स्वावलंबन हीं तत्त्वें अन्तर्भूत झालेलीं आहेत.

---

in saying that the Bolshevik regime in its present form cannot last long. For it is my firm conviction that nothing enduring can be built on violence. But be that as it may, there is no questioning the fact that the Bolshevik ideal has behind it the purest sacrifice of countless men and women, who have given up their all for its sake, and an ideal that is sacntified by the sacrifices of such master spirits as Lenin, cannot go in vain; the noble example of their renunciation will be emblagoned for ever and quicken and purify the ideal as times passes ".

Young India Vol. III
P. 923.



**अस्वादः**—या व्रतांत प्रामुख्यानें जिव्हेचा संयम अंतर्भूत होतो. एकंदर संयमी व साध्या जीवनांत जिव्हासंयमाला विशेष महत्त्व देण्यांत आलेलें आहे. तसेंच मनुष्याची अभिरुचि शास्त्रीय व संयत असण्यानें त्याला जीवनांतील खरा रस चाखतां येतो असाहि सिद्धान्त याच्या बुडाशीं आहे. स्वादाच्या आहारीं गेलेल्या मनुष्याची रुचि कृत्रिम व हीन बनते आणि आरोग्य, उल्हास व उन्नति या दृष्टीनें मारक असा आहार तो करूं लागतो. याचा परिणाम त्याच्या एकंदर जीवनांत असंयम व हीन अभिरुचि निर्माण होण्यांत होत असतो. साधी राहणी व उच्च विचारसरणी हें जीवन-सूत्र अवलंबिण्याच्या दृष्टीनेंहि या व्रताचें महत्त्व आहे.

**अभय**—हें एक विशिष्ट आचाराचें व्रत नसून ती एक सत्य-निष्ठ मनुष्याला अवश्य असणारी व सत्यनिष्ठेच्या वाढीबरोबर वाढणारी श्रेष्ठ मनोवृत्ति आहे. सत्याग्रही मनुष्यानें लोकभय, राजभय, मृत्युभय किंबहुना धर्मभयहि उल्लंघून सत्यनिष्ठ राहिलें पाहिजे, कारण सत्याहून श्रेष्ठ असा कोणताहि धर्म नाहीं. सत्यनिष्ठा हीच ईशनिष्ठा आहे व तिच्या प्राप्तीसाठीं सामाजिक रूढी, राजकीय कायदे व धार्मिक बंधनेंहि मनुष्याला उल्लंघावीं लागतात. सत्याच्या उपासनेसाठीं वाटेल ते क्लेश सहन करण्यास तयार होणें, हेंच अभय होय. भ्याड मनुष्य सत्यनिष्ठ राहूंच शकत नाहीं व भ्याडपणापेक्षां हिंसाहि श्रेष्ठ आहे, इतकें या अभयवृत्तीचें महत्त्व गांधीवादी मानतात. अभय हा सर्व आत्मोन्नतीचा आधारच आहे.

**स्वदेशी, सर्व धर्मसमभाव आणि अस्पृश्यता निवारण**—

या तीन व्रतांचा अहिंसक समाजरचनेशीं संबंध कसा आहे, तें मागील प्रकरणांत दाखवून दिलेंच आहे. म्हणून त्यांची सविस्तर

चर्चा येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. स्वदेशी व्रतामुळें साम्राज्यवादी आर्थिक घटना नष्ट होते, सर्वधर्मसमभावनेनें धर्मभेदबुद्धींतून होणारी हिंसा नष्ट होते आणि अस्पृश्यता निवारणानें जातिश्रेष्ठत्वाचा व वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार गळून पडतो. एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रांवर, एका धर्माचें दुसऱ्या धर्मावर आणि एका जातीचें वा वंशाचें दुसऱ्या जातिवर वा वंशावर आक्रमण होऊं नये व सर्वांचा सहकार्यानें उद्धार व्हावा या बुद्धीनें या व्रतांची योजना करण्यांत आलेली आहे. आजच्या जगांतील द्वैतें व त्यांतून माजणारे कलह यांच्या शांतीचा हा मार्ग आहे. प्राचीन कालांतील यमनियमांत आधुनिक काळास अनुरूप व आवश्यक अशी घातलेली ही भर आहे. यांचें विशिष्ट स्वरूप भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या प्रयत्नांतून सुचलेलें असलें, तरी त्यांचें महत्त्व एकंदर जगांत नवी शांतिप्रधान संस्कृति निर्माण करूं इच्छिणारांनाहि आहे. नाझींच्या राष्ट्रवादास वंशश्रेष्ठत्वाच्या अहंकारानें विकृत बनविलें आहे, गोऱ्या युरोपीयनांत गौरेतर मानववंशासंबंधीं तुच्छबुद्धि दिसून येते, हिंदू व मुसलमान या धर्मभेदानुसार दोन राष्ट्रें निर्माण झालीं पाहिजेत असें हिंदू-मुसलमान समाजाचें नेतृत्व करूं इच्छिणारे बोलतात आणि कांहीं राष्ट्रांनीं इतरांवर सदैव आर्थिक वर्चस्व गाजविणें साहजिक आहे असें युरोपीय अर्थशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें प्रतिपादन करतात. या सर्व विकृत मतांच्या निरसनार्थ स्वदेशी, सर्व धर्मसमभाव आणि अस्पृश्यतानिवारण हीं व्रतें प्रतीकरूपानें अंतःशुद्धीसाठीं स्वीकारावयाचीं आहेत. अहिंसक राष्ट्रनिर्मिति व नव मानवसंस्कृति हें या व्रतधाऱ्यांचें ध्येय आहे.

जगाची सुधारणा करण्याच्या, समाजांत सर्वांगीण क्रांति करण्याच्या अथवा नवें जग निर्माण करण्याच्या अनेक योजना आज पुढें आल्या आहेत व येत आहेत, पण त्या सर्वांनीं, व्यक्तीनें स्वतःचीं सुधारणा



कशी करावी, अंतरंग क्रांति कशी घडवून आणावी आणि जगदुद्धाराच्या कार्यांतील आपला अधिकार कसा वाढवावा, इकडे द्यावें तितकें लक्ष दिलेलें नाहीं. तसेंच व्यक्तीच्या अंतःकरणांतील सत्यनिष्ठा आणि प्रेमभावना यांची ज्योत प्रज्वलित केल्यावाचून नवा मानव व नवें जग निर्माण करण्याची आशा व्यर्थ आहे, इकडेहि त्यांनीं लक्ष दिलेलें नाहीं. केवळ बाह्य समाजरचना, आर्थिक घटना किंवा राजकीय संस्था यांत परिवर्तन करून मानवाचें अंतःपरिवर्तन होणार नाहीं. हें ओळखून या अंतःपरिवर्तनावर भर देण्याचा आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या आत्मबलानें समाजाच्या बाह्यांगांत सर्वांगीण क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न गांधीवाद करीत आहे.

## सृष्टीची नैतिक नियतिः

सृष्टीला जशी भौतिक नियतीची बाह्य घटना आहे, तशीच तिला एक नैतिक नियतीची आंतर्घटना आहे व तिचें संशोधन केल्यावांचून मानवी जीवनाचा प्रश्न सुटूं शकत नाहीं. हें संशोधन आजपर्यंत अनेक साधुसंतांनीं केलें आहे व तें तसेंच यापुढेंहि चालू राहिलें पाहिजे. प्रेमानें प्रेम वाढतें, द्वेषानें द्वेष वाढतो, अक्रोधानें क्रोधाला जिंकतां येतें, सत्याचा असत्यावर विजय होतो, भौतिक सुखानें शरीर धारणा झाली तरी शांति लाभत नाहीं, सुखदुःखांना समान लेखून कर्तव्याचरण करीत असतां अखंड आनंदाची प्राप्ति होते, प्रत्येकानें आपापल्या सुखाच्या पाठीमागें लागल्यानें सर्वांना सुख लागेल हा मोह असून त्यापासून सर्वांना दुःखच लागतें, यासाठीं प्रत्येकानें सर्वांच्या सुखाचा मार्ग शोधीत असावें म्हणजे तो सुखी होऊन इतरांनाहि सुख लागते, इतरांना पीडा देऊन प्राप्त झालेलें सुख आपला नाश करितें आणि इतरांना सुखी करण्याच्या प्रयत्नांत

आत्मोन्नति होते, हे सर्व विश्वाच्या नैतिक घटनेचे नियम असून ते प्रत्यक्ष अनुभवानें व अनुभवाधिष्ठित अनुमानानें मनुष्यांनीं शोधून काढिले आहेत. या नैतिक नियतीसंबंधीं तत्त्वज्ञानांतील निरनिराळ्या संप्रदायांत थोडेफार मतभेदहि आढळतात व तदनुसार त्यांची नीतिशास्त्रें व ब्रह्मविद्या यांतहि फरक पडतात. नीतिशास्त्र म्हणजे कर्तव्यशास्त्र आणि ब्रह्मविद्या म्हणजे मोक्षशास्त्र किंवा परमानंद प्राप्तीचें शास्त्र. कर्तव्यशास्त्राचें अथवा नीतिशास्त्राचें कार्य मनुष्याला सदसद्विवेक करावयास शिकवून सत्प्रवृत्त होण्याचा मार्ग दाखवून देणें हें असून मोक्षशास्त्राचें ध्येय आत्म्याच्या सत्स्वरूपाचा साक्षात्कार—अनुभव—घडविणें हें आहे. आतांपर्यंत नीतिशास्त्राचें जें संशोधन झालें आहे त्यावरून सत्य, प्रेम आणि तप हीं सर्व नीतिनियमांची आधारभूत तत्त्वें म्हणून ठरलेलीं आहेत. यांनाच सत्य, अहिंसा व संयम किंवा अनासक्ति अशींहि नांवें देतां येतील. या तत्त्वांचें संपूर्ण आचरण करणारा मनुष्य हाच पूर्ण मनुष्य होय आणि अशा पूर्ण मानवांचा समाज, म्हणजेच सत्ययुग किंवा आत्मराज्य होय. प्रत्येक धर्माचें ध्येय असें सत्ययुग निर्माण करणें, मनुष्याला पूर्ण बनविणें आणि जगाला शांतीचा, स्वातंत्र्याचा व खऱ्या सुखाचा मार्ग दाखवून देणें हेंच आहे. मानवाची सुधारणा आणि समाजाची धारणा वरील नीतिनियमांच्या आचरणानेंच होऊं शकेल, म्हणून त्या नीतींचें आचरण करून दाखविणें व इतरांस तसें करण्यास शिकविणें हाच प्रत्येक व्यक्तीचा व समाजाचा खरा धर्म आहे. सत्य, प्रेम आणि तप ही नीति नित्य व परिस्थिति निरपेक्ष आहे,तथापि या नीतीचें निरपेक्ष आचरण करणारे पूर्ण मानव फारसे आढळत नाहींत. हजारांत एखादा मनुष्य तसें बनण्याचा प्रयत्न करीत असतो व असा प्रयत्न करणारांतहि एखादाच तसा बनतो. सामान्य लोक सापेक्ष नीतीचें आचरण करूं इच्छितात



व आम्ही चांगल्याशीं चांगले व वाईटाशी वाईट वागूं असें म्हणतात. ते आपल्या बुद्धीप्रमाणें मनुष्यांचे साधु आणि असाधु असे भेद करतात. पण प्रत्येक मनुष्य साधु व असाधु असा उभयविध असतो, म्हणजे या दोनहि प्रवृत्ति त्याच्या अंतःकरणांत असतात. ज्याची असाधुवृत्ति प्रबल असते त्याला असाधु व ज्याची साधु वृत्ति प्रबल असते त्याला साधू असे सामान्यतः म्हणतात. जगांतील साधुवृत्ति वाढविणें हें नीतीचें साध्य आहे आणि ती वाढविण्यास केवळ सापेक्ष नीतीचें आचरण करून भागत नाहीं. कारण एक तर सापेक्ष नीतीचें आचरण करणाऱ्या मनुष्याला दुसऱ्याचें साधुत्व आणि आपलें असाधुत्व समजतच नाहीं.दुसऱ्यांचे अल्प दोष तो मोठे करून पाहतो आणि आपले मोठे दोष अल्प मानतो. हीच मनुष्याची बहिर्मुखदृष्टि होय व या वृत्तीमुळें तो सत्याचें पूर्ण आकलन करूं शकत नाहीं. यासाठीं अंतर्मुख दृष्टीनें आपले दोष पाहण्यास मनुष्यानें शिकलें पाहिजे व आपणांस दिसणारें सत्य आचरणांत आणिलें पाहिजे. असा सत्याचरणी मनुष्य इतरांनाहि आपल्याशीं साधुवृत्तीनें वागण्यास भाग पाडतो.

"जशास तसें" हें तत्त्व जगामध्यें आहे आणि बहुजन समाज सामान्यतः सापेक्ष नीतीनें वागण्याचा प्रयत्न करीत असतो, म्हणूनच साधुपुरुषाची महती त्याला समजते. आपणांशीं जगानें चांगलें वागावें अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें जगाला दोष देत न बसतां आत्मशुद्धि करून जगाशीं चांगलें, म्हणजे सत्यानें व प्रेमानें, वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "जशास तसें" या सूत्राचा आश्रय आत्मोध्दारासाठीं व जगदुद्धारासाठीं करण्याचा प्रयत्न ज्याला करावयाचा असेल, त्यानें दुष्टाशींहि साधुत्वानें वागावें, आपणांस शत्रु लेखून

आपला द्वेष करणारांवरहि प्रेम करावें. यामुळें ज्याला आपण दुष्ट किंवा असाधु म्हणतो त्याचें साधुत्त्व जागृत होतें व त्याचें वर्तन सुधारतें. याच्या उलट त्याला असाधु वृत्तीनें आपण वागवूं लागलों तर तो अधिकच दुष्ट बनतो आणि आपलीहि असाधुवृत्ति जागृत होऊन आपला अधःपात होतो. अंतर्मुख दृष्टीनें आत्मसंशोधन करणाऱ्याला जग आपणांवर अन्याय करीत आहे त्यापेक्षां आपणच जगावर अधिक अन्याय करीत आहों, असें दिसून येईल. निदान आपणांवर होणाऱ्या अन्यायांशीं आपण भीतीनें व लोभानें सहकार करीत आहों असें तरी दिसून येईल. यासाठीं आपली न्यायबुद्धि जसें सांगत असेल, तसें वागण्याचा आणि आपणांवर व इतरांवर होणाऱ्या अन्यायांशीं असहकार करण्याचा शक्य तितका प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. असें करीत असतां भोगावे लागणारे क्लेश सहन करणें हाच आत्मशुद्धीचा व लोकोद्धाराचा मार्ग आहे. हिंसेनें इतरांना सुधारण्याचा प्रयत्न करण्यापासून आपला अधःपात होतो व जगाचाहि उद्धार होत नाहीं. तथापि भेकडपणानें अन्यायाशीं सहकार करण्यापेक्षां हिंसेचा आश्रय करून अन्यायाचें निवारण करण्याचा प्रयत्न करणें हेंहि श्रेष्ठ आहे, पण तो श्रेष्ठतम मार्ग नव्हें. अहिंसेनें अन्यायाचें निवारण करणें हाच श्रेष्ठतम मार्ग आहे व तो साधत नसेल, तेव्हांच अथवा त्यानेंच अन्याय निवारणासाठीं हिंसा करावी.

राजधर्मांतलि हिंसा ही अन्याय निवारणासाठीं म्हणूनच समर्थनीय धरलेली आहे व सशस्त्र क्रांतिकारकहि याच दृष्टीनें आपल्या हिंसेचें समर्थन करीत असतात. गांधीवाद या दोहोंच्याहि विरुद्ध आहे, तथापि राजधर्मांतील हिंसा पूर्णपणें नष्ट करण्यापूर्वी समाजांत आत्मबल निर्माण झालें पाहिजे व तें आत्मबल निर्माण करण्याचा सत्याग्रह हा मार्ग आहे असें मानतो. राजधर्मांतील



हिंसा अकहंकारभावानें आणि स्वार्थापासून अलिप्त बुद्धीनें केली असतां मनुष्याला ती बंधक होत नाहीं व ती हिंसाहि होत नाहीं असें भगवद्गीता म्हणते. अशा निरहंकारं, निर्मम व निर्वैर बुद्धीच्या मनुष्यानें राजधर्माचें आचरण केलें असतां समाजाची धारणा होते म्हणून त्याला राजर्षी असें म्हणतात. राजर्षी हा शस्त्रबलानें समाजधारणेचें कर्म करीत असला तरीहि तो निर्वैर असतो व म्हणून त्याच्या हातून हिंसा कर्म घडत असलें तरी तो स्वतः त्या कार्यापासून अलिप्त असतो, म्हणून त्या हिंसेचे संस्कार त्याच्या अंतःकरणावर होत नाहींत आणि त्याची मुक्तावस्था व शांति ढळत नाहीं असें भगवद्गीतेच्या आधारें कांहीं लोक म्हणतात. पण हें चित्र केवळ काल्पनिक असून समाजधारणेसाठीं हिंसा करावी लागणें हें समाजाच्या व त्यांतील नायकांच्या अपूर्णत्वाचें चिन्ह आहे असें गांधीवाद मानतो. आत्मबलानें समाजांत पुरेसें साधुत्व निर्माण करतां येत नाहीं, तोंपर्यंतच ही राजधर्मांतील हिंसा अपरिहार्य भासणार. पण हा त्या समाजाचा व त्यांतील नायकांचा दोष आहे. गांधीवादाच्या मतानें राजर्षी हा पूर्ण मानवाचा खरा आदर्श नसून ब्रम्हर्षी हा पूर्ण मानवाचा आदर्श आहे; साधूंचें संरक्षण व दुष्टांचा विनाश करतो म्हणणारा राजर्षी हा स्थूलकर्मा असतो. दुष्टांचा संहार करीत असतां त्या दुष्टांच्या अंतःकरणांतील साधुवृत्तींचाहि तो संहार करीत असतो आणि या पापाचा मल त्याच्या अंतःकरणासहि मालिन केल्यांवाचून राहत नाहीं. राजर्षींच्या हिंसेचें समर्थन करणारे त्याला पूर्ण समजतात, पण समाजाच्या अपूर्णतेमुळें त्याला हिंसा करावी लागते असें म्हणतात; तर गांधीवादी अपूर्ण समाजांत पूर्ण मानव जन्मास येतो किंवा अशा समाजांतील व्यक्ति पूर्णत्व पावूं शकते हेंच मान्य करीत नाहींत. समाज पूर्ण होईल तेव्हां त्याला राजर्षींच्या हिंसेची आवश्यकताच लागणार नाहीं व अपूर्ण

समाजांतील व्यक्ति पूर्ण बनूंच शकत नाहीं असें गांधींवादाचें मत आहे. राजर्षी हा पूर्ण नाहीं म्हणूनच त्याला शास्त्रांचें बंधन पाळावें लागतें आणि लोकसंग्रह बुद्धीनें केलेल्या हिंसेबद्दलहि चित्तशुद्धीसाठी प्रायश्चित्त घ्यावें लागतें. राजर्षींची सापेक्ष नीतिमत्ता ही समाजांतील सामान्यलोकांच्या सापेक्ष नीतिमत्तेची द्योतक असते व तिच्या पातळीच्याहि खाली जाणाऱ्यांचा निरोध करण्यास तिचा उपयोग झाला तरी जुनीं शास्त्रें मोडून नवीं शास्त्रें रचण्याचा अधिकार राजर्षींना प्राप्त होत नाहीं. हा अधिकार ब्रह्मर्षींनाच असतो, कारण ते सत्य व अहिंसा या नित्य धर्मांचें बंधन पाळीत असतात.

जीवन्मुक्त मनुष्य बंधनातीत होतो, शास्त्रांचे किंवा समाजधर्माचे विधिनिषेध पाळीत नाहीं, या कल्पनांचा अर्थ गांधीवादी काय करतात ते समजून घेतलें पाहिजे. समाजाचीं बाह्य बंधनें समाजांत सत्यनिष्ठा, प्रेमवृत्ति आणि संयमशीलता यांची वृद्धि करण्यासाठींच असतात, ज्या मानानें या वृत्ति वाढत जातील त्या मानानें मनुष्याला बाह्य बंधनांची आवश्यकता उरणार नाहीं. संपूर्ण सत्यपूत, प्रेममय व तपःशुद्ध व्यक्ति हीच जीवन्मुक्त व्यक्ति होय व तोच आदर्श ब्रह्मर्षी होय. असा मनुष्य हाहि एक अमूर्त आदर्शच आहे, पण ध्येयदृष्टीनें तो पूर्ण आहे व तो आदर्श पुढें ठेऊन तद्रूप होण्याचा प्रयत्न करणें हाच प्रत्येक व्यक्तीचा धर्म आहे. पूर्ण मनुष्य बाह्यबंधनांतून मुक्त झाला तरी तो सत्य, अहिंसा व तप या बंधनांचें उल्लंघन करीत नाहीं तर तो सत्यरूप, प्रेममय व तपःशुद्ध बनतो. "तयाचिया लीळेमाजी। नीती जियाली दिसे" म्हणजे त्याची सहजप्रवृत्ति हीच नीतिमय बनते. सर्व नीतिशास्त्राचें, धर्मशास्त्राचें व मोक्षशास्त्राचें रहस्य त्याच्या वर्तनांत जगाच्या प्रतीतीस येतें.

भूमितींतील बिंदु, सरळ रेषा किंवा वर्तुळ यांच्या व्याख्या जशा



पूर्ण निर्दोष वस्तूंच्या बुद्धिगोचर स्वरूपावरून बनविलेल्या असतात त्याचप्रमाणें पूर्ण मानव व पूर्ण समाज यांच्या या कल्पना आहेत. पण हीं ध्येयें काल्पनिक म्हणजे खोटीं नाहींत. त्यांची प्रतीति प्रत्येकाच्या अंतःकरणांत अपूर्णत्वाच्या जाणीवेनें व पूर्णत्वाच्या प्रयत्नानें येत असते.

अपूर्ण व्यक्तींना व समाजांना पूर्णत्वाकडे नेणाऱ्या, त्यांच्यांत नवें चैतन्य निर्माण करणाऱ्या आणि त्यांच्या आंतर्बाह्य स्वरूपांत क्रांति घडवून आणणाऱ्या या वास्तविक शक्ति आहेत. स्थूलदृष्टीला अदृष्ट असल्या तरी आंतरदृष्टीनें अनुभवितां येणाऱ्या या शक्ति स्थूल दृष्टीला दिसणाऱ्या मानवी विश्वांत अपूर्व स्थित्यंतरें घडवून आणतात. त्यांच्या बाह्य आविष्कारांत त्यांचें पूर्ण शुद्ध स्वरूप व्यक्त झालें नाहीं, तरीहि मानव संस्कृतीचा दीर्घकालीन इतिहास अवलोकन केल्यास त्याचें स्वरूप अधिकाधिक शुद्ध बनत असल्याचें दिसून येतें. आजपर्यंत मानवी इतिहासांत ज्या ज्या प्रचंड क्रांत्या घडून आल्या त्या सर्व क्रांत्यांतून मानवी ध्येयांचा विकास होत आलेला आहे आणि या ध्येयाचा विकास होत असतां त्यांच्या प्राप्तीच्या साधनांचाहि विकास होत आला आहे. सत्याग्रही क्रांतिशास्त्र हें असेंच आजच्या मानवांना जी ध्येयें आकर्षित करीत आहेत, तीं प्राप्त करण्याचें विकसित व उन्नत शास्त्र आहे.

फार कालापासून विश्वकुटुंबाचें ध्येय मानवाच्या मनाला आकर्षित करीत आहे. लोकसत्तावाद व समाजसत्तावाद हीं ध्येयें स्वीकारून ज्यांनीं क्रांत्या केल्या, त्यांच्या डोळ्यापुढेंहि प्राचीन काळापासून संताग्रणींनीं पुरस्कारिलेलें विश्वकुटुंबाचें हेंच ध्येय निरनिराळ्या स्वरूपांत वावरत होतें. आज युरोपीय महायुद्धांत भाग घेणारे राष्ट्रनायकहि नव्या जगाच्या स्थापनेची

घोषणा करीत आहेत. प्राचीन संतमुनींनीं विश्वकुटुंबाच्या ध्येयाला सामाजिक सृष्टींतील क्रांतीचें स्वरूप दिलें नाहीं. समाजाच्या आसमंतात् आश्रम संस्था काढून या ध्येयाचे प्रयोग करण्यांत व वेळींप्रसंगीं समाजधर्माचें प्रतिपादन करण्यांत ते इतिकर्तव्यता मानीत. आधुनिक क्रांतिकारकांनीं समाजाची आर्थिक व राजकीय परिस्थिति पालटून जगांतील आपत्तींचें निवारण करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. म. गांधींनीं या दोनहि प्रवृत्तींचा रम्य संगम घडवून सत्याग्रहाचा संदेश जगाला दिला आहे. यांत अंतरंगक्रांति आणि समाजाची बाह्यांगक्रांति या दोहोंवर सारखेंच लक्ष दिलेलें आहे आणि व्यक्तिधर्माचा समाजधर्माशीं समन्वय साधिला आहे. सत्य, अहिंसा व संयम यांच्या आधारें विश्वकुटुंबवृत्ति व्यक्तीच्या अंतःकरणांत बाणते म्हणून त्यांचा सामाजिक आविष्कार झाल्यानें समाजालाहि विश्वकुटुंबाची अवस्था प्राप्त होऊं शकेल.

" अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥ "

ही वृत्ति स्वतःच्या अंतःकरणांत बाणवावी आणि तीच वृत्ति समाजांत बाणविण्यासाठीं सामाजिक राजकीय व धार्मिक अन्यायांविरुद्ध अहिंसेनें झगडत राहावें, स्वतः झगडावें व इतरांस झगडण्याचें शिक्षण द्यावें. अन्यायाशीं झगडतांना स्वतः अन्याय करूं नये, " न पापे प्रतिपापःस्यात् " पतितांना पावन करावें आणि आत्मोद्धार ही जगदुद्धाराची तरफ बनवावी.

नव्या जगाची निर्मिति केवळ आश्रमवासी ऋषी-मुनींच्याकडून होणार नाहीं. तसेंच आध्यात्मिक उन्नतीकडे पाठ फिरवून हातीं शस्त्र धारण करणारे क्रांतिकारक किंवा साम्राज्यवादी मुत्सद्दीहि नव्या जगाची निर्मिति करूं शकणार नाहींत. आत्मोन्नतीच्या सुदृढ भूमीवर उभें राहून, भ्रमाच्या भवसागरांत बुडणाऱ्यांचा उद्धार करणाऱ्यांनीं समाजांतील विपत्तींचें निर्मूलन करण्यासाठीं त्याच्या आंतर्बाह्य घटनेंत क्रांति घडवून आणण्याचें कार्य अंगीकारिलें पाहिजे आणि हें क्रांतिकार्य अहिंसेनें व सत्यनिष्ठेनें घडवून आणण्याचा मार्ग सामान्यजनतेला दाखवून दिला पाहिजे. या मार्गांत आत्मोद्धार हें जगदुद्धाराचें साधन बनतें आणि जगदुद्धार हें आत्मोद्धाराचें साधन बनतें. किंबहुना जगदुद्धार व आत्मोद्धार यांतील द्वैत नष्ट होऊन परार्थ हाच स्वार्थ बनतो आणि त्यासाठीं भोगावे लागणारे क्लेशहि आनंददायक बनतात. या अनुभवांतच विश्वाच्या स्वरूपाचें रहस्य समजतें आणि जगांतील सर्व द्वैतांचा निरास करून स्वातंत्र्याचें, शांतीचें व समतेचें साम्राज्य स्थापन करण्याचा खरा मार्ग आढळतो.

गांधीवाद हा क्रांतिवाद असला, तरी त्यांत अगदीं नवें असें कांहीं नाहीं. सत्य व अहिंसा या सनातन धर्माचा तो एक नवा आविष्कार आहे. समाजाचें आध्यात्मिक व नैतिक अधिष्ठान ढळलें असतां त्यांत जी अनवस्था निर्माण होते, तशीच अनवस्था आज फार मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. ही अनवस्था दूर करून त्याला आजच्या परिस्थितीस अनुरूप असें आध्यात्मिक, नैतिक अधिष्ठान पुनः प्राप्त करून देण्याचा हा प्रयत्न आहे. या दृष्टीनें हा क्रांतिवाद असला, तरी त्याचें अधिष्ठान सनातन आहे आणि विश्वकुटुंब स्थापनेच्या सनातन ध्येयानेंच तो प्रवृत्त झालेला आहे. शस्त्रबल आणि बुद्धिबल यांचा अहंकार झाल्यामुळें आत्मबलाचें विस्मरण झालेल्या मानवाला त्याचें स्मरण करून देऊन त्याच्या संस्कृतीला आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचें कार्य त्याला करावयाचें आहे.

आधुनिक युरोपांत निर्माण झालेल्या संस्कृतींत ही उणीव दिसत आहे व त्यामुळेंच तिचा आज विनाश होत आहे. या युरोपीय संस्कृतीच्या विनाशाबरोबर मानव-संस्कृतीचा विनाश होऊं नये, म्हणून आत्मबलाधिष्ठित नवी मानव संस्कृति निर्माण करण्याचें कार्य गांधीवाद करीत आहे. या मानव संस्कृतीचें ध्येय सत्ययुग असलें तरी समाजांतील राजकीय बंधनांची सर्वच हिंसा एकदम नष्ट होण्याचा काळ अद्यापि आलेला नाहीं, हें जाणून "**अहिंसात्मक लोकशाही**" निर्माण करणें हें गांधीवादाचें निकटवर्ति ध्येय आहे,कारण

"The nearest approach to purest anarchy is a democracy based on non-violence. The European democracies are to my mind a negation of democracy"

असें म० गांधी म्हणतात. अहिंसक लोकसत्ता हीच आत्मसत्तेला अत्यंत निकट असें ध्येय आहे व युरोपीय लोकशाही हिंसेवर अधिष्ठित झाली असल्यानें ती लोकशाहीचें केवळ सोंग आहे असें गांधीवाद मानितो. भारतीय सत्याग्रहांतून शुद्ध लोकशाही संस्कृति निर्माण होईल व तिच्यातूनच आत्मसत्तेचा मार्ग जगाला सांपडेल. म. गांधींची ही निष्ठा ज्यांना पटते, त्यांना गांधीवादी म्हणतात व त्यांचें जीवनासंबंधीचें तत्त्वज्ञान हाच गांधीवाद होय.

सत्याग्रह हीच म. गांधींची मानव संस्कृतीला देणगी आहे. सत्याग्रह हा कर्मयोग आहे व त्यांत राजकारणाला फार महत्त्वाचें स्थान आहे. तथापि त्याचा उगम राजर्षींच्या धर्मांत नसून ब्रह्मर्षींच्या आत्मबलांत त्याचा उगम आढळतो. शस्त्रबलानें साधूंचें परित्राण व दुष्कृतांचा विनाश हें राजर्षींचें अंगीकृत कर्तव्य आहे तर आत्मबलानें साधुवृत्तीचें संवर्धन आणि असाधुवृत्तीचें निर्मूलन



हें ब्रह्मर्षींचें अंगिकृत कार्य आहे. जशास तसें हें राजर्षींचें धोरण तर 'शठं प्रति अपि सत्यम्' हें ब्रह्मर्षींचें वर्तन सूत्र. राज्यक्रांति हें ब्रह्मर्षींचें राजकारण आहे व क्रांति करण्यासाठीं हिंसा करण्याचें कारण पडूं नये म्हणून अहिंसक क्रांतीचा मार्ग प्रजेला दाखवून दिला पाहिजे. हिंसेनें दुष्टांचें निर्दालन झालें तरी दुष्टवृत्तीचें निर्मूलन होत नाहीं.

सशस्त्र क्रांतिवादी प्रस्थापित राज्ययंत्र मोडून टाकतात व त्याच बलाच्या अधिष्ठानावर आपलें नवें राज्ययंत्र स्थापन करतात. पण हिंसा हें साधनच अशा स्वरूपाचें आहे कीं, त्यामुळें या क्रांतिकारक पक्षाचा अधःपात होतो आणि जनतेवर नवा जुलूम स्थापन होतो. रशियामध्यें स्टॅलिनच्या नेतृत्वाखालीं अशा प्रकारचा नवा जुलूम स्थापन झालेला आहे असें आज उघड दिसत आहे. हा जुलूम नष्ट करण्यास पुनः एक सशस्त्र क्रांति करावी लागेल व तिच्यांतून उद्भवणाऱ्या जुलुमाविरुद्ध आणखीहि एक क्रांति करावी लागेल, असें हें क्रांतीचें अखंड चक्र नित्य फिरत ठेवण्याच्या कल्पना आज पुढें येत आहेत. या अखंड क्रांतिचक्राच्या नित्य फेऱ्यांत सांपडलेल्या मानव संस्कृतीच्या क्लेशांचा अंत कसा होईल, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न जगापुढें आज आहे. या प्रश्नाचें उत्तर मिळावयाचें तर तें सत्याग्रही निःशस्त्र क्रांतीनेंच मिळूं शकेल असें म. गांधींचें मत आहे. श्रीकृष्णानीं राजर्षींचा कर्मयोग भगवद्गीतेंत वर्णिला आहे. म. गांधी ब्रह्मर्षींचा कर्मयोग आचरीत आहेत आणि या ब्रह्मर्षींच्या कर्मयोगांतून प्रजेला अहिंसक क्रांतीचा मार्ग सांपडेल, असें ते सांगत आहेत. लो. टिळक व म. गांधी यांच्या राजकीय व्यवहार करण्याच्या पद्धतींत जो फरक लोकांना दिसतो, त्याचें स्पष्टीकरण वरील विवेचनावरून होऊं शकेल. दोघेहि कर्मयोगीच होत, पण एकाचा आदर्श राजर्षींचा कर्मयोग, तर दुसऱ्याचा आदर्श ब्रह्मर्षींचा कर्मयोग हा

आहे. सर्वांगीण सामाजिक क्रांति करण्याच्या दृष्टीनें म. गांधींच्या अहिंसक कर्मयोगाची आज जगाला अत्यंत आवश्यकता आहे. समाजरचनेंतील दोषांमुळें आणि राज्यकर्त्यांच्या दोषांमुळें समाजाला क्रांति करण्याची आवश्यकता नित्य भासत आली आहे व पुढेंहि भासत राहील. लोकसत्ताक राज्ययंत्रामुळें राजधर्मांतील हिंसा किमान होते आणि सत्याग्रही क्रांतिशास्त्रानें या किमान हिंसेचाहि प्रतिकार करतां येतो. म्हणून लोकसत्तेला सत्याग्रहाचें अधिष्ठान दिलें पाहिजे असे म. गांधी म्हणतात. सत्याग्रही लोकसत्ता ही समाजवादांतील आर्थिक समतेचें ध्येय मूर्त स्वरूपास आणूं शकेल आणि सामाजिक क्रांति घडवून आणिली, तरी अहिंसक व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट करणार नाहीं.

जोंपर्यंत राज्यसंस्थेची आवश्यकता समाजाला आहे, तोंपर्यंत त्या संस्थेमार्फत होणाऱ्या अन्यायांचा प्रतिकार करणाऱ्या क्रांतिकारकांचीहि त्याला आवश्यकता आहे. पण क्रांतिधर्माची दीक्षा घेतलेले हे लोक अहिंसा वृत्तीचे असतील, तर अहिंसक क्रांतिचा मार्ग लोकांना दाखवून देतील. लोकसत्ताक राज्ययंत्र आणि सत्याग्रही क्रांतिशास्त्र यांच्या आधारें मानवाला अखंड क्रांतीचा अहिंसक मार्ग सापडेल. या मार्गानें जात असतां मनुष्य समाजाला सत्ययुगाचें ध्येय दृष्टिगोचर होईल आणि त्या ध्रुव ताऱ्याकडे लक्ष ठेवून त्याला आपली जीवितनौका संसृतिसागरावरून वेगानें हाकारतां येईल. संसृतिसागरावरील या नित्य प्रवासांतच मनुष्याचें पौरुष व्यक्त होत असतें आणि पूर्णत्वाच्या ध्रुव ताऱ्याच्या साहाय्यानें आपल्या अपूर्णत्वाचा निरास करण्याच्या नित्य प्रयत्नांत अमृत आनंदाचा अस्वाद घेतां येतो. जग हें पूर्ण नाहीं, अथवा जगांतील कोणतीहि मूर्त वस्तु अथवा व्यक्ति पूर्ण नाहीं; पण जगाच्या अंतरंगांत पूर्णत्वाची ओढ



आहे. अपूर्णत्वांतून पूर्णत्वांत जाण्याची ओढ हीच मानवाच्या अंतःकरणांतील आत्मप्रेरणा होय. हिलाच भाविक लोक ईशप्रेरणा म्हणतात. या आत्मप्रेरणेंतूनच मनुष्याच्या बुद्धींत सत्याचा दीप प्रकाशित होतो आणि या प्रकाशाच्या साहाय्यानें त्याला आत्मोद्धाराचा व जगदुद्धाराचा मार्ग दिसत राहतो. अहंकाराचें व ममत्वाचें हवन केल्यावांचून ही आत्मप्रेरणेची सत्यज्योति प्रज्वलित होत नाहीं आणि तिच्या प्रज्वलनामुळें प्राप्त होणाऱ्या प्रकाशांत राहून संसारांतील सर्व कर्में करणाऱ्या कर्मयोग्यास जो अखंड आनंद उपभोगतां येतो, तो कोणत्याहि प्रकारच्या शारिरिक दुःखानीं खंडित होत नाहीं. सांसारिक कर्में करीत असतां आत्मानंद उपभोगण्याचा आणि आत्मोद्धारानें जगदुद्धार साधण्याचा हाच सर्व श्रेष्ठ मार्ग आहे.

जसा मार्क्सवादांतून शास्त्रीय समाजवाद निघाला व त्याची वाढ लेनिन् प्रभृतींनीं केली, त्याचप्राणें गांधीवादांतून सत्याग्रह हें जीवनव्यापी तत्त्वज्ञान निघालें असून त्याची वाढ अद्यापि म० गांधीं करीत आहेत. यांच्यानंतर हें कार्य त्याच सांप्रदायाचा अभिमान बाळगणाऱ्या इतरांना करावें लागेल. ही वाढ कितीहि झाली तरी सत्य व अहिंसा हें अधिष्ठान सुटणार नाहीं, कारण तें अधिष्ठान सुटेल तर त्याला सत्याग्रह हें नांव देतां येणार नाहीं. या अधिष्ठानाशी सुसंगत अशी गांधीवादाची वाढ म. गांधीच्या हयातींत व नंतरहि चालू राहिलीच पाहिजे. कारण या जगांत ज्याची वाढ होत नाहीं, तें मृत्युपंथास लागतें व ज्याची अखंड वाढ होतें तें अमर होतें. अशी गांधीवादाची वाढ करणें व सामाजिक जीवनांतील सत्याचें व अहिंसेचें संशोधन करून त्याच्या संस्थापनेचे मार्ग शोधून काढणें हेंच गांधीवादी लोकांचें नियोजित कार्य अथवा ध्येय आहे.

---

This book may be kept a fortnight

जावडेकर, शं. द.

B
133
.G3J2

गांधीवाद

Signature | Issue

B
133
.G3J2

BK. 3580

सात्त्विक करमणूक आणि उच्च दर्जाचें
वाङ्मय यासाठी मासिक

# सह्याद्रि

राजकीय, वाङ्मयीन, शास्त्रीय,
ऐतिहासिक, इत्यादि अनेक
विषयांवर अधिकारी लेखकांनी
अभ्यासयुक्त लिहिलेले लेख.

लघुकथा, लघुनिबंध, कविता,
व्यंग्यचित्रें अशी करमणुकीचीं
विविध अंगें.

संचालक : न. चिं. केळकर,
५६८, नारायण पेठ, पुणें.

वार्षिक वर्गणी ३॥- रुपये.
किरकोळ अंकास ६ आणे.

सुन्दर छपाई—डेक्कन प्रिंटिंग वर्क्स, पुणें २.